सोलापूर
तरुण भारत
आसमंत

**मराठा समाजाच्या आरक्षणावरून राज्यात उभी राहणारी सामाजिक स्थिती धोकादायक वळणावर जाण्यापूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावर तोडगा काढला. त्यात त्यांच्या अभ्यासू वृत्तीचा आणि जनसेवेच्या तळमळीचा जसा वाटा आहे, तसाच त्यांच्या संयमी वृत्तीचीही दाद द्यावी लागेल. आपल्यावरील अश्लाघ्य टीकेकडे दुर्लक्ष करून फडणवीस यांनी असाध्य ते साध्य करून दाखविले, ही मराठी माणसासाठी अभिमानास्पद बाब म्हटली पाहिजे.**



# अभिमन्यू ते अभिमानास्पद!

लक्ष्यवेध
**प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मराठा समाजाला देण्यात येणाऱ्या राखीव जागांसंदर्भात निर्माण होणारे महाभारत एका अभिमन्यूच्या कुशलतेमुळे टळले आणि मराठा समाजाची प्रदीर्घ काळाची मागणीही पूर्ण झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पडद्यामागून केलेल्या हालचालींमुळे मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न तर सुटलाच; पण ते करताना अन्य राखीव जागांच्या घटकांवरही अन्याय झाला नाही. मात्र, हा निर्णय घेताना फडणवीस यांच्या नेतृत्वाची कसोटी लागली होती. हा निर्णय घेणे केवळ कायदेशीर तरतुदींमुळेच किचकट नव्हते, तर राज्यातील राजकीय विरोधाचा स्तर पाहता, त्यांना आपल्या मनावरही संयम बाळगणे गरजेचे होते.

फडणवीस यांनी मनावर, वाणीवर नियंत्रण राखून आणि ध्येयावरील नजर न ढळविता हा तिढा यशस्वीरित्या सोडवून सर्वच घटकांना खुश केले. या आंदोलनाचा शेवटचा टप्पा गेल्या महिन्याच्या अखेरीस सुरू झाला. मराठा समाजाला आरक्षण मिळवून देणार्या आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावरच उपोषणाला प्रारंभ केला आणि राखीव जागांचा निर्णय झाल्याखेरीज आपण मुंबई सोडणार नाही, असे जाहीर केले. वास्तविक उपोषणासाठी त्यांनी सरकारची रीतसर परवानगीही घेतली नव्हती. इतकेच करून जरांगे थांबले नाहीत, तर त्यांनी राज्यभरातून हजारो मराठा आंदोलनकर्त्यांना मुंबईत बोलावून घेतले आणि दक्षिण मुंबईतील प्रमुख जागा या गर्दीने व्यापून टाकल्या. सरकारवर झुंडीच्या राजकारणाद्वारे दबाव टाकण्याचा हा थेट प्रयत्न होता. या गर्दीमुळे मुंबईचे दैनंदिन जीवन उद्ध्वस्त झाले. हे आंदोलनकर्ते ज्या भागात होते, तेथे रस्त्यावरून चालणेही नोकरदारांना शय होत नव्हते. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी असून, या गर्दीमुळे साहजिकच तेथील आर्थिक व्यवहारांवर प्रतिकूल परिणाम झाला. कारण, दक्षिण मुंबई हेच आर्थिक कारभाराचे केंद्र. यामुळे सामान्य मुंबईकर सरकारवर नाराज झाला होता. पण, फडणवीस यांनी धीर न सोडता आंदोलनकर्त्यांची गैरसोय होणार नाही, याचीही काळजी घेतली. आंदोलकांचे अन्नपाणी रोखण्याचा सरकार प्रयत्न करतेय, म्हणूनही यादरम्यान अफवा पसरविल्या गेल्या. मुंबईकरांनी, न्यायालयानेही सरकारचे एकूणच गैरव्यवस्थेवरुन कान टोचले. पण, फडणवीसांनी मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासनाला कार्यान्वित करुन, आंदोलकांची गैरसोय होणार नाही, याचीही पुरेपूर काळजी घेतली. आंदोलक रात्री निघाले आणि मुंबई सकाळपर्यंत स्वच्छ झाली, पूर्वपदावरही आली आणि मुंबईकरही सुखावले. या आंदोलनाच्या काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतेपणाची सर्वार्थाने कसोटी लागली होती. या काळात फडणवीस यांना त्यांच्या जातीमुळे अनेक गोष्टी ऐकून घ्याव्या लागल्या. ही गोष्ट महाराष्ट्रासारख्या राज्यासाठी लाजिरवाणी असली, तरी आजच्या काळातील विरोधी पक्षांमधील नेत्यांची सांस्कृतिक पातळी पाहता तसे घडणे अपेक्षितच होते.

केवळ फडणवीस यांच्यावरच टीका करण्यात आली असे नव्हे, तर त्यांच्या कुटुंबीयांवरही अश्लाघ्य टीका झाली. खालच्या थरावरची भाषा मराठा आंदोलकांकडून वापरली गेली. या आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनीही फडणवीस यांच्यावर बेछूट टीका केली. असे असूनही फडणवीस यांनी या समाजावर आणि त्याच्या नेत्यांवर आपला राग काढला नाही.उलट मराठ्यांना आरक्षण देण्यासाठी त्यांनीच विविध उपाय सूचविले आणि अंतिमतः त्याचे श्रेयही मंत्रिमंडळाने नेमलेल्या उपसमितीला दिले. हे करताना त्यांनी केवळ भाजपतीलच नव्हे, तर मित्रपक्षांतील मराठा नेत्यांचीही नियुक्ती केली आणि महायुतीतील एकतेचा संदेश दिला. यावरून सर्वांना बरोबर घेऊन जाण्याचे फडणवीस यांचे नेतृत्वगुण पुन्हा एकदा दिसून आले.

आपल्यावरील टीकेवर प्रतिक्रिया देतानाही त्यांनी आपली तुलना अभिमन्यूशी केली. आपल्याला चक्रव्यूहात कसे शिरायचे हे तर ठाऊक आहेच; पण त्यातून सुखरूप बाहेर कसे पडायचे तेही चांगलेच ठाऊक आहे, असे ते म्हणाले ते अगदी खरे. यापूर्वी त्यांना मराठा समाजाच्या आरक्षणावरून पेचात अडकविण्याचा प्रयत्न झाला होता. पण, तेव्हाही फडणवीस यांनी तेव्हा उपलब्ध असलेल्या पर्यायांचा पुरेपूर वापर करीत, मराठा समाजाला रक्षण मिळवून दिले. पण, त्यांच्यानंतर मुख्यमंत्री झालेल्या उद्धव ठाकरे यांच्या सरकारला ते आरक्षण न्यायालयात टिकवताही आले नव्हते. किंबहुना, मराठा समाजाला फक्त फडणवीस मुख्यमंत्री असतानाच आरक्षण मिळाले आहे, हे विशेष!

सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपदावर राहिलेले शरद पवार हे राज्यातील सर्वांत अनुभवी नेते मानले जातात. त्यांना प्रशासकीय कामाची आणि राज्यातील सामाजिक परिस्थितीचीही बारकाईने माहिती आहे, असे सांगितले जाते. शिवाय तेच मराठा समाजाचे नेते सर्वोच्च असल्याचाही दावा केला जातो. पण, त्यांचा हा अनुभव त्यांना या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी उपयोगी पडला नाही. किंबहुना, त्यांना या प्रश्नावर तोडगाच नको होता, असे वाटण्याइतपत त्यांनी या समस्येकडे दुर्लक्ष केले. पूर्वीची वृत्तपत्रीय कात्रणे पाहिल्यास 'मराठा समाजाला आरक्षण देणे शय नाही,' अशी स्पष्ट वक्तव्येही पवार यांनी केल्याचे दिसून येते. पवार मुख्यमंत्री असतानाच मावळमध्ये आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर गोळीबार करण्यात आला होता. आता तेच विरोधक मराठा आंदोलकांवर गुन्हे दाखल झाल्याबद्दल गळे काढताना दिसतात. यावरून राजकीय संधीसाधूपणा उघड होतो.

मराठा समाजाच्या आंदोलनाला पवार यांचीच फूस आहे, असे सूचित होत होते. कारण, फडणवीस जेव्हा-जेव्हा मुख्यमंत्री झाले, नेमकी तेव्हाच राज्यात मराठा आरक्षणावरून आंदोलने करण्यात आली, हा योगायोग निश्चितच नव्हता. मग आता एका ब्राह्मण मुख्यमंत्र्याने मराठा समाजाला आरक्षण कसे मिळवून दिले? याचे कारण हा प्रश्न इच्छाशक्तीचा आणि राज्याच्या सर्व समाजातील जनतेच्या हिताबद्दल असलेल्या कळकळीचा होता. या दोन्ही गोष्टी फडणवीस यांच्याकडे होत्या.

(पान ४ वर)

# तीन तिघाडा अन् ट्रम्पचा काम बिघाडा!




वेधक
**अनय जोगळेकर**

**शांघाय सहकार्य परिषदे'च्या निमित्ताने मोदी, पुतीन आणि जिनपिंग केवळ एकत्रच आले नाही, तर तिन्ही नेत्यांमध्ये अगदी मनमोकळ्या चर्चाही रंगल्या. एरवी या तीन नेत्यांच्या भेटीला जागतिक माध्यमांकडून किंचित कमी महत्त्वही दिले गेले असते, पण ट्रम्प यांनी भारताविरोधात पुकारलेल्या व्यापारयुद्धामुळे या तिन्ही नेत्यांची भेट सर्वार्थाने ऐतिहासिक ठरली. त्यानिमित्ताने या तीन नेत्यांच्या भेटी आणि एकाकी पडलेले ट्रम्प, अशा बदलत्या जागतिक भूराजकीय समीकरणांचा आढावा घेणारा हा लेख...**

तीन तिघाडा आणि डोनाल्ड ट्रम्पचा काम बिघाडा! चोविसाव्या 'शांघाय सहकार्य परिषदे'साठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी बीजिंगजवळच्या तियानजिनला भेट दिली. तब्बल सात वर्षांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी चीनला गेले. मोदी आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्यामध्ये दि. ३१ ऑगस्ट रोजी ५५ मिनिटांची द्विपक्षीय भेट झाली. दि. १ सप्टेंबर रोजी याच ठिकाणी नरेंद्र मोदी आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची आपापल्या शिष्टमंडळांसह द्विपक्षीय भेट झाली. चीनमध्ये आपल्यातील संभाषण कोणाच्या कानावर पडू नये, यासाठी पुतीन यांनी मोदींना स्वतःच्या रशियातून आणलेल्या गाडीतून नेले. गाडीमध्ये दोन्ही नेत्यांना सुमारे पाऊण तास एकांतात वेळ मिळाला.

'शांघाय सहकार्य परिषदे'च्यानिमित्ताने २५ हून अधिक देशांचे नेते तिथे जमले असता, मोदी, पुतीन आणि शी जिनपिंग यांच्या एकत्रित फोटोची जगभरात चर्चा सुरू झाली. 'शांघाय सहकार्य संस्थे'च्या सदस्य देशांना एकत्र केले, तर भौगोलिकदृष्ट्या तसेच लोकसंख्येच्या दृष्टीने तो जगातील सगळ्यात मोठा गट ठरतो. त्यात आकारमानाने सगळ्यात मोठा रशिया, तिसऱ्या क्रमांकाचा चीन, सातव्या क्रमांकाचा भारत आणि नवव्या क्रमांकाच्या कझाकस्तानचा समावेश आहे. १९९६ साली सुरक्षाविषयक सहकार्याच्या उद्देशाने रशिया, चीन, कझाकस्तान, किरगिझस्तान आणि ताजिकिस्तान यांनी 'शांघाय-५' या गटाची स्थापना केली. २००१ साली त्याचे अधिक व्यापक अशा 'शांघाय सहकार्य संस्थे'त रूपांतर झाले. परिषदेत २०१७ साली भारत आणि पाकिस्तानचा, तर २०२१ साली इराणचा पूर्ण सदस्य म्हणून समावेश करण्यात आला. या परिषदेला असलेली उपस्थिती पाहता, चीनने 'जागतिक महासत्ता' म्हणून शड्डू ठोकला आहे, हे स्पष्ट आहे.

गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात रशियातील कझान येथे मोदी आणि शी जिनपिंग यांची भेट झाली होती. २०२० साली चीनने गलवान खोर्यात घुसखोरीचा प्रयत्न केला असता, भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये झटापट झाली होती. त्यात दोन्ही बाजूंचे सैनिक मारले गेले. त्यानंतर भारत आणि चीनमधील संबंधांनी तळ गाठला. चीन भारताच्या स्टार्टअप कंपन्या, तसेच बँकांमधील समभाग विकत घेत आहे, हे लक्षात आल्यावर चिनी कंपन्यांच्या गुंतवणुकीवर मर्यादा आणल्या. भारताने अनेक चिनी



ॲप्सवर बंदी घातली. 'कोविड-१९'च्या काळात बंद झालेली भारत-चीन यांच्यातील थेट विमानसेवा पुन्हा सुरू करण्यात आली नाही.

चिनी नागरिकांना व्हिसा देण्याबाबत नियमावली अधिक कडक केली. दुसरीकडे भारत आणि चीन यांच्यामध्ये सीमा प्रश्नावर चर्चेच्या अनेक फेर्या पडल्यानंतर दोन्ही देशांनी आपले सैन्य माघारी नेले. त्यानंतर भारत आणि चीन यांच्यातील संबंध पूर्वपदावर येऊ लागले. नरेंद्र मोदी आणि शी जिनपिंग यांच्या भेटीत भारत आणि चीन प्रतिस्पर्धी नसून विकासातील भागीदार आहेत आणि त्यांच्यातील मतभेदांचे रूपांतर वादात होता कामा नये, याचा पुनरुच्चार करण्यात आला. तसेच, भारत आणि चीन यांची एकत्रित लोकसंख्या सुमारे २८० कोटी असून त्यांच्यातील संबंध एकमेकांप्रति आदरभाव, परस्परांचे हित आणि परस्पर संवेदनशीलता यावर आधारित असायला हवेत, अशी भूमिका घेण्यात आली.

नरेंद्र मोदींनी अधोरेखित केले की, द्विपक्षीय संबंधांमध्ये आणखी वाढ होण्यासाठी सीमेवर शांतता आणि सुव्यवस्था नांदणे आवश्यक आहे. 'शांघाय सहकार्य परिषदे'च्या संयुक्त निवेदनामध्ये एप्रिल २०२५ साली पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यात आला. तसेच, या हल्ल्यासाठी जबाबदार लोकांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

(पान ४ वर)

# आत्मनिर्भरतेकडून जागतिक नेतृत्वाकडे

**सेमीकंडक्टर क्षेत्रात भारताने झपाट्याने केलेली प्रगती ही केवळ औद्योगिक नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षेची व धोरणात्मक स्वायत्ततेत घेतलेली उंच झेप आहे. १.६० लाख कोटींची गुंतवणूक, पहिला व्यावसायिक सिलिकॉन कार्बाइड फॅब यामुळे भारत 'डिजिटल डायमंड्स' क्षेत्रातील जागतिक खेळाडू म्हणून उदयास आला आहे.**

वेध
**प्रतिनिधी**

जगाच्या औद्योगिक क्रांतीत कधीकाळी कोळसा आणि नंतर तेल हे काळे सोने ठरले. मात्र, २१व्या शतकाच्या डिजिटल युगात चिप्स म्हणजेच सेमीकंडक्टर हेच खरे 'डिजिटल डायमंड्स' ठरले आहेत. स्मार्टफोनपासून चारचाकींपर्यंत, कृत्रिम बुद्धिमत्तेपासून संरक्षण क्षेत्रातील रडारपर्यंत- सेमीकंडक्टरशिवाय आधुनिक जीवनाची कल्पनाही करवणार नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी असे जे म्हटले आहे की, ज्याच्याकडे चिप्सची ताकद आहे, त्याच्याकडे २१व्या शतकाचे सामर्थ्य आहे, ते यथायोग्य असेच.

भारताने २०२१ साली 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन' सुरू करत, आत्मनिर्भरतेकडे पहिले पाऊल टाकले आणि आज 'सेमीकंडक्टर मिशन २.०'च्या स्वरूपात या क्रांतीला गती देण्याचे काम करण्यात आले आहे. विशेषतः अमेरिकेबरोबरचे संबंध तणावपूर्ण असताना, भारतातील पहिली सेमीकंडक्टर उत्पादन प्रक्रिया सक्रिय झाली, हे शुभ वर्तमानच!

सध्या जागतिक सेमीकंडक्टर बाजारपेठ अंदाजे ६०० अब्ज डॉलर्सची असून, एका अहवालानुसार, पुढील दशकात ही बाजारपेठ एक ट्रिलियन डॉलरपेक्षाही मोठी होणार आहे. यापैकी ५० टक्के बाजारपेठ ही आशियात असून, यात तैवान, दक्षिण कोरिया, चीन यांचा समावेश आहे. अमेरिका संशोधन आणि चिप डिझाईनमध्ये अग्रेसर आहे. भारत या क्षेत्रात आजही आयातीवर अवलंबून असून, सुमारे ९० टक्के चिप्स या विदेशातून येतात. म्हणूनच, या क्षेत्रात भारताने आत्मनिर्भर होणे किती गरजेचे होते, हे अधोरेखित होते. भारत सरकारने त्यासाठीच स्थानिक पातळीवर सेमीकंडक्टर उत्पादनाला चालना देत, आर्थिक स्वावलंबनाच्या दृष्टीने पाऊल टाकले आहे. राष्ट्रीय सुरक्षेसाठीही ते नितांत गरजेचे असेच आहे.

(पान ४ वर)



**उत्तराखंडमधील उत्तरकाशीमधील धराली, हिमाचल प्रदेशमधील मंडी जिल्हा आणि जम्मूकाश्मीरमधील किश्तवाड तसेच कथुआ आदी भागांमध्ये ढगफुटीमुळे झालेली दुर्घटना ही निसर्गाशी खेळण्याचा परिणाम आहे. या आपत्तींबद्दल अनेक प्रकारचे दावे- प्रतिदावे ऐकायला मिळत आहेत. मात्र, या आपत्तींनी पुन्हा एकदा पर्यावरण आणि विकास यांच्यात संतुलन राखण्याची गरज असल्याचेअधोरेखित केले.**

# ढगफुटीची वादळे, हिमालयाचे इशारा

पर्यावरण

**मिलिंद बेंडाळे**





गेल्या दोन महिन्यांमध्ये उत्तराखंड, काश्मीर आणि हिमाचल प्रदेशमध्ये घडलेल्या घटना लक्षात घेतल्या आणि त्याची दखल घेऊन निसर्गाशी होत असलेली छेडछाड थांबवली नाही, तर भविष्यात गंभीर परिणामांना सामोरे जावे लागू शकते, असे दिसून येते. पूर आणि भूस्खलन हे निसर्गाशी असंतुलन असल्याचे पुरावे आहेत.

मानवाने वेळीच काळजी न घेतल्यास निसर्गाला भयंकर रूप धारण करण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. गेल्या महिन्यात वारंवार घडलेल्या भूस्खलन, ढगफुटी, पूर या घटनांनी सध्याच्या विकासाच्या धोरणांवर आणि पद्धतींवर पुन्हा एकदा चर्चा जोर धरू लागली आहे. असे म्हटले जात आहे की, भूस्खलन, भूकंप आणि त्सुनामीसारख्या आपत्ती मानवाने निसर्गाशी आरंभलेल्या खेळाचा परिणाम आहेत. आपण विकासाच्या मार्गावर ज्या वेगाने पुढे जात आहोत, ते पाहता पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे, यात शंका नाही; पण निसर्ग वारंवार तडाखे देत असूनही आजही ते गांभीर्याने घेतले जात नाही. एकीकडे वैयक्तिक स्वार्थ पूर्ण करण्यासाठी नैसर्गिक संसाधनांचा अंदाधुंद वापर केला जात आहे, तर दुसरीकडे अवैज्ञानिक बांधकाम आणि वाढते प्रदूषण यामुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण होत आहे. जीवन आणि मालमत्तेचे नुकसान होण्याबरोबरच या आपत्तींचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर वाईट परिणाम होतो. एखादी आपत्ती येते, तेव्हा कोणतीही पूर्वसूचना देत नाही. ती अचानक येते आणि जीवित आणि मालमत्तेचे नुकसान करते. या आपत्तींमुळे मानवी, आर्थिक आणि पर्यावरणीय नुकसान होते. यातून सावरणे सोपे नसते. म्हणूनच सरकारी यंत्रणेसह आपण सर्वांनी आगाऊ तयारी केली पाहिजे.

हे खरे आहे की, कोणतीही आपत्ती रोखणे सोपे नाही; परंतु ते निश्चितपणे व्यवस्थापित केले जाऊ शकते. जगातील नैसर्गिक आपत्तींमुळे होणाऱ्या नुकसानीवरील संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, नैसर्गिक अपघातांमुळे भारताला दरवर्षी सुमारे ९.८ अब्ज डॉलर्सचे नुकसान सहन करावे लागत आहे. गेल्या दोन दशकांमध्ये हवामान चक्रात वेगाने बदल दिसून येत आहेत. यामुळे हिमनद्या वितळू लागल्या असून नद्यांमधील पाण्याची पातळी कमी होत आहे. इतकेच नाही, तर निसर्गाशी छेडछाड केल्याने पर्वतांचे नैसर्गिक सौंदर्य आपली ओळख गमावत आहे. बिघडत्या पर्यावरणामुळे पर्वतांमधील औषधी वनस्पती नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. पिके आणि फळांच्या उत्पादनावर त्याचा परिणाम होऊ लागला आहे.

विकासाच्या आंधळ्या शर्यतीमध्ये अंदाधुंद बांधकामे केली जात आहेत. जंगले नष्ट होत आहेत. पॅरिस हवामान करारात मान्य केलेल्या गोष्टी लागू करण्यापासून जग अजूनही खूप दूर आहे. अर्थात यासाठी लहान देशांवर दबाव वाढत आहे आणि अनेक विकसनशील देशदेखील या दिशेने ठोस कृती धोरण घेऊन पुढे येत आहेत; परंतु मोठे आणि विकसित देश त्याबद्दल गंभीर नाहीत.

जगभरात हवामानाच्या बिघडत्या स्वरूपाबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे. भारताने या दिशेने किती काम केले, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. अशा परिस्थितीत पॅरिस कराराची अंमलबजावणी करण्यासाठी वाढत्या जागतिक दबावाबरोबरच आपण निसर्गाप्रती आपल्या वर्तनाचाही आढावा घेण्याची ही महत्त्वाची वेळ आहे. नैसर्गिक संसाधनांचे अंदाधुंद शोषण करण्याऐवजी आपण अशा पर्यायांचा विचार केला पाहिजे, जे संपूर्ण मानवजातीला लोभ, स्वार्थ आणि मोठे असल्याचा अभिमान यापासून दूर नेऊन आनंदी जीवनाची खात्री देतील. पावसाळा येताच नद्यांना पूर येणे ही भारतात एक सामान्य बाब आहे. यासोबतच भूकंप, अतिवृष्टी, गारपीट, वादळ, चक्रीवादळ, भूस्खलन, हिमस्खलन, वीज आणि जंगलातील आगीसारख्या नैसर्गिक आपत्तींमध्येही वाढ होत आहे. यामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणात विनाश होतो. लोक मृत्युमुखी पडतात. या आपत्तींचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. म्हणूनच स्वतःला चिंतनापुरते मर्यादित न ठेवता पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने प्रत्यक्षात काम करणे महत्त्वाचे आहे. नैसर्गिक आपत्तींच्या संख्येत अमेरिका आणि चीननंतर भारत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. २१ व्या शतकाच्या सुरुवातीपासून भारतात अशा अनेक आपत्ती आल्या, ज्यांनी संपूर्ण देशाला हादरवून टाकले. २०१३ मध्ये केदारनाथमध्ये झालेल्या मोठ्या विनाशानंतर राज्यात अशा लहान-मोठ्या घटना सतत घडत आहेत.

याशिवाय २००४ मध्ये हिंदी महासागरात आलेली त्सुनामी, २००१ मध्ये गुजरातमधील कच्छमध्ये आलेला भूकंप आणि २०१४ मध्ये काश्मीरमधील आलेला पूर यासारख्या आपत्तींमध्ये मोठ्या संख्येने लोकांचे प्राण गेले आणि आतापर्यंत ही ठिकाणे त्यांच्या पूर्व-आपत्ती स्वरूपात पुनर्संचयित केलेली नाहीत. आपण या सर्व आपत्तींपासून कोणताही धडा घेतलेला नाही, असे दिसते. अशा आपत्ती शिकवतात की, आपण निसर्गाचा प्रकोप थांबवू शकलो नाही, तरी जीवित आणि मालमत्तेचे नुकसान कमी करणे अशक्य आहे. जग वेगाने शहरीकरणाकडे वाटचाल करत आहे. या प्रक्रियेत निसर्गाशी बरेच काही केले जात आहे. आपण आता जागे न झाल्यास भविष्यात गंभीर परिणाम होतील. कारण शहरांच्या विकासाबरोबरच, जगभरातील हिरवळीचे क्षेत्र कमी होत असून काँक्रीटची जंगले वाढत आहेत. एवढेच नाही, तर पर्यावरणाचा बिघाड होत आहे. हवामान संतुलन आणि हवामान चक्रातील बदलांमुळे वनस्पती आणि झाडांच्या अनेक प्रजातींव्यतिरिक्त प्राण्यांच्या अनेक प्रजातींचे अस्तित्वही धोक्यात आले आहे.

पर्यावरणाचा संबंध मानवी जीवनात महत्त्वाचा आहे. दोन्ही एकमेकांना पूरक आहेत. आपण विकासासमोर पर्यावरणाला बाजूला ढकलले आहे. सध्याच्या युगात मानवी विचारसरणी इतकी बदलली आहे की, भविष्याची चिंता केवळ कागदपत्रे आणि विधानांपुरती मर्यादित आहे. आपल्या कृतींमुळे आज माणूस निसर्गाचा नाश करत आहे. आपण अजूनही काळजी घेतली नाही आणि निसर्गाशी खेळणे थांबवले नाही, तर त्याचे धोकादायक परिणाम भोगण्यास तयार राहावे लागेल. पर्यावरणीय असंतुलनाचे वाढते धोके लक्षात घेता निसर्ग संवर्धनासाठी आपण आपल्या पातळीवर काय योगदान देऊ शकतो, याचा विचार करावा लागेल.

**सरकारनेही नियम आणि कायदे**

काटेकोरपणे अंमलात आणले पाहिजेत आणि पर्यावरण संवर्धनाबाबत व्यापक प्रमाणात जनजागृती केली पाहिजे. गेल्या काही वर्षांमध्ये डोंगराळ राज्यांमध्ये ढगफुटीच्या घटनांमध्ये खूप वाढ झाली. आतापर्यंत हिमाचल प्रदेशमध्ये ढगफुटीच्या ३५ घटना घडल्या आहेत. त्या गेल्या वर्षीपेक्षा जास्त आहेत. २०२४ मध्ये ढगफुटीच्या सुमारे २७ घटना घडल्या होत्या; परंतु यावेळी दीड महिन्यात गेल्या वर्षीचा आकडा मागे पडला आहे. ३० जूनपासून आतापर्यंतचा हा आकडा आणखी वाढू शकतो. कारण यावेळी पावसाळा जास्त काळ टिकण्याची अपेक्षा आहे.

सुमारे दीड महिन्यात इतका विनाश झाला आहे. हवामानतज्ज्ञांच्या मते यावेळी पाऊस सप्टेंबर महिन्यापर्यंत सक्रिय राहील. ही सूचना येईपर्यंत हिमाचल प्रदेशमधील कुल्लू जिल्ह्यातील गणवी येथे ढगफुटीमुळे प्रचंड नुकसान झाले. ढगफुटीच्या ३५ घटनांपैकी १९ घटना एकट्या मंडी जिल्ह्यात घडल्या. हवामान तज्ज्ञांच्या मते ढगफुटीची घटना शोधण्यासाठी कोणताही ठरावीक मापदंड नाही.

जेव्हा जेव्हा १०० मिलीमीटर प्रतितास पाऊस पडतो, तेव्हा ती ढगफुटीची घटना मानली जाते. याशिवाय मुसळधार पाऊस आणि पूरस्थितीला ढगफुटी असेही म्हणतात. शिमला जिल्ह्यातील रामपूरमध्ये ढगफुटीमुळे मोठे नुकसान झाले. पूर्वीही डोंगराळ राज्यांमध्ये पाऊस पडत असे; पण अशा प्रकारचा विनाश होत नव्हता.

या विनाशाला हवामान बदल आणि अवैज्ञानिक बांधकाम कारणीभूत आहे. अवैज्ञानिक खाणकाम आणि बांधकामामुळे या आपत्ती येत आहेत. डोंगराळ राज्यांमध्ये ढगफुटीच्या वाढत्या घटना आणि योजता येण्याजोगे प्रभावी उपाय तपासण्यासाठी केंद्रीय पथकाच्या अहवालाची प्रतीक्षा आहे. मंडी आणि शिमला येथील घटनांचा विविध तज्ज्ञांच्या पथकाने अभ्यास केला आहे. हे पथक केंद्रीय गृहमंत्र्यांना अहवाल सादर करेल. त्यानंतर पुढे काय उपाययोजना करायच्या, हे ठरणार आहे. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

---

सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

# बर्न आऊट

अँ ''भाऊजी, जमेल तेवढ्या लवकर या. यांना एक वेगळाच प्रॉब्लेम सुरू झालाय. मला काही कळत नाही. तुम्ही आलात तर बरे होईल.'' एका मोठ्या आयटी कंपनीमध्ये काम करणाऱ्या माझ्या एका जिवलग मित्राच्या बायकोचा फोन होता. बाराव्या वर्गात माझ्यासोबत विज्ञान शाखेत शिकणारा माझा हा मित्र. बारावीनंतर त्याने अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले व एका मोठ्या कंपनीत नोकरीला लागला. फार कमी अवधीतच त्याने छान प्रगती केली. पुण्याला स्वतःचा फ्लॅट, एक मोठी गाडी, परदेश दौरे, एक चांगला परिवार, बऱ्यापैकी बँक बॅलन्स इत्यादी आधुनिक काळातील प्रगतीची सारे मापदंड त्याने फार चांगल्या प्रकारे पूर्ण केले होते. अमरावतीच्या आपल्या मूळ घराशी तो फार चांगल्या प्रकारे जोडलेला होता.

वर्षातून एकदा घरी यायचेच; येताना सर्वांसाठी काही ना काही आणायचे. येथे आल्यावर सर्वांच्या भेटी घ्यायच्या, मित्रमंडळींसोबत वेळ घालवायचा अशा सर्व प्रकारे खरोखरीच एक छान व्यक्ती म्हणून सर्वांना परिचित होता. केवळ गेल्या काही वर्षांपासून कंपनीच्या कामाचा फार ताण वाढलाय हे वाक्य मात्र तो बोलत होता. आजकाल कामाचा ताण सर्वच क्षेत्रांमध्ये असतो. त्यातल्या त्यात खाजगी क्षेत्रामध्ये स्पर्धा असल्याने तो जरा जास्त असतो. मिळणाऱ्या प्रचंड पगाराच्या बदल्यात तो सहन करावा लागतो; किंबहुना ती मानसिकता सर्वांचीच असते. त्यामुळे आमच्यापैकी कुणालाच त्याच्या त्या वाक्याचे फार काही वाटायचे नाही. परंतु त्याच्या त्या वाक्याचा अर्थ मला तेव्हाच कळला जेव्हा वहिनीचा फोन आला. अचानक इतके काय झाले, याचा विचार करीतच मी माझे जाणे निश्चित केले. त्याच्या गावाला पोहोचेपर्यंत त्याच्या त्या वाक्याचाच विचार मी करू लागलो. तो सांगायचा, परदेशात जाण्याचे कौतुक संपले, मोठमोठ्या फाईव्ह स्टार हॉटेल्सचेदेखील कौतुक संपले. खरे तर ज्या सर्व गोष्टी मी मिळविल्या आणि ज्याचे सर्वांनाच फार कौतुक वाटते, त्याचे माझ्या मनातील अप्रुप संपले.

आता मला केवळ शांतता हवीय... आज त्याच्या गावाला जाताना मला त्याच्या बोलण्याचे संदर्भ लागत होते. त्याला भेटल्यावर मात्र मी अंदाज केल्यापेक्षाही त्याची स्थिती वाईट होती. पहिले तर मला घट्ट मिठी मारून लहान मुलासारखा रडू लागला. साधारण १५ मिनिटे मी त्याला शांत होऊ दिले. त्याचा नेहमीचा प्रसन्न चेहरा आता मात्र बघवत नव्हता. त्याचा तो आवेग शांत झाल्यावर मी त्याला विचारले, ''काय झाले तुला?'' माझ्या मानसशास्त्राच्या अभ्यासाच्या मदतीने मी त्याच्या समस्येबद्दल काही आडाखे बांधले होते. परंतु निर्णयाप्रत येण्यासाठी मला त्याचे ऐकायचे होते. तो मला नेमका प्रॉब्लेम सांगू लागला. त्याने जे काही संगितले ते वेदनादायी तर होतेच; त्याहीपेक्षा चिंताजनक होते. ४५ वय असताना आणि आयुष्य अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर असताना एखाद्या तरुण माणसाच्या जीवनात अशी समस्या उद्भवत असेल तर आपण आपल्या कार्य पद्धतींचा नव्याने विचार करण्याची नितांत गरज आहे, असे मला वाटले. तो मला कधी रडत, कधी खिन्न होत तर कधी खूप आक्रमकपणे हे सारे सांगू लागला.

''यार, याची सुरुवात झाली एका घटनेने. त्या दिवशी पेट्रोल पंपावर गाडीत पेट्रोल भरले आणि मी पैसे देऊन गाडीत येऊन बसलो आणि मलादिसणेच बंद झाले. काहीच दिसेना आणि काही वेळातच माझी शुद्ध हरपली. साधारण १५ मिनिटांनी शुद्ध आली तेव्हा मी त्या पेट्रोल पंपाच्या ऑफिसमध्ये झोपलेला होतो. मला दिसू लागले होते. मी घरी आलो. काही तपासण्या केल्यावर पुन्हा काम सुरू केले.

खरे तर तो अलार्म होता, या आताच्या समस्येचा. आता स्थिती अशी आहे की, मी कॉम्प्युटरकडे बघूच शकत नाही. वेळी-अवेळी प्रचंड डोके दुखते. रात्री झोप लागत नाही, कधी कधी तर चार चार तास मी टक्क जागा असतो. मग रडायला लागतो. कधी फार जास्त भूक लागते तर कधी लागतच नाही.

कॉम्प्युटर नाही म्हणजे माझे कामच नाही; सोबतच मला आजकाल कोणत्याही गोष्टीची फार भीती वाटते. मी कशालाही घाबरायला लागलोय. अन्विता ऑफिसला जाते. ती परत येईपर्यंत तिचा अपघात तर होणार नाही किंवा मला हार्ट अटॅक तर येणार नाही अशा वेगवेगळ्या काळज्या आणि भीती मला त्रस्त करीत आहेत. कशातच मन लागत नाही. कामावर जाऊच शकत नाही म्हणून एक महिन्याची सुटी घेतलीय. आता मी परत काम करू शकेल की नाही, याची खात्री वाटत नाही. पण मी काम केले नाही तर माझ्या जबाबदाऱ्या कशा पूर्ण होणार? मी काय करू...?'' असे म्हणून तो पुन्हा रडू लागला. त्याची अवस्था बघून माझ्या अभ्यासाच्या मदतीने मी अन्विता वहिनींना सांगितले, ''वहिनी, इट्स अ केस ऑफ बर्न आऊट.''

होय. माझा मित्र बर्न आऊट नावाच्या एका विचित्र परंतु झपाट्याने वाढणाऱ्या आजाराचा शिकार झाला होता. शिकारच; कारण बर्न आऊट हा आजार नाही तर ते एक जाळे आहे; ज्यात अनेक तरुण-तरुणी हल्ली अडकायला लागले आहेत. मानसोपचार तज्ज्ञ आम्हाला तेच सांगत होते. कामाचा प्रचंड ताण, दिलेल्या वेळात टारगेट पूर्ण करण्याची सक्ती, त्या सक्तीमुळे नोकरीवर सतत टांगती तलवार, परफॉर्मन्स नसेल केली जाणारी अवहेलना, परदेशातील क्लायंट्ससोबत काम करताना त्याच्या वेळेनुसार केलेली जागरणे, व्यवस्थापनाची बदलणारी धोरणे, लांगूलचालन करणाऱ्यांना मिळणारा अतिरिक्त लाभ, काम करणाऱ्यावरच अतिरिक्त कामाचे ओझे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संगणकाचा अतिरेकी वापर या सर्व बाबींच्या एकत्रित परिणामामुळे माझ्या त्या मित्राची अवस्था झाली होती. त्याहून हादरवून टाकणारी बाब म्हणजे ते मानसोपचर तज्ज्ञ म्हणाले की, त्यांच्याकडील बर्न आऊट केसेसचे प्रमाण गेल्या चार-पाच वर्षांत जवळपास चार-पाच पट वाढलेय आणि वेदनादायी गोष्ट म्हणजे या रुग्णांमध्ये सर्वच वय वर्षे २५ ते ३५ या वयोगटातील तरुणतरुणी आहेत.

माझ्या मित्राचा सहा महिन्यांचा इलाज त्यांनी करण्याचे ठरविले. शक्यतोवर अशा पद्धतीचा जॉब त्याने पुढे करू नये, असे त्यांनी सुचविले. तो नंतरचा भाग होता. त्याचा इलाज सुरू झाला, मी मात्र मनातून या समस्येचा विचार करून हादरून गेलो. सखोल विचार करता असे जाणवले की, बदलत चाललेली परिस्थिती बघता ही समस्या कमी-अधिक प्रमाणात सर्वच क्षेत्रांमध्ये येऊ शकते. या समस्येने अक्राळ-विक्राळ रूप धारण करून आपल्या तरुण पिढ्या गारद करण्याआधी आपल्या कार्यक्षेत्रातील व्यवस्था बदलायला हव्यात.

सरकारी असो अथवा खाजगी, सर्वच क्षेत्रामध्ये कमी होत जाणारे मनुष्यबळ व त्यामुळे उपलब्ध कर्मचाऱ्यांवर येणारा कामाचा ताण प्रचंड वाढतोय. कामांचे ओझे वाढत आहे, त्यामुळे निर्माण होणाऱ्या ताण नियोजनाकरिता व्यवस्था काहीच करीत नाही. ताणनियोजनाचे प्रशिक्षण दिले जात नाही. मनःस्वास्थ्य चांगले राहील याकरिता प्रक्रियांचे सुलभीकरण कुणी करीत नाही.

कामांची समान वाटणी केली जात नाही. अवाजवी स्पर्धा व माणसांचे श्रम हे थेट नफ्याशी जोडल्यामुळे कर्मचाऱ्याकडे माणूस म्हणून न बघता व्यावहारिकतेच्या भूमिकांमधून बघितले जाऊ लागले. या साऱ्या बाबींचाच परिणाम म्हणजे बर्न आऊटसारखी समस्या आपल्या उंबरठ्यापर्यंत पोहोचली आहे. माणसामध्ये कार्य करण्याची प्रचंड क्षमता असली, तरी त्याचे श्रम हे त्याच्या मानसिक स्वास्थ्यासोबत जोडलेले आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. वयाच्या तिशीमध्ये शारीरिकदृष्ट्या अनेक कामे करेलही, परंतु कामांच्या अतिताणामुळे तो मानसिकदृष्ट्या खचला तर मात्र माझ्या मित्राप्रमाणे अवस्था होण्याची भीती राहू शकते. कामासाठी जळणे ही कर्तव्यरूप भूमिका असली, तरी त्यामुळे आयुष्य जळून जायला नको, याची काळजी करणे गरजेचे आहे.

---

संस्कारांच्या देशा

**रमा गोळवलकर**

# अन्नसंस्कार -२ जाणिजे यज्ञ कर्म

पृथ्वीचा 'गोल' स्वतःभोवती फिरत सूर्याला लंबगोलाकार कक्षेत प्रदक्षिणा घालत असतो. पृथ्वीला उत्तर आणि दक्षिण गोलार्धात विभागणाऱ्या शून्य अक्षांश उपाख्य विषुववृत्त रेषेशी तिचा अक्ष २३.५ अंशांचा कोण साधून आहे तर भारताची मुख्य भूमी विषुववृत्तापासून उत्तरेकडे ८०४' उत्तर ते ३७०६' उत्तर अक्षांश आणि ६८०७' पूर्व ते ९७०२५' पूर्व अशी पसरलेली आहे. तीन बाजूंनी समुद्र आणि उत्तरेला अत्युच्च हिमालय पर्वत या प्रमुख भौगोलिक वैशिष्ट्यांसह विषुववृत्तापासून असलेला वैशिष्ट्यपूर्ण अंतर आणि त्याच्याशी पृथ्वीच्या अक्षानं साधलेला कोण या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे भारताचं वातावरण.

श्रीकृष्णरूपी विष्णूला अर्पण केलेला छप्पनभोग



एका वर्षाच्या १२ महिन्यात ६ ऋतू येतात. ऋतू हा शब्द वैदिक काळापासून प्रचलित आहे. ऋत या मूळ शब्दाचा अर्थच एखादा निश्चित क्रम, नियत समय किंवा अवधी असा होतो. त्यापासून सिद्ध झालेल्या ऋतू या शब्दाचा सर्वाधिक प्रयोग वैदिक लोक यज्ञाकरिता योग्य काळ या अर्थानं करत. भारतीय कालगणनेची सुरुवात वसंत ऋतूनं चैत्र महिन्यात होते. वातावरण समशीतोष्ण (ना थंड ना गरम) असतं. झाडांना नवी पालवी फुटते. नवा बहर येतो तर ग्रीष्म ऋतूत सूर्य थेट विषुववृत्तावरच तळपत असतो. परिणामी प्रखर उष्णता असते. विषुववृत्ताच्या बऱ्याच खालपर्यंत पसरलेल्या हिंद महासागराच्या पाण्याचं बाष्पीभवन होतं. उत्तर गोलार्धात कोणतीही चक्राकार क्रिया डावीकडून उजवीकडे होते तर दक्षिण गोलार्धात ती विरुद्ध दिशेने म्हणजे उजवीकडून डावीकडे होत असते.

साहजिकच पर्जन्य भरलेले ढग घेऊन डावीकडून उजवीकडे वाहणारे वारे विषुववृत्त ओलांडताच उजवीकडे वळतात आणि नैर्ऋत्य दिशेनं भारताच्या मुख्य भूमीत प्रवेश करतात. त्यामुळे भारतात आषाढ श्रावण आणि भाद्रपदाचे काही दिवस या विशिष्ट काळासाठीच पावसाळा असतो. उरलेला भाद्रपद, आश्विन आणि कार्तिक हे महिने आहेत समशीतोष्ण शरद ऋतूचे. त्यानंतर येणारे मार्गशीर्ष आणि पौष हे महिने हेमंत आणि माघ फाल्गुनचा काही भाग शिशिर ऋतूचे असतात. हेमंत ऋतूत वातावरणात कोरडेपणा, कडाक्याची थंडी असते.

शिशिर ऋतूत पानगळ होऊन सगळी वृक्षवल्ली निष्पर्ण होते. अशा प्रकारे सहा ऋतूंत पर्यावरण बदलत जातं. हे असलं वातावरण पृथ्वीवर इतर कोणत्याही भूभागात अनुभवता येत नाही. त्याचा परिणाम असा झाला की, भारतीय उपखंडातील वृक्षराजीत अपरिमित वैविध्य आढळतं. दक्षिण भारतात कावेरी नदीच्या खाली तिन्ही बाजूंनी समुद्राचं सान्निध्य आहे. जास्तीत जास्त २०० किलोमीटर अंतर पार केलं की समुद्रदर्शन शक्य आहे. त्यामुळे तिथली वनस्पती विविधता वेगळी आणि हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या भूभागातली वेगळी. गंगा-यमुना या नद्यांच्या आणि ब्रह्मपुत्र या नदीचं खोरं असलेल्या प्रदेशातली त्याहून वेगळी. हा सगळा विचार केल्यानंतर आपल्याकडे खाण्यापिण्याचे इतके प्रकार का आणि कसे, याचं कोडं सहज उलगडतं. अगदी ढोबळ मानानं सांगायचं झालं तर कोणत्याही वनस्पती म्हणजे गहू, तांदूळ, डाळी, कडधान्य, भरड धान्य (मिलेट्स), फळं, फळभाज्या, पालेभाज्या या सगळ्यांत किमान १२ उपजाती इथे विकसित झालेल्या आढळतात. उदाहरणार्थ भरड धान्याचे अंदाजे १६ प्रमुख प्रकार भारतात पिकतात. त्यातले १२ तरी नेहमीच्या वापरातले आहेत.

प्रत्येक वनस्पतीच्या किमान १२ उपजाती आणि श्रीविष्णूंचा आवडता अंक १२ असणं हा निव्वळ योगायोग नाही. कोणत्याही सजीवाचं अस्तित्व हे शरीर आणि आत्मा या दोन स्वतंत्र पण परस्परपूरक घटकांवर अवलंबून असतं. काया आत्मा धारण करते आणि आत्मा कायेला जिवंत ठेवतो. या दोन्हीला एकत्र ठेवण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते. या सगळ्यात धारणा म्हणजे धारण करण्याची शक्ती कार्यरत असते. ही धारणा शक्ती श्रीविष्णूंच्या असंख्य गुणांपैकी मुख्य गुण आहे. ज्या कोशात आत्मा धारण केला जातो तो अन्नमय कोश श्रीविष्णूंचाच अंश आहे, असं आपली परंपरा मानते. परिणामी अन्नकूट, छप्पनभोग यांसारखा विधी श्रीविष्णूशीच संबंधित असतो. इथे विचारांचं एक आवर्तन पूर्ण होतं. सूर्यनारायण पूषा या रूपात सर्व प्रकारच्या अन्नधान्यांत निवास असतो. याच्यामुळेच अन्नात स्वाद, रस, पौष्टिकता आणि ऊर्जा हे गुण असतात. त्या अन्नातून घडलेला अन्नमय कोश म्हणजे शरीर हे सर्व प्रकारची कर्तव्य करण्याचं माध्यम आहे. हे शरीर धारण केलेलेच लोक समाजाची धारणा करीत असतात. हेच ते विष्णुनारायणाचं रूप. हा समाज सुरळीत चालविण्यासाठी शरीराच्या माध्यमातून चार पुरुषार्थ साधायचे असतात. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' (कालिदास, कुमार संभव ५.३३) (शरीर हेच धर्माचे पहिले साधन आहे).

अशा या शरीराची जोपासना करण्यासाठी खाल्लेलं अन्न हे यज्ञकर्म करण्यासारखंच आहे. म्हणून आपण मराठी भाषिक जेवणापूर्वी एक श्लोक म्हणतो -

**'वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरिचे।**
**सहज हवन होते नाम घेता पुषाचे।**
**जीवन करि जीवित्वा अन्न हे पूर्णब्रह्म।**
**उदर भरण नोहे जाणिजे यज्ञकर्म।।'**

(श्रीहरीचे नाव घेत घास घ्या, पूषाचे नाव घेतले तर आहुतीचं पुण्य लाभेल. जीवनाचं कारक जीवित्व म्हणजे प्राण आणि शरीराला एकत्र ठेवणं त्याला हे अन्न कारणीभूत आहे म्हणून ते पूर्णब्रह्म आहे. त्यामुळे जेवणे हे केवळ पोट भरणे इतकीच क्रिया नसून ते यज्ञकर्मच आहे असे जाणावे.)

यातल्या दुसऱ्या चरणात आपण 'फुकाचे' म्हणून जातो. श्रीहरीचं नाव फुकट घेतल्यानं हवन केल्यासारखं होतं, असा अर्थ सांगतो. परंतु त्यात 'पूषा' या वैदिक देवतेचं नाव घेतलं की, इतर कोणत्याही अवडंबराशिवाय सहज आहुती देण्याची कृती घडते, असं म्हटलेलं आहे. यजुर्वेदी शाखेचे विद्वान 'ष' या अक्षराचा उच्चार 'ख' असा करतात. पूषाचा उच्चार 'पूखा' असा होतो. वेदोच्चारांशी आपली नाळ तुटल्यानंतर 'पुखाचे' या शब्दाचा अर्थ लागेना म्हणून 'फुकाचे' हा पाठभेद निर्माण झाला. थोडक्यात पोटाची खळगी भरणं पासून सुरू झालेली ही वैचारिक उत्क्रांती भोजनाला यज्ञाची श्रेणी देण्यावर येऊन थांबते.



# वस्त्र विणिले पांडुरंगे...

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

कवी पी सावळाराम यांचं 'धागा धागा अखंड विणू या' हे अतिशय अप्रतिम गाणं आशा भोसले यांनी इतकं गोड आणि जीव ओतून म्हटलं आहे की त्यातील भाव थेट मनाला भिडतो. कितीही वेळा ऐकलं तरी पुन्हा पुन्हा ऐकत राहावंसं वाटतं. या गाण्यात म्हटल्याप्रमाणे, अक्षांशाचे रेखांशाचे उभे आडवे गुंफून धागे, विविधरंगी वसुंधरेचे वस्त्र विणिले पांडुरंगे...पांडुरंगाचं केलेलं हे वर्णन आपल्या भारतवर्षाला फार चपखल लागू पडतं. केवढा विशाल हा देश!

आसेतु हिमाचल पसरलेला. विविध राज्यं, विविध भाषा, विविध संस्कृती. पण विठ्ठलरूपी धाग्यानं हा देश अखंड जोडला गेला आहे. आषाढी एकादशी जसजशी जवळ येते, तसतसे वारकर्यांना वेध ते विठुरायाच्या दर्शनाचे. आणि या वारीने भारतदेश जोडला गेला आहे. पंढरपूर महाराष्ट्रात आहे आणि वारीही होते महाराष्ट्राच्या पवित्र भूमीवर. पण म्हणून केवळ महाराष्ट्रातीलच लोक वारीला जातात असा आपला समज असेल तर तो चुकीचा आहे. म्हणूनच वरील गीतात म्हटल्याप्रमाणे या देश विठ्ठलभक्तीचा उभ्या आडव्या धाग्यांनी जोडला गेला आहे. विठ्ठलानेच हे सुंदर वस्त्र विणलं आहे.

भारतातील जवळपास सगळ्याच राज्यातील लोक वारीला येतात. वारीत भारताच्या एकात्मतेचे दर्शन घडते. सारे भेद मावळतात. सगळ्यांची जात एक, सगळ्यांचा धर्म एक. सगळ्यांची जात वारकरी. सगळ्यांचा धर्म, कर्म, मर्म आणि वर्म फक्त एक तो पांडुरंग. कर्ममार्गाचा काळा आणि ज्ञानमार्गाचा गोरा रंग एक होतो त्या सावळ्याच्या रंगात. सगळे त्या सावळ्या सगुण रूपात रंगून जातात. 'भेटीलागे जिवा लागलीसे आस' असं तुकाराम महाराज म्हणूनच म्हणतात. विटेवर उभा असलेला हा सावळा विठल कसा आहे त्याचं वर्णन तुकोबाराय फार सुंदर करतात.

**सुंदर ते ध्यान उभे विटेवरी। कर कटावरी ठेवूनिया।। तुलसीहार गळा कासे पितांबर। आवडे निरंतर हेचि रूप ।।**

**मकर कुंडले तळपती श्रवणी। कंठी कौस्तुभ मणी विराजित।। तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख। पाहीन श्रीमुख आवडीने।।**

असा हे सावळे परब्रह्म ज्या पुंडलिकामुळे विटेवर उभे राहिले, त्याचे सगळे संत ऋणी आहेत. त्याच्यामुळे गेली 'युगे अठ्ठावीस विटेवरी' तो उभा आहे. भक्तांना दर्शन देतो आहे, त्यांच्या मनोकामना पूर्ण करतो आहे.

ज्ञानेश्वर माउलींनी तर त्याला ' कानडा हो विठ्ठलु' असं म्हटलं आहे. हा अभंग ऐकल्यानंतर आपल्याला असे वाटते की विठ्ठल हा मूळचा कर्नाटकातील असावा. पंढरपूरपासून कर्नाटकाची सीमा जवळच आहे. कर्नाटकातील विजयनगर साम्राज्याची जी हंपी ही राजधानी होती, तिथे विठ्ठलाचे सुंदर मंदिर आहे. कर्नाटकमधील संत पुरंदरदास हे विठ्ठलभक्त होते. त्यांच्या प्रत्येक अभंगाचा शेवट 'पुरंदर विठ्ठला' या शब्दाने होते. या मंदिरात किंवा या ठिकाणी विठ्ठलाने वास्तव्य केले होते असे कर्नाटकमधील भाविक मानतात. परंतु 'कानडा' या शब्दाचा अर्थ संत साहित्याचे अभ्यासक आणि प्रसिद्ध संगीतकार हृदयनाथ मंगेशकर म्हणतात त्याप्रमाणे 'कानडा' म्हणजे अगम्य, न कळणारा असा असावा. म्हणूनच संत नामदेव म्हणतात, 'वेदांसी कानडा श्रुतीसी कानडा'. वेद आणि श्रुतींनाही न कळणारा असा तो आहे. पांडुरंग म्हणजेच श्रीविष्णूचा आठवा अवतार असे मानले जाते.

विष्णू या शब्दावरून विष्ठु, इठ्ठू, विठू, विठोबा असे अपभ्रंश होत गेले. तो विटेवर उभा आहे म्हणूनही त्याला विठ्ठल म्हटलं जातं. पण काही असो, या सावळ्या विठूरायानं भक्तांना वेड लावलं आहे. कर्नाटकामधून आजही हजारो भाविक नियमितपणे वारीला येतात. पण केवळ कर्नाटकच नव्हे, तर आंध्र प्रदेश, तेलंगणा, तसेच उत्तर प्रदेश, पंजाब अशा विविध राज्यातून हजारो भक्त नियमितपणे या वारीसाठी येतात. शेकडो मैलाचे अंतर ते पार करतात. आळंदीला येतात आणि तेथून वारीबरोबर निघतात. म्हणूनच विठ्ठलनामाने अवघा भारत जोडला आहे. ही पाहण्यासाठी, अनुभवण्यासाठी परदेशातूनही भाविक येतात. आणि म्हणूनच वारी केवळ महाराष्ट्राची न राहता विश्वव्यापक होते. आमचे नामदेवराय म्हणतात, **पंढरीचा वास चंद्रभागे स्नान। आणिक दर्शन विठोबाचे।।** त्यांना दुसरे काही नकोच आहे. ते पुढे म्हणतात, **हेचि घडो मज जन्मजन्मांतरी। मागणे श्रीहरी नाही दुजे।।** पंढरीचा वास आणि चंद्रभागेचे स्नान आपल्याला जन्मोजन्मी घडो हेच नामदेवराय देवाकडे मागतात. त्यांना धनसंपत्ती, मोक्ष मुक्ती वगैरे काही नकोच आहे. अष्टौप्रहर मुखात पांडुरंगाचे नाम असावे, विठुरायाच्या चरणी लीन झालेल्या संतांचा सहवास घडावा आणि जनता जनार्दनामध्येच पांडुरंग आहे असा मनाचा नित्य भाव असावा. खरंच, किती साधं सोपं मागणं मागताहेत नामदेवराय पांडुरंगाकडे.

**मुखी नाम सदा संतांचे दर्शन। जनीं जनार्दन ऐसा भाव।।** पांडुरंगाच्या महाद्वारी नित्य प्रेमाने कीर्तनाचा गजर होवो आणि तो पाहण्याचे, ऐकण्याचे भाग्य मला लाभो हीच त्यांची इच्छा. **नामा म्हणे तुझे नित्य महाद्वारी। कीर्तन गजरी सप्रेमाचे।।** सगळ्या संतांचे याबाबत एकमत आहे. विठ्ठलाचे दर्शन आणि नामस्मरण यापरते त्यांना काही नकोच आहे. नियमितपणे पंढरीच्या वारीला जाणार्या वारकऱ्यांना तरी वेगळे काय हवे असते? ऊन, पाऊस, तहानभूक यासारखे भौतिक ताप सहन करून वारकरी पंढरीला जातो, तो विठ्ठलाच्या ओढीनेच. अंगात पांढरा पोशाख, गळ्यात तुळशीची माळ, कपाळी गंध बुक्का तो धारण करतो. हेच त्याचे अलंकार. विठ्ठलनामाचा गजर हाच त्याचा धर्म.

वारीमध्ये श्रीमंत गरीब, उच्चनीच, स्त्रीपुरुष, आबालवृद्ध सहभागी होतात. पण तिथे सगळे भेद मावळतात. सगळे एकमकांसाठी पांडुरंगाचे रूप असतात. प्रत्येकजण दुसर्याला माउली संबोधतो. वारी ही समानतेचं शिक्षण देणारी बिन भिंतींची पाठशाळा आहे.

विठुरायाच्या दर्शनासाठी एवढे कष्ट सोसून जाणारा आमचा वारकरी किती अल्पसंतुष्ट आहे! विठुरायाचं दर्शन होईल न होईल, तो केवळ मंदिराच्या कळसाचे दर्शन झालं तरी समाधान पावतो. रस्त्यानं चालताना होणार्या विठू नामाच्या गजरामुळे, टाळ मृदूंगामुळे वातावरणात एक विलक्षण ऊर्जा निर्माण होते. ती ऊर्जा तो अंतरी साठवत असतो.

नामस्मरणाने अंतःकरण पवित्र होत जातं. नाचत नाचत, गात गात वाटचाल करताना पंढरी केव्हा जवळ येते ते कळत नाही. रस्त्यावरील काटेकुटे, दगड यांची जणू फुलं होत जातात. आपल्या साऱ्या काळज्या, विवंचना तो विठ्ठलाच्या चरणी अर्पण करतो. विठूमाऊली त्याचं हृद्गत समजून घेते. कारण ती भक्तांची माउली आहे. भक्तांना ती प्रेमानं जवळ घेते. हाती कोणतंही शस्त्र नसलेलं देवाचं एक अनोखं रूप म्हणजे विठ्ठल. प्रेम आणि भक्तिभावाची शिकवण देणारं हे विठ्ठलाचं रूप आपल्या भारतीय संस्कृतीचं एक वैशिट्य आहे. लाखो भक्तांचा सागर तर आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपुरात जमतोच पण जे भक्त पंढरीला जाऊ शकत नाहीत असे कोट्यवधी भक्त गावोगावच्या मंदिरात जाऊन त्याचं 'कर कटेवर असलेलं सावळं रूप' डोळ्यात साठवून घेतात. विठ्ठल फक्त पंढरीतच आहे असं नाही, तो सर्वव्यापी, सर्वसाक्षी आहे. तो निर्गुणही आहे आणि सगुण साकारही आहे. फक्त आपल्याजवळ 'दृष्टी' असली की त्याला पहाता येईल.



## म्हणूनी वारीचा । पाईक मी ।।

यातनाचे भय ।आम्हा काय वाटे ।।
यत्नाचे दीवटे । आम्हा हाती ।।१।।

कठोर साधना । आम्हा ठायी वसे ।।
तया कैसे पीसे । लागे सांगा? ।।२।।

नको मना अती । करू रे विचार ।।
अंगी सदाचार । जागा ठेवी ।।३।।

हरिनामा संगे । झाली सोयरिक ।।
म्हणूनी सोशिक । देह झाला ।।४।।

सारा भार साहे । विठ्ठल आमुचा ।।
म्हणूनी वारीचा । पाईक मी ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## आहे कुणी का आपला?

ढाळायचे आहेत अश्रू दे तुझा खांदा मला
कोरडे आयुष्य आहे काय मी देऊ तुला?
पाना फुलांनी बहरल्या वेली उन्हाने करपल्या
हात द्या हातात कोणी आहे कुणी का आपला
गर्द संध्याकाळच्या दाट झाल्या सावल्या
दीप लावा अंगणी मेघात चंद्र लोपला
पाखरे होती छतावर खायला दाणे दिले मी
आज मी आहे भुकेला घास द्या ओठी मला
वेळ सोनेरी न आता मी भिकारी पोरका
चार शब्द बोलण्याला मित्र द्या कोणी मला

विजय पांढरीपांडे

## विजिगीषा

जगण्याखातर दौडत नेले पोळ्यांनी
मरणे नंतर ठरवत नेले गोळ्यांनी
काहीहीपण करवत नेते विजिगीषा
सावज धरण्या कैद कबुलली कोळ्यांनी
कष्ट कुणाचे गणले नाही येथे बस
आकाराने ऐपत वदली झोळ्यांनी
एकाकीपण वाटे 'हरणे', तेव्हा तर
मुंगी काय नि हत्ती, राही टोळ्यांनी
माती सोबत सोनं सुद्धा गोटा पण
एकल होते तेव्हा विकते तोळ्यांनी
जाण्याबद्दल बोलत होते ओठ तरीही
पुन्हा येण्या सांगितले त्या डोळ्यांनी

धनश्री धारकर

# वऱ्हाडी सण काल आणि आज

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)



विदर्भाची संस्कृती लहान-थोर माणसांचा कायम चहाळ असलेली ऐसपैस आणि आतिथ्यशील संस्कृती आहे. वऱ्हाडात कायम उत्सवाचं वातावरण असतं. अजूनही गणपती-महालक्ष्मीचे वेध लागल्यावर नातेवाईकांनी घर नुसतं ओसंडून वाहतं. एक मजेशीर गोष्ट आहे...

श्रीकृष्ण रुक्मिणीच्या विवाहाला भरपूर वऱ्हाडी आले होते आणि ते येथेच कायमचे रमले. त्यामुळे विदर्भाला 'वऱ्हाड' म्हणतात. वऱ्हाडी लोक जेथे रमतात अशा आपल्या विदर्भात सणउत्सवांची जुनी थोर परंपरा आहे. हे उत्सव जुन्या काळातही धूमधडाक्यात साजरे केले जात असत. रघुजी भोसल्यांची सत्ता १७३० च्या सुमारास नागपूर येथे प्रस्थापित झाली. तेव्हापासून वऱ्हाडातली सण-उत्सवांची सांस्कृतिक परंपरा आपल्याला जाणता येते. पण खऱ्या अर्थाने १८ व्या शतकाच्या मध्यावर नागपुरात सण-उत्सव पर्व सुरू झाले.

इ. स. १८५४ रोजी चौथे रघुजी सज्ञान झाले आणि भोसला इस्टेटीचे सर्व अधिकार त्यांना बहाल झाले. ते अतिशय धार्मिक व सर्व सण-उत्सव नेमाने साजरे करणारे होते. यामुळेच म्हणतात की, भोसले काळात गणपती-नवरात्राम ध्ये कथा, कीर्तने, ललिते, दंढारी, कुस्त्यांचे फड, तमाशे, यात्रा यांची लयलूट असायची.

नवरात्र-दिवाळीत जुवा खेळणे हा धार्मिक विधी समजला जायचा. 'इकडे दिवाळीत जुवा खेळायची चाले बहुत आहे. रात्री दोन प्रहर पावेतो जुवा खेळत होते.' ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये सण-उत्सवांच्या आठवणी अवखळपणे लपंडाव खेळतात. या उत्सवांमध्ये 'झुंज' हा प्रकारही अतिशय लोकप्रिय समजला जाई.

गावागावांमधून लोक झुंज पाहायला येत. 'बाहेरील चौकात खासे मंडळी व मुछदी मंडळी बसून राजेश्री रघोजी भोसले याचा हाल्या व राजेश्री खंडोजी भोसले यांचा हाल्या आणून टक्कर लावली. येक प्रहरभर झुंजत होते,' असे ऐतिहासिक पत्रांमध्ये उल्लेख आहेत. हत्ती आणि वाघाच्या झुंजी तसेच कोंबड्यांच्या झुंजी वऱ्हाडात लोकप्रिय होत्या. विशेषतः सक्करदऱ्यावरच्या कोंबड्याच्या झुंजी पाहायला लांबून लांबून मंडळी यायची. 'तिसरे प्रहरी स्वारी शहराबाहेर गावाजवळ चार वाघ व पन्नास-साठ हाती घेऊन लढाई लावावयास गेले. तेथे घोड्यावर उभे राहून वाघ जकडून टाकले होते,' असे उल्लेख पूर्वीच्या दस्तऐवजामध्ये येतात. हे खेळ बाबूळखेड्याच्या शेतात आणि आजच्या धंतोलीच्या ठिकाणी होत असत. बरेचदा वाघ आणि हत्तींवर शिकाऊ कुत्री सोडून झुंज लावली जायची. कुस्त्यांचे फड नागपंचमीला रंगायचे. दारादारात गारुडी यायचे. नागोबाला वाटीभर दुधाचा नैवेद्य दाखवला जायचा. दिंडाचा खमंग वास घराघरातून येई.

आपल्याकडे वारुळाला जाणे म्हणजे एक सामूहिक संस्कृती होती. अठरापगड जाती-जमातीच्या स्त्रिया मिळून-मिसळून वारुळ पुजण्यासाठी जायच्या. 'आली वर्षाची पंचीम, आत्या मी जाऊ का वारुळाला' म्हणत आयाबाया शेतात वारुळाभोवती फेर धरायच्या. बैलांचे पट पोळ्याच्या सुमाराला व्हायचे. श्रावणी अम ावास्येला बैलपोळा सजतो. वऱ्हाडात आजही प्रत्येक स्वयंपाकघरातून पुरणपोळीचा गोडसर खमंग वास येत असतो आणि तो त्या काळीही यायचा. खांदेमळणी करून सायंकाळी बैलांच्या खांद्याला हुरमूज मळला जातो. बैलपोळ्याची दर्शपिठोरी अमावास्या म्हणजे श्रावण आणि भाद्रपदामधला संधिकाल. बैलपोळ्यापासून अनंत चतुर्दशीपर्यंत अनेक सण एकमेकांना बिलगून उभे असायचे आणि अवघं वऱ्हाड पुरणावरणाच्या ताटाने, मुदीच्या भाताने सुस्तवायचं.

या सण-उत्सवांमधला पूर्वापार चालत आलेला समान दुवा म्हणजे गल्लीबोळातून उत्साहाने काढण्यात येणाऱ्या मिरवणुका. तान्ह्या पोळ्याला सकाळी दहा वाजेपासूनच मारबती सुरू व्हायच्या. बोंबा मारत इतवारीच्या मोहल्यांमधून मारबती आजही दिमाखाने मिरवतात. सोबत बडगेही असतात. गर्दीत हरवून विस्फारलेल्या डोळ्यांनी मारबत पाहणं म्हणजे वैदर्भीय संस्कृतीचा भव्य-दिव्य सोहळा अनुभवणं असतं. मोठे कान, बटबटीत डोळे, लांब जीभ असलेली भली मोठी काली मारबत जागनाथ बुधवारीच्या तेली समाज बांधवांनी १८८५ साली सुरू केली.

काळी मारबत त्याच्या चार वर्ष अगोदर १८८१ साली सुरू झाली. कपाळावर भलं मोठं कुंकू, हाताच्या कोपऱ्यापर्यंत लावलेली मेंदी, गळाभर ल्येवलेले हार, लपेटलेला शेला अशी ही पिवळी मारबत नेहरू पुतळ्याजवळ काळ्या मारबतीला भेटते तेव्हा लोकांच्या आनंदाला उधाण येते. दुष्ट आणि सुष्ट प्रवृत्ती दोन्ही शक्तीचीच रूपे असतात. काळ्या मातीतूनच पिवळे मोती उगवतात. या दोघी जणू जुळ्या बहिणी मिरवणुकीमध्ये एकमेकींची गळाभेट घेतात आणि समाजातील अनिष्ट कुप्रथांचे स्वतःबरोबर दहन करतात. काळी मारबत म्हणजे भोसले राजघराण्यातल्या बाकाबाईची मारबत असा चुकीचा समज आहे. बाकाबाई ७ सप्टेंबर १८५८ या पोळ्याच्या दिवशी मरण पावल्या. मारबत काढण्याची प्रथा बऱ्याच वर्षांनी साधारण १८८१ नंतर सुरू झाली. त्यामुळे बाकाबाईंच्या अन्त्ययात्रेशी मारबतीचा संबंध नाही, असे इतिहासकारांनी अभ्यासून सांगितले आहे. त्यांनी घेतलेले काही निर्णय कटू असतीलही; पण बाकाबाईंच्या प्रयत्नांमुळेच भोसले घराण्यास 'किंग ऑफ देऊर' ही पदवी मिळाली व जानोजी भोसले यांना पेन्शन सुरू झाली. गोरगरिबांना त्यांनी केलेली मदत, त्यांचे असामान्य चारित्र्य, त्यांचा दयाळूपणा या सर्व गोष्टी लक्षात घेता त्या मारबतीचा विषय होऊ शकत नाही. इंग्रजांविरुद्ध लढा देण्यासाठी मारबतीचा उपयोग केला गेला. असे म्हणतात की, १९४२ साली पाच जणांचे प्राण जाऊनही मारबत वाटेत थांबली नाही.

चौथ्या रघुजीने गणपती उत्सवाकरिता गोल बंगला वाडा आणि रुक्मिणी मंदिरच्या मधल्या चौकात भव्य-दिव्य मेघडंबरी निर्माण केल्या. गणपती कार्यक्रमात भजन, वेगवेगळे नृत्य प्रकार, छंदबाज्या, लावण्या, कीर्तने, भारुड असे कार्यक्रम होत सत. त्यानंतर लगोलग महालक्ष्मीचे आगमन होते. महालक्ष्मीच्या पूजेला वैदर्भीयांच्या अन्न समृद्धीचा कस लागतो. नैवेद्याचे ताट सोळा भाज्यांनी नटलेले असते. पूर्वी सर्व भाज्या वेगवेगळ्या शिजवण्याची पद्धत होती. आता सोयीनुसार एकत्रित काला असतो. पूर्वी गणपती विसर्जन दहाव्या दिवशी उत्साहात शुक्रवार तलावात व्हायचे. नागपूर शहरातील चितार ओळीतले नारायण पेंटरचे गुरू कै. खनपटराव उस्ताद यांच्या हस्ते १५ फूट उंच आणि १० फूट रुंद अशी भव्य-दिव्य मस्कऱ्या गणपतीची मूर्ती चौथ्या रघुजी भोसल्यांनी बसवली. या स्थापनेमागेसुद्धा त्यांच्या पूर्वजांचा पराक्रमी इतिहास आहे.

नागपूरचे खंडोजी राजे उर्फ चिमणा बापू १७५५ साली बंगालच्या स्वारीवर गेले. तेव्हा त्यांना वाटलं १६ हातात १६ आयुधे धरून साक्षात गणपतीच त्यांच्या बाजूने लढतो आहे. ते अनंत चतुर्दशीनंतर परत आले. अनेक विद्वानांच्या सल्लामसलतीनंतर त्यांनी निर्णय घेतला की, गणपतीची स्थापना राजवाड्यात करायचीच. २१ फूट उंचीचा आणि १६ हातांचा हा भव्य-दिव्य गणपती भोसल्यांच्या मोठ्या राजवाड्यात हाडपकात स्थानापन्न झाला म्हणून तो हाडपक्या गणपती. १६ आयुधे घेऊन लढणाऱ्या या मस्कऱ्या हाडपक्या गणपतीला 'वीर गणपती' असेही म्हणतात. प्राणपणाने लढणाऱ्या शूर योद्ध्यांचा तो काळ होता. इ. स. १७४२ पासून पुढील एका तपापर्यंत अलिवर्दीखानची व

रघुजी भोसले यांची बंगालमधील लढाई कटवा, मुर्शिदाबाद, पाटण्यापर्यंत ८०० मैलांच्या प्रदेशात सुरूच होती. कटक ते मिदनापूर येथे असलेल्या दीड मैल रुंदीच्या २० नद्या कधी पायदळी तुडवत तर कधी जिवाच्या आकांताने पोहत भोसले यांचे सैन्य निधड्या छातीने लढत होते. बंगालच्या तिसऱ्या स्वारीत इ. स. १७४४ मध्ये शूरवीर सेनापती भास्करपंतांचा निर्घृण खून करण्यात आला. अखेरीस अलिवर्दीखानाच्या मुत्सद्यांना नागपूरला येऊन रघुजी राजांशी तह करावा लागला. विदर्भाच्या मस्कऱ्या गणपतीला नागपूरकर भोसले आणि त्यांच्या शूर सैनिकांच्या धगधगत्या पराक्रमाची ओजस्वी पृष्ठभूमी आहे. अजूनही मस्कऱ्या गणपतीच्या निमित्ताने जिवंत समाजाचे आरस्पानी दर्शन होते. भजने, नाटके बघायला प्रेक्षकांची तोबा गर्दी होते.

विदर्भात पूर्वीपासून रामाच्या नवरात्रासाठी जन्माष्टमीपासूनच कडकडीत उपास व्हायचे. पाळलेल्या जनावरांनाही दूध आणि सात्त्विक पदार्थ या दिवसांमध्ये खाऊ घातले जायचे. भोसले काळात दसऱ्याचे महत्त्व फारच वेगळे होते. सीमोल्लंघनाच्या मिरवणुकीचा थाट न्यारा होता. पूर्वीपासूनच नाग नदी नागपूरची दक्षिण सीमा म्हणून समजण्यात आली आहे. राजपुरुषाने सीमोल्लंघनासाठी नदी ओलांडलीच पाहिजे आणि त्यानंतर गावाबाहेरच्या मारुतीचे दर्शन घेतलं पाहिजे. राजाची मिरवणूक वाजतगाजत निघायची. भोसल्यांमध्ये पहिले रघुजीराजे विजयादशमीला खऱ्या अर्थाने मुलूखगिरी करायचे. विजयादशमीला निरोपाचा टिळक लावून घोड्यावरच भाकर खायचे.

पूर्वीच्या सीमोल्लंघनाला कालांतराने मि रवणुकीचे स्वरूप आले.भोसलेंच्या रीवाजाप्रमाणे मिरवणुकीला कमीत कमी नऊ हत्ती असायचे. त्या काळात नागपुरात हत्ती-घोड्यांचे वैभव अपार होतं. ३०० हत्ती, ७०० भट्टी आणि ९० लट्टींचे गाव म्हणजे नागपूर. भट्टीमधले भाजलेले जाडसर रोठ सिलोनी हत्तींना फार प्रिय. पाठीवर भरजरी किनखापी झुली आणि झुलींवरच्या किणकिणणाऱ्या घंट्या, चांदीच्या अंबाऱ्या, गंडस्थळावर लटकणारी सोन्याची पिंपळपाने बघून डोळेच दिपायचे. पिवळ्या काठाच्या झुली असलेले, घुंगरू बांधून फेंदाडणारे उंटही हत्तींच्या मागे असायचे. पाठीमागचं घोडदळ पाठीवर भरगच्चीचे जीन, सोन्याचांदीचा साज, डोक्यावर मोतीदार तुरे, पायात पैंजण, मानेखाली जरीकाठीचे रुमाल अशा दिमाखात दीडक्या चालीने धावायचे. अंबारीत बसलेल्या श्रीमंतांची वेशभूषा रुबाबदार असायची. त्यांच्या मागे धाकट्या भावाचा लक्ष्मणरावाचा हत्ती चालत असे. वाड्यात आल्यावर आरती व्हायची आणि नंतर एकमेकांना आपट्याची पाने दिली जायची.

दिवाळी, त्रिपुरी पौर्णिमेचा कार्यक्रम, वसंत उत्सव अशी सण-उत्सवांची मालिका पुढे वर्षभर सुरू असायची. वसंत उत्सवात रात्री खडीगंमत बघितलेले अनेक आजोबा आजही वऱ्हाडात भेटतात. टांग्यांची शर्यत स्वतः रघुजी राजे खेळीत आणि नागमोडी ठेवलेल्या मातीच्या मडक्यांना धक्का न लावता स्वतः वेगाने टांगा हाकीत, अशा अनेक रसाळ गोष्टी महालामध्ये चहाच्या टपरीवर आजही ऐकू येतात. कालपरत्वे सण-उत्सवांचे स्वरूप बदलले असेलही; त्यातील वऱ्हाडी बाज मात्र आजही कायम आहे.

# सोनेरी उन्हात भिजूनी येतो भादवा

ऋतूरंग.....

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६



**श्रावणातला पाऊस ओसरत चालला की हिरव्यागार रानावर भाद्रपदातली सुवर्ण किरणे अलगद अवतरू लागतात. श्रावणातल्या चैतन्याला हसत मुखाने निरोप देण्यासाठी प्राजक्तापासून बकुळीच्या फुलापर्यंत अनेक लाल, पिवळसर सोनेरी फुले आपल्या अस्तित्वाच्या रंगागंधाची उधळण करत उभे असतात. गावाच्या वेशीवर माहेरवाशी बहिणीला सोडायला जावे तिच्या पैंजणाचा धुळवाटेवर विरतो न विरतो तोच सासरहून माहेरी धावत येणाऱ्या कन्येच्या नुपुरांचा निनाद कानी गुंजवा आणि तिच्या स्वागतासाठीच आपण तिथे उभे होतो, असा काहीसा अनुभव श्रावणाला निरोप देत भाद्रपदाचे स्वागत करणाऱ्या फुलांना येत असावा.**

तसे तर श्रावणातील ऊन पावसाचे खेळ थांबून, श्रावणातील नैसर्गिक रंगगंधाच्या छटा आता फिक्कट होत जाणार याची चाहूल अंगावर झुल घेऊन येणाऱ्या बैलाला पाहताना आपोआपच लागते. 'आला आला पोळा आणि पाऊस झाला भोळा' असे काहीसे उद्गार आपण अनेकांनी लहानपणापासून ऐकलेले असतात. मात्र, पोळ्याच्या दिवशी बैलाचे शिंग भिजवण्यासाठी, बैलाचा शिण घालवण्यासाठी पाऊस हमखास येतो असे आम्हाला वाटायचे. अर्थात त्या काळात ऋतूही बेईमान नव्हते त्यामुळे सर्व काही ठरल्यासारखा व्हायचं, आता मात्र ट्रॅक्टरचा पोळा भरण्याच्या काळात कुणाचे शिंग भिजवायला जावे? हे कळत नसल्याने पाऊस सुट्टी घेत असावा असे वाटते. वर्षाऋतूतील शेवटचा महिना म्हणजे भाद्रपद,...,

कधीतरी भादव्यातील ऊन, पाऊस आणि थंडी या सर्वांची एकत्रित अनुभूती यायला लागली की सर्व ऋतूंचे सार म्हणजे भाद्रपद महिना होय असे का म्हटले जाते? त्याचे गूढ उलगडते. वसंत ऋतूप्रमाणे अनेक झाडे भाद्रपदामध्येही अंगावर फुलांचा डोलारा सांभाळत उभे असतात. संपूर्ण सजीव सृष्टीला बहर आलेला असतो, धात्री- गात्री मोहरून आलेल्या असतात. आसमंत हिरव्या पानांसोबत रंगबिरंगी फुलांनी फुलून आणि गंधाळून गेलेला असतो. अशामध्ये हरतालिकेचे व्रत करण्यासाठी निघालेल्या कुमारिका आणि सवाष्ण महिला आपल्या साध्वी मनोभावाने अधिकच सौंदर्यवान होऊन शिव हेच सौंदर्य आहे ह्यांची जाणीव करून देतात. खरेतर श्रावणाच्या पावसात धुवून निघालेल्या सोनेरी उन्हात भाद्रपद तजेला घेऊनच आलेला असतो.

भाद्रपदातील इंद्रधनुष्याच्या सप्तरंगात पावसाचा रंग विरून जाण्याच्या बेतात असतांनाच आपले खळखळते अस्तित्व तो एकेकाळी नद्यांमध्ये ठेवून जायचा, आता त्या नद्यांना आम्हीच कधी धरणाजवळ बंदिस्त करून ठेवले आहे तर कधी अतिक्रमण करून तिचे पात्रच अधिग्रहित केले आहे, त्यामुळे आषाढ श्रावणातल्या पावसाचे उरलेले अस्तित्व भाद्रपदाच्या काळात नद्यांमधून वाहतच असेल असे आज खात्रीने सांगता येत नाही. मात्र भाद्रपदात आनंदाचे आगमन होण्याच्या अनेक कारणांपैकी एक कारण गणेशोत्सव, गणपतीच्या आकर्षक मुर्त्या, वेगवेगळे देखावे हे सर्व अजूनही डोळ्यापुढे ताजे आहे. साधारण इंटरनेट नावाचा राक्षस मोबाईल नावाच्या डबड्यातून आपल्या मेंदूवर राज्य करण्यापूर्वीच्या काळात वेगवेगळ्या थीमनुसार गणपती वेगवेगळ्या मंडळात विराजमान व्हायचे, आजही तो उत्सव आणि उत्साह काही ठिकाणी कायम दिसतो मात्र इव्हेंट मॅनेजमेंटकडून गणपतीची आरती आणि प्रसाद वाटप यात गर्दीत उभे राहून गणपतीचे दर्शन घेण्याची मजा येत नाही. आमच्या लहानपणी गणपतीच्या निमित्ताने सुरुवातीला व्हीसीआर, पुढे व्हीसीडी आणून चित्रपटगृहामध्ये येण्यापूर्वी एखादा चित्रपट गल्लीत सामूहिक ठिकाणी बसून पाहण्यात जी मजा असायची ती आज मल्टिप्लेक्समध्ये चित्रपट पाहताना येत नाही. त्यातही एखादा कौटुंबिक चित्रपट सर्व गल्लीतील मंडळींना दाखवणं झाला की आपल्या आवडीचे दोन चार सिनेमे रात्रभर पाहून त्या व्हीसीडी व्हीसीआरचे भाड्याचे पैसे पुरेपूर वसूल करणे ही एक कला त्या काळातील आमच्या पिढीतील मंडळीला अत्यंत आनंद देणारी होती. नाही म्हणायला प्रतिष्ठित गणेश मंडळ नावाजलेली नाटक, नावाजलेले वक्ते यांना बोलावून गावकऱ्यांसाठी एक मोठी पर्वणी उपलब्ध करून देत. मोबाईल आणि इंटरनेटच्या काळात लक्ष्मण देशपांडे यांचे वऱ्हाड निघाले लंडनला प्रत्यक्ष अनुभवताना येणारे खुमासदार हसू नवीन पिढीला मिळणे कठीण आहे.

आषाढ श्रावणात नदी, नाले, विहिरी गणपती विसर्जनाच्या दिवशी विघ्नहर्ताला आपल्या कुशीत घेण्यासाठी आतुरलेले असायचे. ती मातीची मूर्ती पाण्यात विरघळून पाण्याचे, गणपतीचे आणि विसर्जन करणाऱ्याचे असे सर्वांचे समाधान व्हायचे. आजच्या काळात मात्र प्लास्टर ऑफ पॅरिसच्या न विरणाऱ्या मूर्त्या ओक्याबोक्या अवस्थेत कोठेतरी अपुऱ्या जलाशयात विडंबित अवस्थेत दिसतात. या अपुऱ्या जलाशयाला आणि प्लास्टर ऑफ पॅरिसच्या वापराला आपणच जबाबदार आहोत हे वेगळे सांगायला नको.

गणपतीच्या डोक्यावर गवताचा भारा टाकताना गवत म्हणून ओळखल्या जाणज्ञक्षय जमिनीवरच्या शूद्र अशा वनस्पतीला एक वेगळी किंमत आहे हे सांगण्यासाठी 'दूर्वा' या नावाने गणेशोत्सवा सोबत त्याचे नाते जोडले आहे हे आपण विसरलो आहोत की काय? असे वाटायला लागते.

गणपतीच्या आगमनासोबतच गौरीचे आगमन भाद्रपदातच होते. विदर्भातील ग्रामीण भागात गौरीचा उत्सव दिवाळीतील लक्ष्मीपूजनापेक्षाही जास्त थाटामाटात आणि आनंदात साजरा केला जातो. हरतालिका, गौरी आणि नवरात्रातील नवदुर्गा ही सर्व संन्यस्त शिवाच्या प्राप्तीसाठी आतुरलेल्या उमापार्वतीची रूपे, त्यांचे अनन्य साधारण महत्त्व पाहून आपल्या संस्कृतीमध्ये वैभवशाली लक्ष्मीपेक्षा शंकरासारख्या भोळ्या पतीच्या प्राप्तीसाठी आतुरलेली उमा हे शक्तीचे प्रतीक असून तिची आराधना करणारा वर्ग जास्त आहे हे लक्षात घ्यावे लागते.

भाद्रपदात या गवतालाही निळ्या जांभळ्या रंगाची ईवलाली फुले आलेली असतात. कुठेतरी माळरानावर काट्याच्या कुंपणातून गोकर्णीचे फुले मनाला मोहवित असतात. गवतासोबतच तेरड्याच्या झाडावरही तांबड्या जांभळ्या गुलाबी फुलांनी गर्दी केलेली असते. जास्वंदीची लाल फुले एखाद्या कुंपणावरून डोकावताना आपण कुणाच्या हातात लागणार नाही अशी शेखी मिरवत असताना त्याच्या शेजारी असलेल्या प्राजक्ताची फुले मात्र टपटप करत कुंपणाबाहेर पडलेली दिसतात. प्राजक्ताचे फुल नेमके शेजारच्या दारात पडण्यामागची कृष्णाच्या जीवनातील सत्यभामा आणि रुक्मिणी यांची कथा सर्वश्रुत आहेच मात्र कधीतरी मला एका कवितेत मला सुचलेल्या दोन ओळी जास्त अस्वस्थ करणाऱ्या ठरल्या त्या अश्या सजे आंब्याची डहाळी दारी अक्षतांचा सडा, लेक हळद माखता भिजे पापण्यांची कडा, गर्द रंगल्या मेंदीला लागे संसार चाहूल, सडा परक्या अंगणी लेक प्राजक्ताच फूल ऋतू बदलत जातात तसे त्यांचे संदर्भ बदलत जातात ते हे असे नाही का? पण प्राजक्त मात्र अजूनही भरभरून शेजारी रस्त्यावर फुलांचा सडा टाकत असतो. प्राजक्ताच्या केशरी देठांच्या पांढऱ्या फुलांचा मोह आजही मनाला भुरळ घालतो. तेथेच शेजारी कुठेतरी रक्तवर्णी असा लाल भडक चाफा सोनपिवळ्या आणि श्वेतवर्णी चाफ्यासोबत सौंदर्याची स्पर्धा करत असतो. सौंदर्याची उधळण करणाऱ्या या ऐश्वर्यवान झाडाकडे पाहून मला चाफा कवितेतील संन्यस्त भाव कधी रुचलाच नाही.

भाद्रपदाच्या सुरुवातीला लिंबाच्या फुलांचा सुगंधही आसमंती दरवळतो. भाद्रपद फक्त फुलांना फुलवतो असे नाही तर अनेक फळात रंग भरतो, अनेक शेंगा आणि पानाना शोभिवंत करतो. या फळाफुलात कुठेतरी रंगीबिरंगी फुलपाखरे, तर कधी काळे भुंगे रुंजी असतात. आमच्या लहानपणी हिरव्या झाडाझुडपातून धावत पळत रंगीबिरंगी फुलपाखरू पकडून ते पुस्तकात ठेवण्याचा आमचा प्रयत्न असेल. कधीतरी वडिलांनी त्या पुस्तकात ठेवलेल्या आणि वाळून कडक झालेल्या फुलपाखराच्या पंखाकडे पाहून आमच्या सौंदर्यदृष्टीचे कौतुक न करता जित्या जिवाला मारल्याच्या संदर्भात केलेली कान उघडणी अजूनही मनात ताजी असल्यामुळे फुलपाखराच्या रंगाला भुललो तरी फुलपाखराला आपल्या ताब्यात घेऊन त्याच्यावर अधिसत्ता गाजवण्याची इच्छा निर्माण होत नाही. भाद्रपदाचा पाऊस अनेक झाडांच्या मुळाशी तर कधी पडीक ठिकाणी भूछत्र घेऊन आलेला असतो. हे भूछत्रही आमच्या कुतूहलाचा भाग असे. पायाला लागणारी घट्ट चिकट माती तुडवीत वेगवेगळ्या रंगाचे भूछत्रे पाहणे हा आमचा त्याकाळचा आवडता उद्योग होता. भाद्रपदाचे आणखी एक नाव म्हणजे भादवा हे होय.



भादव्यात सृष्टीची प्रणय रम्यता शिगेला पोहोचलेली असते. सौंदर्याची अनुभूती देणाऱ्या भाद्रपदात संपूर्ण सृष्टी न्हातीधुती होऊन निर्माण झालेली असते अशात श्रावणातील अध्यात्मिक व्रतवैकल्या नंतर सृजनात्मक अंतर्मन आता आपल्या बाह्यमनातून खुलेपणाने प्रणयी संकेत देत असेल तर त्यात नवल कसले? श्रावणातल्या झोक्याच्या आठवणीवर झुलून मन सावरून संसारात गुंतण्याचे ऋतू घेऊन येतो तो हा भाद्रपद! आषाढ श्रावणात बरसलेल्या पाण्याचे थेंब पिऊन तरतरन बाहेर येणाऱ्या पिकांचे साक्ष देणारा भाद्रपद सृष्टीच्या श्वासात आणि ध्यासात आणि विश्वासात आपल्या अस्तित्वाची ओलसर पाऊले उमटवीत हळुवार येतो आणि निघूनही जातो. त्याच्यासाठी कुणी शांताबाई 'ऋतू हिरवा ऋतू बरवा' लिहीत नाही, कुणी बालकवी श्रावणमासी सारखा भाद्रपदासाठी शब्द अविष्कार करत नाही मात्र तरीही कुठेतरी लांब किशोर कुमार तुम्हाला लता मंगेशकर यांच्या आवाजातील मेरे नैना सावन भादो या गाण्यातील भादो, म्हणजेच भादवा, म्हणजेच भाद्रपद आपला, आणि आपलाच वाटत असतो. नाही का?

पान १ वरून

## अभिमन्यू ते अभिमानास्पद!

मराठा आरक्षणावर काढलेल्या तोडग्यामुळे फडणवीस यांना आव्हान देऊ शकेल, असा एकही नेता महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर दूरदूरपर्यंत दिसत नाही.

फडणवीस यांचे नेतृत्वकौशल्य, प्रशासनावरील घट्ट पकड, अभ्यासू वृत्ती, कायद्याची उत्तम समज आणि मुख्य म्हणजे, अपरिमित संयम यावेळीही दिसून आला. विरोधकांची बोलतीच त्यामुळे बंद झाली! त्यामुळे आता ओबीसी समाजाला चिथावणी देण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. 'अकेला फडणवीस या करेगा,' असे त्यांना हिणविणार्या विरोधकांना प्रत्यक्ष कृतीतून फडणवीस यांनी उत्तर दिले आहे. एकदा नव्हे, पुन:पुन्हा! महाराष्ट्राच्या राजकारणाचे देवेंद्र फडणवीस हेच अनभिषिक्त सम्राट आहेत, हेच आता पुनश्च सिद्ध झाले आहे!

## तीन तिघाडा अन् ट्रम्पचा काम बिघाडा!

या परिषदेत पहलगाम येथील दहशतवादी हल्ला घडवून आणणार्या पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ उपस्थित होते, तर 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान पाकिस्तानला सर्वतोपरी मदत करणार्या चीनकडे या परिषदेचे यजमानपद होते. असे असताना ही भूमिका का घेण्यात आली, या प्रश्नाचे उत्तर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी अध्यक्षपदाची शपथ घेताच चीनची नाकेबंदी सुरू केली. उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात अमेरिकन कंपन्यांना चीनसोबत सहकार्य करण्यावर नियंत्रण आणले. चीनवर आयातकर वाढवत नेऊन तो १५० टक्क्यांपर्यंत केला. चिनी विद्यार्थ्यांना अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये मोठ्या संख्येने प्रवेश न देण्याबाबत वक्तव्ये करण्यात आली. चीनने अमेरिकेला होणारा दुर्मीळ खनिजांचा पुरवठा रोखून धरल्यावर अमेरिकेच्या तंत्रज्ञान उद्योगावर संकट आले. तेव्हा त्यांच्या दबावापोटी अमेरिकेने चीनविरोधातील आयातकर ३० टक्क्यांवर आणला. पण, भविष्यात जेव्हा केव्हा संधी मिळेल, तेव्हा अमेरिका चीनविरुद्ध पावले उचलणार, याची चीनलाही कल्पना आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरुद्ध भूमिका घेऊन चीनला संधी उपलब्ध करून दिली. भारत आणि चीन यांच्यातील युद्धाला ६३ वर्षे पूर्ण होतील. चीनच्या मनात काय आहे, हे ओळखणे खूप अवघड असले, तरी भारत आणि अमेरिकेमधील वाढती जवळीक आणि दक्षिण चीन समुद्रात चीनची कोंडी करण्यासाठी 'क्वाड' गटाच्या माध्यमातून भारत, ऑस्ट्रेलिया, जपान आणि अमेरिका यांचे एकत्र येणे चीनला आवडले नव्हते. आपला स्वार्थ साधण्यासाठी अमेरिका भारताला बळीचा बकरा बनवायला मागेपुढे पाहणार नाही. भविष्यात भारताला अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांशी संबंध सुधारतानाच अमेरिकेच्या प्रतिस्पर्ध्यांशीही चांगले संबंध ठेवावे लागणार आहेत. चीन पाकिस्तानला मदत करणे थांबवणार नाही, भारताविरुद्ध सायबर हल्ले चालूच ठेवेल, भारताच्या शेजारी देशांमध्ये पायाभूत सुविधा विकसित करण्याच्या नावावर भारताला घेरण्याचा प्रयत्न करेल. भारताला आपल्या बाजारपेठांचे दरवाजे उघडणार नाही, हे सर्व खरे असले, तरी भारताच्या राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने आपल्याला चीनसोबत संवाद सुरू ठेवणे आवश्यक आहे. आजच्या घडीला अमेरिकेला आपली ताकद दाखवणे शक्य नसेल, तर आपली उपद्रवमूल्ये दाखवून देणे आवश्यक आहे.

चीनला जाण्यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदींची युक्रेनचे अध्यक्ष व्होल्दोमीर झेलेन्स्की यांच्याशीही फोनवर सविस्तर बोलणे झाले. गेल्या महिन्यात युक्रेनने सगळ्यात जास्त डिझेल भारताकडून खरेदी करण्यात आले. त्यामुळे भारत या युद्धामध्ये रशियाला मदत करत आहे, हा दावा पार खोटा ठरला. युक्रेन आणि रशिया यांच्यात युद्धविराम व्हावा, अशी भारताची भूमिका असून ही वेळ युद्धाची नाही, असे व्लादिमीर पुतीन यांना सर्वांसमक्ष सांगण्याचे धाडस केवळ नरेंद्र मोदींनी केले होते. मोदी, पुतीन आणि शी जिनपिंग यांच्या एकत्रित फोटोचे पडसाद संपूर्ण जगभरात पसरले आहेत. अमेरिकेत ट्रम्प विरोधकांसोबतच अनेक ट्रम्प समर्थकही भारत चीनच्या गोटात जाण्याची भीती व्यक्त करत आहेत. बिल क्लिंटन, द्वितीय जॉर्ज बुश, बराक ओबामा आपल्या पहिल्या कार्यकाळामध्ये स्वतः डोनाल्ड ट्रम्प आणि जो बायडन या सर्व अध्यक्षांनी भारताशी संबंध सुधारण्याला प्राधान्य दिले होते. पण, ट्रम्प यांनी आपल्या अहंकारामुळे ही मेहनत पाण्यात घालवली. अमेरिकेसोबतचे मतभेद लवकरच मिटणार असले, तरी मनात निर्माण झालेला संशय दूर व्हायला

कथा

राजीवलोचन पुंडलिक

## यमनकल्याण

मोकळ्या आकाशी दिसणारे पक्षी आता त्या पुरातन वटवृक्षाच्या आसऱ्याला गेले होते. पूर्वाभिमुख मंदिराच्या उंच कळसामागचा भाग केशरी रंगाची छटा घेऊन सूर्यास्ताची वाट पाहात होता. दिवसभर तापलेल्या त्या सूर्याला एक विलोभनीय दर्शन दाखवून दाहकता कमी करण्याचा केविलवाणा प्रयास. चौकापासून मंदिराच्या आवारात पोहोचेपर्यंत अस्थिर दृश्य, नजर आणि मन! प्रत्येक वाहनचालकाला समोर जायची घाई! मोटरगाड्या, स्कूटर्स, रिक्षा, सायकली सगळ्याच वाहनांची एकदम गर्दी. सहा-साडेसहाच्या त्या प्रथम प्रहरी जनावरं किती शहाणी, असं वाटून गेलं.

या गायींना कोणी लावली शिस्त? एवढ्या मोठ्या टपोऱ्या डोळ्यात किती व्याकुळता घेऊन उभ्या आहेत... लांबल्या आहेत एका बाजूला, वाट पाहात रस्ता मोकळा होण्याची. मोटारी निघून गेल्या तशा पायी पुढे रसावल्या. गळ्यातल्या छोट्या घंटांचा मंजुळ नाद. सगळे शुद्ध स्वर.. षाडव संपूर्ण निर्मळ... शुद्ध हेतू... यमन कल्याण! गायींच्या सोबतीत मंदिराच्या आवारात भिंतीलगतच्या जागेतून गायी गोठ्यात शिरल्या. पायावर पाणी घेऊन तो पायऱ्यांजवळ उभा राहिला. तिथून गाभाऱ्यातल्या तिन्ही मूर्ती दिसत होत्या. एकेक पायरी चढत तो सभामंडपात पोहोचला. परत थांबला. श्रद्धाळूंची गर्दी, शुद्ध भावना, मनातल्या इच्छा... त्यांच्या पूर्ततेची आळवणी.

हळूहळू चालत तो गाभाऱ्याजवळ उभा राहिला. हसरे, प्रसन्न भाव घेऊन राम-लक्ष्मण-सीता समोर... एकटक रोखून पाहिले. 'तू ही माता, तू ही पिता...' मूर्तींच्या दोन्ही बाजूंना उंच समया मंद तेवत होत्या. कापूर, उदबत्ती आणि गुलाबाच्या फुलांचा सुवास दरवळत होता. क्षणभर तो जागेवरच खिळला.

रामाचा सुंदर, हसरा चेहरा तो दोन्ही डोळे भरून पाहात राहिला. ते आश्वासक रूप तो नजरेत आणि हृदयात साठवून घेण्याचा प्रयत्न करीत होता. हा विश्वनिर्मिता, सर्वव्यापी, माझ्यातदेखील अंशतः आहे... भावनावेगाने त्याचे ओठ थरथरू लागले. छाती दाटून आली. गळ्यातला आवंढा गिळला. कोणीतरी घंटानाद केला तसा तो भानावर आला. संथपणे चालत त्याने एक प्रदक्षिणा पूर्ण केली. तीर्थ ओठांनी ओढून दोन्ही पापण्यांना लावले, शिरोभागी हात फिरवून त्याने परत हात जोडले.

गाभाऱ्यापासून दूर सरकत तो एका खांब्याला टेकला. येणाऱ्या-जाणाऱ्यांना अडचण होत नाही हे पाहून तो मांडी घालून खाली बसला. खांब्याला डोकं टेकवून डोळे मिटले. क्षणभर सगळ्या व्यापातून मुक्त झाला. परत डोळे उघडले... तिन्ही मूर्ती समोर! 'श्रीराम जयराम जय जय राम' नामस्मरण. तंबोऱ्याच्या तारा धीर गंभीर स्वरात कानावर येत होते. ऐकता ऐकता परत डोळे मिटले. नकळत मनात जप सुरू झाला. श्रीरामाची आळवणी... 'नी रे ग म ध नी सा...' आणि परतीला 'सा नी ध प म ग रे सा...' गंधार, निषाद, रिषभ, षडजब यांचा तो आलाप, हळूहळू आपली कैफियत बयान करीत होता. त्यात उत्तेजना नव्हती. जे घडलं, जसं घडलं ते सांगण्याचा पुन:पुन्हा प्रामाणिक प्रयत्न.


शुद्ध हेतू बाळगून केलेल्या कृती आणि त्यात खोट्या गोष्टी करणारे आणि अडथळे आणणारे प्रतिष्ठित. तीव्र मध्यम, षडजब, धैवत, निषाद यांच्या भावनावेगाचे ते आलाप... एका न्यायालयात आरोपीने आपली बाजू मांडायला केलेली अंतिम धडपड किंवा हिंदी चित्रपट 'बॉबी'मध्ये जँक ब्रिगँझा- प्रेमनाथने मिस्टर नाथ- प्राणसमोर हात जोडून केलेली विनवणी... सूतपुत्र म्हणून सतत हेटाळणी, अपमान सहन करणारा 'राधेय' कर्ण. 'मेरा बाप चोर है' असं बालपणी हातावर गोंदवून सोडलेला 'दिवार' चित्रपटातील विजय- अमिताभ बच्चन.

हेच ते शुद्ध स्वर आहेत... यमनकल्याणचे! खांब्याला टेकून बसल्यावर सगळ्या घटना डोळ्यासमोरून तरळल्या.... सतत... एक पराभूत अश्वत्थामा! एक अंतिम सत्य. शब्दांत मांडलेले. दुर्लक्षित केलेले! यमनकल्याणचे ते आर्त स्वर ऐकून तो अंतर्मुख झाला. त्याच स्थितीत खूप वेळ गेला. परत डोळे उघडले, तेव्हा आजूबाजूचे लोक चमत्कारिक नजरेने पाहात होते... हे असंच चालत राहणार... व्यवहारी जगात चांगूलपणा हा खिरापतीसारखा वाटला जातो, फार महाग असतो. कारण तो सर्वांमध्ये नसतोच. अहंकार मात्र भरभराटीला येतो... तोच नजरेला आणि अनुभवाला प्रथम येतो. आपण अपेक्षा ठेवतो ही आपली चूक! ती मुकी जनावरं, त्यांच्या वाटेत कोणी आलं तर... ती वळसा घालून पुढे जातात. लगेच भांडणतंटा काही सुरू होत नाही. मनात शत्रुत्व ठेवून त्या काळ्याकुट्ट छायेत आयुष्य जगतोय! रामाच्या मंदिरात बसून आपण काय हे विचार करतोय! त्याला स्वतःची घृणा आली. आपण यातून बाहेर निघायलाच हवं... निघायलाच हवं!

## आत्मनिर्भरतेकडून जागतिक नेतृत्वाकडे

'सेमीकंडक्टर मिशन' अंतर्गत आजवर दहा प्रकल्पांना मंजुरी मिळाली असून, एकूण १.६० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक झाली आहे. ही गुंतवणूक भारताच्या औद्योगिक नकाशावर निर्णायक ठरणार आहे, हे नक्की! ओडिशामध्ये देशातील पहिला व्यावसायिक 'सिलिकॉन कार्बाइड फॅब' उभारला जात असून, तो उच्च-तापमान सहन करणार्या सेमीकंडक्टरची निर्मिती करेल. ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने आणि संरक्षण क्षेत्रात त्यामुळे क्रांती घडेल. काही दिवसांपूर्वी गुजरातमधील साणंद येथे भारताच्या पहिल्या सेमीकंडक्टर उत्पादनाचे केंद्र सुरू झाले. एका आकडेवारीनुसार, या प्रकल्पांमुळे पाच लाख थेट तसेच अप्रत्यक्ष रोजगारनिर्माण होतील, अशी अपेक्षा आहे. विशेषतः अभियांत्रिकी, इलेक्ट्रॉनिक्स, संशोधन, सॉफ्टवेअर या क्षेत्रांमध्ये प्रचंड संधी निर्माण होणार आहेत. १९९०च्या दशकात भारताची ओळख 'जगाचे बॅक ऑफिस' म्हणून झाली. आता त्यापुढील अध्याय म्हणजे जगाच्या डिजिटल भवितव्याचा कार्यशाळा होण्याचा. सेमीकंडक्टर, स्वच्छ ऊर्जा, संरक्षण उत्पादन, दूरसंचार या क्षेत्रातील भारताची आत्मनिर्भर वाटचाल भारत हा केवळ सेवा पुरवणारा देश नाही, तो जगाला तंत्रज्ञानही देतो, हे यातून स्पष्ट होईल. भारतात बनलेली पहिली सेमीकंडक्टर चिप हा क्षण 'आत्मनिर्भर भारता'साठी सुवर्णाक्षरात कोरून ठेवावा असाच आहे. यातून भारताने जगाला हे दाखवले की, भारत जागतिक अस्थिरतेचे आर्थिक संधीमध्ये रूपांतर करण्यात सक्षम आहे. सेमीकंडक्टर हा केवळ आर्थिक नव्हे, तर राष्ट्रीय सुरक्षेसाठीचा महत्त्वाचा घटक ठरत आहे. संरक्षण, अंतराळ, दूरसंचार प्रणालींसाठी चिप्सची आयात करण्यासाठी भारत मोठा खर्च करतो. 'सेमीकंडक्टर मिशन २.०' ही केवळ पहिल्या टप्प्याची पुनरावृत्ती नाही, तर ते प्रत्यक्षात सेमीकंडक्टरच्या निर्मितीला चालना देणारे आहे. यात उच्च-तंत्रज्ञानाच्या फॅब युनिट्ससाठी आर्थिक साहाय्य दिले जाईल. ओएलईडी आणि अमोलेड स्क्रीनच्या स्थानिक निर्मितीसाठी प्रोत्साहन दिले जाईल. भारतीय नवोद्योगांना चिप डिझाईनमध्ये जागतिक स्पर्धेसाठी तयार करण्यात येत असून, देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये सेमीकंडक्टर डिझाईनसंबंधी अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत. अमेरिकेबरोबरच्या तणावपूर्ण संबंधांच्या पार्श्वभूमीवर याचे महत्त्व ठळकपणे समोर येते. सेमीकंडक्टर क्षेत्रातील अवलंबित्व संपुष्टात आल्याने भारताला त्याचा थेट लाभ होणार आहे. देशांतर्गतच त्याचे उत्पादन झाल्याने, भारताचे विदेशी चलन वाचेल, पुरवठा साखळी स्थिर राहिल्याने, बाहेरील देशांवरील अवलंबित्व कमी होईल, तसेच निर्यातक्षमता वाढल्याने, भारत जागतिक सेमीकंडक्टर निर्यातदार म्हणून येत्या काही काळात आंतरराष्ट्रीय नकाशावर नवी ओळख प्रस्थापित करेल. सेमीकंडक्टर क्षेत्रात भारताला अजूनही बरेच काही साध्य करायचे आहे. तंत्रज्ञान हस्तांतरण हे प्रमुख आव्हान भारतासमोर आहे. चिप्स डिझाईन व उत्पादनासाठी विशेष कौशल्य असलेले अभियंते लागतील. त्यासाठीच केंद्र सरकार कौशल्य विकास करणाऱ्या अभ्यासक्रमावर भर देत आहे. भारत आज 'डिजिटल डायमंड्स'कडे झेपावत आहे. 'सेमीकंडक्टर मिशन २.०' हे केवळ औद्योगिक धोरण नाही, तर राष्ट्रीय सुरक्षेचे ते कवच असून, आर्थिक स्वातंत्र्याची पायरी आणि आत्मनिर्भर भारताचे मूर्त रूप आहे, असे निश्चितपणे म्हणता येते. भारत या क्षेत्रात जितका सक्षम होईल, तितका तो २१व्या शतकात जागतिक महासत्ता होण्याकडे वेगाने वाटचाल करेल, यात दुमत नाही!

# दु:ख न करावे यत्किंचित । आम्ही आहो येथे स्थित ।



संत
प्रकाश एदलाबादकर

**सं**तप्रवर श्रीगजानन महाराज म्हणजे विदर्भाच्या काळ्याकरन्द भूमीत उगवलेले भक्तीचे ब्रह्मकमळ! श्रीक्षेत्र शेगाव म्हणजे विदर्भभूमीचे तुळशी वृंदावन. या मातीच्या कणाकणात भक्तीचा सुगंध दरवळतो आहे. कारण श्रीमहाराजांनी याच मातीत आपला देह ठेवला. नुकतीच ऋषिपंचमी येऊन गेली. ऋषिपंचमी म्हणजे श्रीमहाराजांचा समाधी दिन. निरंजन, निरामय आणि निर्विकल्प श्री गजानन महाराजांचा समाधी दिन! १९१० सालच्या प्रत्यक्ष समाधीच्या दिवशी सारे शेगाव आणि पंचक्रोशी दु:खात बुडालेली होती. अवघे भक्तगण कासावीस झालेले होते. महाराज यापुढे दिसणार नाहीत म्हणून प्रत्येक जण ती मूर्ती डोळ्यात साठवून घेत होता. प्रा. श्री. म. माटे एके ठिकाणी लिहितात, 'निरांजनावर कधी फुंकर घालून ते विझवायचे नसते. त्याच्या प्तयोतीवर हलकेच एक फूल ठेवून ते मालवायचे असते.

संतपुरुष जेव्हा आपले जीवित कार्य संप आहे, आता वृथा देह शिणविण्यात अर्थ नाही, या भावनेने आपल्या कृतार्थ जीवनाला शांतपणे आणि आनंदाने पूर्णविराम देतात, तेव्हा ते आपली प्राणप्तयोत हळुवारपणे मिटवितात.' श्रीगजानन महाराजांनाही याची जाणीव झाली होती. आपले अवतारकार्य संपले हे जाणवून श्रीमहाराजांनी, समाधी घेण्यापूर्वी पंढरीच्या विठोबाचे दर्शन घेतले होते आणि त्याला विनवणी केली होती, असे वर्णन श्रीगजानन विजय ग्रंथात येते. श्रीमहाराज विठुमाउलीला म्हणतात...

**'तुझ्या आज्ञेने आजवर ।**
**भ्रमण केले भूमिवर ।**
**जे जे भाविक होते नर ।**
**त्यांचे मनोरथ पूर्ण केले ।।**
**आता अवतारकार्य संपले ।**
**हे तू जाणसी वहिले ।**
**पुंडलिक वरदा विठ्ठले ।**
**जाया आज्ञा असावी ।।**
**देवा मी भाद्रपदमासी ।**
**जावया इच्छितो वैकुंठासी ।**
**अक्षईचे रहावयासी । तुझ्या चरणासन्निध ।।'**

आपले ईश्वरदत्त कार्य संपले आहे, ही जाणीव त्यांना झाली. आपल्या सर्व भक्तवर्ग आणि शिष्यवर्गाला महाराजांनी याची कल्पना दिली. त्या मंडळींना अर्थातच अपार दु:ख झाले. परंतु श्रीमहाराजांनी त्यांची समजूत घातली.

**'दु:ख न करावे यत्किंचित । आम्ही आहो येथे स्थित। तुम्हा संभाळण्याप्रती सत्य ।**
**तुमचा विसर पडणे नसे ।। मी गेलो ऐसे मानू नका । भक्तीत अंतर करू नका ।**
**कदा मजलागी विसरू नका ।**
**मी आहे येथेच ।।'**

श्रीसंत गजानन महाराज यांच्या चरित्राचे, पोथीचे अनेकदा वाचन केले. त्याने फलप्राप्ती होणे, मनातील इच्छा पूर्ण होणे, नवसाला पावणे या काम्य बाबी आहेत. त्यासाठी वाचन नव्हते किंवा कदाचित असेलही, परंतु त्याहीपेक्षा सर्वोपरी आहे ती, अननुभूत अशा मन:शांतीची प्राप्ती. त्याने मन निर्भय होते. आपल्या व्यक्तित्वाभोवती संरक्षणाचे एक भक्कम आणि अभेद्य कवच निर्माण होते. एक वज्रशक्ती सतत आपल्या पाठीशी असल्याची जाणीव असते. आपल्या वृत्तींना शुचिता प्राप्त होते. प्रापंचिक दु:खे सहन करण्याचे धैर्य येते. कोणत्याही भीतीचा मनात लवलेश असत नाही. पोथीच्या सहाव्या अध्यायात असलेला ब्रजभूषणाच्या तोंडचा श्लोक हेच सांगतो. ब्रजभूषण महाराजांची स्तुती करताना म्हणतो...

**'हे पूर्णब्रह्म जगचालक ज्ञानराशी ।**
**ऐसे युगायुगी किती अवतार घेसी ।**
**तुझ्या दर्शनाने भय रोग चिंता नासे ।**
**गजानन गुरो मज पाव आता ।।'**

अर्थात हा पूर्णतः प्रत्येकाच्या अनुभवाचा विषय आहे. अंधश्रद्धा-अंधश्रद्धा म्हणून वितंडवाद घालणाऱ्या बुद्धिभेदकांशी या संबंधात वाद न घालणेच इष्ट! आपण केलेली ध्यानधारणा, साधना, चिंतन, मनन याद्वारे आपल्या मनात जी होकारात्मक ऊर्जा निर्माण होते, ती अशा भंपक आणि ढोंगी लोकांशी वाद ाालून क्षीण होते. श्रीमहाराजांच्या चरित्राचे वर्णन करणारा 'श्रीगजानन विजय' हा दासगणू महाराज यांनी रचलेला ग्रंथ केवळ पोथी नाही. त्याचे नीट वाचन व आकलन केले, तर एक गोष्ट लक्षात येते की, यात तत्कालीन समाजाचे वास्तव दर्शन आहे.

श्रीदासगणू महाराजांनी तत्कालीन सर्व सामाजिक परिस्थिती, लोकजीवन, लोकश्रद्धा यांचा अभ्यास करूनच हा ग्रंथ लिहिलेला आहे. श्रीमहाराजांचे यथातथ्य चित्रण त्यांनी केलेले आहे. समाजातील विषमता, अधिकारापोटी आलेला अहंकार, जातिभेद, शेतकऱ्यांचे प्रश्न, योगाचे महत्त्व, निरर्थक कर्मकांड असे अनेक विषय त्यात हाताळलेले आहेत. श्रीमहाराजांचे प्रत्यक्ष दर्शन त्यांना घडलेले आहे, अशी पिढी आता पूर्णतः अस्तंगत झाली आहे. आपणास त्यांचे जे दर्शन घडते, ते आता केवळ चरित्रातून; त्यांच्या विषयी तत्कालीन मंडळींनी लिहिलेल्या किंवा सांगितलेल्या घटनांवरून. श्रीमहाराज हे दिगंबर कोटीमधील सिद्धपुरुष होते. त्यांचे चमत्कार आणि लीला यांची वर्णने ग्रंथात आहेतच; परंतु याही पलीकडचे श्रीमहाराज आपण समजून घेतले पाहिजेत. या ग्रंथामध्ये महाराजांनी केलेले अनेक चमत्कार वर्णन केलेले आहेत. श्रीम हाराज किंवा त्यांच्याच समान असलेले अनेक सिद्धकोटीतील सत्पुरुष चमत्कार दाखवीत असल्याची वर्णने आपणास आढळून येतात.

आपल्या वाचनातही येतात. या चमत्कारांमागचे रहस्य आपण समजून घ्यायला हवे. असे चमत्कार किंवा लीला या समाजाला उपदेश करण्यासाठी, त्याचे प्रबोधन करण्यासाठी केलेल्या लीला असतात. महाराजांच्या चरित्रातील भास्कर पाटलाची कथा ही या दृष्टीने समजून घेण्याजोगी आहे. संतचरणरज अ. दा. आठवले यांनी लिहिलेल्या 'नमस्काराष्टका'तील खालील श्लोकात त्या चमत्काराचे महत्त्व आहे.

**'वापी जलेन रहितापि चकार पूर्णा ।**
**यो वारिणा सुमधुरेण निजप्रभावात ।**
**भक्त्याच शुष्कहृदयं सजलं करोति ।**
**श्रीमदगजाननगुरुं शिरसा नमामि ।।'**

तहानेने व्याकुळ झालेल्या महाराजांना भास्कर पाटील पाणी देत नाही. महाराज त्याला विनंती करीत आहेत. भास्कर ऐकत तर नाहीच, परंतु महाराजांना उलटून बोलतो. भास्कराचा अहंकार दुणावला असून स्वार्थभावनासुद्धा बोलण्यातून डोकावते आहे, हे महाराजांनी ओळखले. केवळ काडीने चिलीम पेटविणाऱ्या महाराजांसारख्या सिद्धपुरुषाला, जागीच पिण्याच्या पाण्याचा झरा निर्माण करता आला असता. परंतु ते न करता त्यांनी १२ वर्षे कोरड्या असलेल्या विहिरीला पुष्करिणी बनविले. केवळ लोकांसाठी त्यांनी देवाचा धावा केला. महाराजांनी केवळ कोरड्या विहिरीला पाणी आणले नाही, तर भास्करच्या कोरड्या पडलेल्या अंतःकरणाला भक्तीचा पाझर फोडला. कोरड्या विहिरीला पाणी आणण्यापेक्षा भास्कराचे हृदयपरिवर्तन हा चमत्कार मोठा आहे. 'माझ्या कोरड्या पडलेल्या मनाला तुम्ही साक्षात्काराचा सुरुंग लावला. त्याला भक्तिभावाचे पाणी लागले आहे. आता मी सन्नीतीची झाडे लावीन आणि भक्तीचे मळे फुलवीन' असे भास्कर म्हणतो. सर्वसामान्यांच्या मनातील धर्मश्रद्धा जागृत करून त्याचा उपयोग समाजधारणेसाठी करवून घेणे, हेच संत करीत असतात. हा खरा चमत्कार! श्रीमहाराजांनी स्वतःला 'बुवा' असे स्वरूप कधीच दिले नाही. उलट महाराजांच्या निमित्ताने स्वतःचे प्रस्थ वाढविणाऱ्या विठोबा घाटोळाला त्यांनी झोडपून काढल्याची कथा आहे.


श्रीमहाराजांसारख्या संताने यातून पहिली महत्त्वाची गोष्ट कोणती केली असेल, तर चांगले-वाईट, योग्य-अयोग्य, स्वीकार्य-त्याज्य याचा विवेक शिकविला. त्या काळचा सामान्य समाज हा अशिक्षित होता. त्याच्या पुढे शाब्दिक पांडित्य न मांडता प्रत्यक्ष उदाहरणाने त्यांचे प्रबोधन केले पाहिजे, हे त्यांनी जाणले होते. असे कितीतरी चमत्काराचे म्हणजेच प्रबोधनाचे प्रसंग ग्रंथात आहेत. नाठाळ घोड्याला वठणीवर आणण्याचा प्रसंग असो की सुकलालच्या गायीला गरीब करण्याचा प्रसंग असो, त्या प्रसंगांवरचे चमत्कारांचे आवरण काढून त्याचे मर्म समजून घेतले, तर महाराजांविषयी आपल्या मनात असलेल्या श्रद्धा आणि भक्तीला वेगळीच झळाळी येईल.

आपल्या धर्मातील उच्च आणि उदात्त तत्त्वे जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची तळमळ संतांमध्ये दिसून येते. प्रपंचाच्या सर्व उपाधींपासून जो सुटला, आध्यात्मिक साधना हेच ज्याच्या जीवनाचे सूत्र आहे, जो स्वतः साधनामार्गाने भगवंताच्या सन्निध पोहोचला तो, खरा संत. ज्याच्या अंगी पूर्ण वैराग्यशीलता आहे, सारे अध्यात्मज्ञान ज्याला आहे, ज्याचे सर्व मायापाश गाळून पडलेले आहेत तरीही जो समाजात आणि सर्वसामान्य माणसात वावरतो, तो संत! लोकांमधील एक होऊनच त्यांच्याशी संवाद साधत, त्यांच्यात मिसळून त्यांना नकळत शिकवणूक देतो, तो संत! हे सर्व करीत असताना स्वतःचे स्तोम कुठेही माजू देत नाही, तो संत! महाराज हे या कोटीतील संत होते. ते नेहमी 'पिसेपणाची पासोडी' घालून का राहत, याचे रहस्य समजून घेतले पाहिजे. 'श्रीगजानन विजय' ग्रंथाच्या १९ व्या अध्यायात श्रीमहाराजांना श्रीवासुदेवानंद सरस्वती भेटण्यास येण्याचा प्रसंग आहे. त्या भेटीनंतर बाळाभाऊंनी श्रीमहाराजांना काही प्रश्न विचारले, त्यावर महाराजांनी दिलेली उत्तरे वाचावी म्हणजे श्रीमहाराजांचे ज्ञानाची व्याप्ती समजते. '

(पान ६ वर)

# रामरक्षेची विशेषता

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर



'आदिष्टवान् यथा स्वप्ने रामरक्षामिमां हर:।
तथा लिखितवान्प्रात: प्रबुद्धो बुधकौशिक:।।'

**डॉ.** जगन्माता पार्वती आणि पिता श्रीशंकर यांच्या संवादातून ही रचना साकारली. ऋषींनी स्वप्नात ऐकली आणि पहाटे जागे होताच लिहून काढली किंवा त्यांना उन्मनी अवस्थेत स्तोत्राचे हे दर्शन झाले. 'ऋषयो मंत्रद्रष्टारा:' ऋषींना मंत्र दिसतात. दिसणे म्हणजे जाणवणे. कुश गोत्रातील कोणी एक विशेष बुद्धिमान म्हणून बुधकौशिक असे असावे किंवा कौशिकाला तो संवाद ऐकून बोध झाला म्हणून तो बुधकौशिक. ज्या स्तुतीने आपले रक्षण होते ते स्तोत्र. याचे पठन केल्यास आपले निश्चित रक्षण होईल, हा अनेकांचा विश्वास आहे. यात रामस्तुती तर आहेच; पण सिद्ध मंत्रात्मक असेही याचे स्वरूप आहे.

सुरुवातच मुळी 'अस्य श्रीरामरक्षा स्तोत्र मंत्रस्य' अशी आहे. म्हणजे हे स्तोत्र आहे आणि मंत्रात्मक रक्षाकवचही आहे. 'जपे विनियोगा' हा शब्दप्रयोग मंत्रात्मक तर 'पठेत् प्राज्ञ पापघ्नीं सर्वकामदाम्' यातील 'पठेत्' हा शब्द हे स्तोत्र असल्याचे सांगतो.

'वज्रपंजर नामेदं यो राम कवचं स्मरेत् ।
अव्याहताज्ञ: सर्वत्र लभते जयमंगलम् ।।'

यातील 'स्मरेत्' हा शब्द महत्त्वाचा आहे. नुसत्या स्मरणाने राम रक्षण करेल म्हणून या रचनेला मंत्रही म्हणता येईल. नाहीतरी वाणीच्या परा, पश्यन्ती, मध्यमा आणि वैखरी या चार अवस्था आहेत. जिभेतून उत्पन्न होणाऱ्या शब्दांची उत्पत्ती आधी मनात स्मरण रूपाने होत असते. वज्र मजबूत असते. त्याचाच पिंजरा म्हणजे रामनामाचे अभेद्य वज्रकवच. श्रीरामाने प्रसन्न होऊन आपली सर्व आपदांपासून रक्षा करावी व सर्व पद्धतीची संपत्ती द्यावी, अशा अर्थाचा त्यातील एक श्लोक असा-'**आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् ।**'

संपत्ती म्हणजे फक्त लौकिकच नव्हे, तर आध्यात्मिकसुद्धा. भुक्ती आणि मुक्ती या दोनही. '**भुक्तिमुक्तींच विदंति ।**' शिवशंकर पार्वतीला पुढे सांगतात की, रामनाम विष्णुसहस्रनामाइतके श्रेष्ठ आहे.

'**सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने ।**'असंख्य लोक याचे श्रद्धेने स्मरण, मनन, पठन आणि नाहीच जमले तर श्रवण करतात. प्रत्येक देवता तिच्या भक्ताचे रक्षण करतेच. मग या रचनेचे निराळे वैशिष्ट्य काय? रामाची स्तुती करताना राम ाच्या विविध वैशिष्ट्यांनी आपल्या विविध अवयवांचे रक्षण व्हावे, असे याचे फल आहे. या प्रत्येक नावाचे वैशिष्ट्य आणि आपले विविध अवयव यांच्यात निश्चित अशी संगती आहे. '**पातु रामोऽखिलं वपु:**' व्यवहारात आपण आपादमस्तक असे उलट म्हणतो. रामरक्षेत मात्र वरपासून खाली- शिरापासून पावलांपर्यंत संपूर्ण शरीराचे रक्षण करावे, असे म्हटले आहे. असे होण्यामागे एक तर्क सांगता येईल. या सहा श्लोकात रामाने यज्ञरक्षण आणि खलनिर्दालन या जीवितकार्यानिमित्त केलेल्या प्रवासाचा बोध होतो.

नकाशात बघितले तर रामाने (शिरोमे) वर अयोध्या ते प्रयागराज- मिथिला-चित्रकूट-दंडकारण्य- पंचवटी-पंपासरोवर- कर्नाटकातील किष्किंधा- रामेश्वरम् ते पायाखालची लंका असा प्रवास केला. याप्रमाणे शरीराच्या अवयवांचे आणि आर्यसंस्कृतीचे रक्षण श्रीरामाच्या तत्संबंधी गुणवैशिष्ट्यांचा संदर्भ देऊन केलेले आहे.

**१) शिरो मे राघव: पातु :** शरीराचा श्रेष्ठ भाग म्हणजे मस्तक. तत्कालीन राजवंशात रघुवंश हा सर्वात श्रेष्ठ होता. महाकवी कालिदास तर त्याला सूर्यासारखा प्रभावी वंश म्हणतात. अशा श्रेष्ठ रघुकुळातील श्रेष्ठ रामाने म्हणजे राघवाने माझ्या शरीराच्या श्रेष्ठ भागाचे म्हणजे मस्तकाचे रक्षण करावे.

**२) भालं दशरथात्मज: :** ब्रह्मदेवाने आपले भाग्य कपाळावर लिहिलेले असते. दशरथाचे भाग्य असे थोर की, त्याला विष्णूचा अवतार- समस्त आदर्शांचा पुतळाच अशा मर्यादा पुरुषोत्तम रामाचा पिता होण्याचे योग लाभले. तेव्हा अशा रामाने माझ्याही कपाळाचे म्हणजे भाग्याचे रक्षण करावे. माझ्याही वंशात असे पुत्ररत्न जन्मावे.

**३) कौशल्येयो दृशौपातु :** आई आपल्या मुलाकडे नैसर्गिक स्नेहाने बघते. या प्रेममय दृष्टीचे महत्त्व सांगणारी प्रसिद्ध उदाहरणे म्हणजे कासवी आपल्या पिलांना केवळ स्नेह दृष्टीने वाढवते. दुसरे म्हणजे गांधारीच्या दृष्टिक्षेपाने दुर्योधनाचे शरीर वज्रासारखे कणखर बनले म्हणून अशा कौशल्यापुत्र रामाने माझ्याही दृष्टीचे रक्षण करावे किंवा सदा पवित्र तेच मला दिसावे (भद्रं पश्येम).

**४) विश्वामित्रप्रिय: श्रुती :** गुरूंचे ऐकणे हे प्रत्येक शिष्याचे कर्तव्य. जिज्ञासू व अभ्यासू शिष्यच गुरूंना प्रिय होतो. विश्वामित्र गुरूंनी रामाला अस्त्रविद्या दिली. ती त्याने नीट कान देऊन ऐकली. तेव्हा अशा रामाने माझ्या श्रुतींचे म्हणजे कानांचे रक्षण करावे. नेहमी शुभ ऐकायला मिळावे. (भद्रं कर्णेभि श्रुणूयाम देवा)

**६) मुखं सौमित्रिवत्सल :** सौमित्र अर्थात लक्ष्मण. सावत्रपणा असूनही या भावंडात इतके सख्य आणि स्नेहभाव होता की, लक्ष्मण स्वत:हून सर्व राजवैभव सोडून वनवासात रामाची सावली बनून गेला. याला कारण रामाचे त्याच्याप्रति असलेले वात्सल्य. हे रामाच्या तोंडून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक मधुर शब्दात नित्य प्रकट होत असे. तेव्हा अशा सौमित्रिवत्सलाने माझ्याही तोंडाचे अर्थात वाणीचे रक्षण करावे. आम्ही मधुर वचने बोलून सर्वांना आपलेसे करावे.

**७) जिव्हां विद्यानिधि: पातु :** जिभेचे काम बोलणे. तिच्याशिवाय विद्या कशी येणार? म्हणून तिचे रक्षण विद्यानिधी श्रीरामाने करावे अशी अपेक्षा आहे.

**८) कण्ठं भरतवंदित: :** वरवर याचा अर्थ भरताने ज्याला वंदन केले त्याने माझ्या कंठाचे रक्षण करावे असे वाटेल; पण तसे नाही. यात ऋ हा धातू असून त्याचा अर्थ भरणपोषण करणे. योगशास्त्रातील प्रयोगाप्रमाणे कंठाच्या ठिकाणी प्राणसंयम केल्यास बला-अतिबला या सिद्धी प्राप्त होतात. त्यामुळे भूक आणि तहानेवर विजय मिळतो. विश्वामित्रांनी रामाला या सिद्धी दिल्या. जणू त्या सिद्धींनीच त्याला वंदन केले. तेव्हा अशा रामाने माझ्याही कंठाचे तहान- भुकेपासून रक्षण करावे.

**९) स्कन्धौ दिव्यायुध: पातु :** खांद्यांवर अमोघ बाण आणि दिव्य आयुधे घेतलेल्या रामाने माझ्या खांद्यांचे रक्षण करावे. मला सामर्थ्य द्यावे.

**१०) भुजौ भग्नेशकार्मुक: :** रामाचे बाहुबल इतके थोर होते की, त्याने प्रत्यंचा लावताना अवजड शिवधनुष्य इतके वाकवले की ते तुटूनच पडले. तेव्हा अशा बाहुबलीने माझ्याही बाहूंचे रक्षण करावे. मी बलदंड व्हावे.

**११) करौ सीतापति: पातु :** सीतेचे पाणीग्रहणानिमित्ताने ज्याने सीतेचा हात हाती घेतला, त्या सीतापतीने माझाही हात हाती धरावा. अर्थात संकटसमयी मदतीचा हात द्यावा.

**१२) हृदयं जामदग्न्यजित् :** क्रोधामुळे रक्तदाब वाढतो, हृदयरोग होतो. जामदग्नी म्हणजे परशुराम. मूर्तिमंत क्रोधाचेच स्वरूप. याने संतापून २१ वेळा पृथ्वी नि:क्षत्रीय केली होती. रामाने परशुरामाचा म्हणजेच प्रत्यक्ष क्रोधाचा पराभव केला. म्हणून रामाने मला अक्षोभ म्हणजे क्रोधरहित करून माझ्या हृदयाचे रक्षण करावे.

**१३) मध्यं पातु खरध्वंसि :** शरीराचा मध्य भाग म्हणजे पोट. ज्याचे पोट ठीक त्याची प्रकृती ठीक. रामायणकालीन मध्य भारतात रावणाने खर नावाच्या राक्षसाची १४ हजार सैन्यांसह नेमणूक केली होती.

(पान ६ वर)

इंग्रजांनी भारत देश लूट- लूट लुटला. हे त्यांनी नेमके कसे केले? भारतीय व्यापार, उद्योग पद्धतशीरपणे मारून त्यांनी दरसाल इंग्लंडमध्ये किती संपत्ती पाठवली? हे इंग्लंडमध्ये राहून इंग्रज जनतेला सांगणारे पहिले भारतीय राजकारणी म्हणजे दादाभाई नौरोजी. नुकतेच ४ सप्टेंबरला दादाभाई नौरोजी यांच्या जन्माला दोनशे वर्षे पूर्ण झाली आहेत त्यानिमीत्त...


# भारतीय राजकारणाचे पितामह दादाभाई

विश्वसंचार
मल्हार कृष्ण गोखले

**आ**पल्याकडे आडनाव लावणे किंवा न लावणे ऐच्छिक असावे, असे दिसते. जमशेटजी जिजीभाई जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी हे लोक आडनाव लावत नव्हते. असे का? याचे उत्तर मिळत नाही. पण त्यांच्या समकालीनच असणारे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, न्यायमूर्ती काशिनाथ त्र्यंबक तेलंग, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे आडनाव लावताना दिसतात. असे का? अवश्य संशोधन करावे असा हा विषय आहे. तर, आपण ज्यांना फक्त दादाभाई नौरोजी या नावाने ओळखतो त्यांचे आडनाव दोरदी होते. दोरदी घराणे मूळचे नवसारीचे. इतर असंख्य गुजराती आणि पारशी कुटुंबांप्रमाणेच नवरोजी पालनजी दोरदी आणि त्यांची पत्नी माणेकबाई हे नवसारीहून मुंबईला आले. नवरोजी पालनजी हे अग्यारीत धार्मिक कार्य करणारे पारधी धर्मगुरू होते.

ब्रिटिशांचे भारतातले सगळ्यात अवघड शत्रू जे मराठे, त्यांचा पूर्ण मोड करून शनिवारवाड्यावर इंग्रजांचा युनियन जॅक फडकवणे हे दुर्घट कार्य एलफिन्स्टनने सन १८१८ साली पूर्णत्वाला नेले. त्यानंतर अर्थातच तो तत्कालीन बॉम्बे प्रेसिडेन्सीचा गव्हर्नर झाला. सन १८२७ साली संपूर्ण भारताचा गव्हर्नर जनरल बनण्याचा प्रस्ताव त्याने स्वत: होऊन नाकारला आणि इंग्लंडला निघून गेला. हा एलफिन्स्टन बाबा मोठा विद्याप्रेमी होता. १८२७ साली तो निवृत्त होऊन इंग्लंडला परतल्यावर या शहाण्या लोकांनी त्याचवर्षी 'एलफिन्स्टन इन्स्टिट्यूशन' या नावाची शाळा सुरू केली. त्यातूनच पुढे १८३५ साली 'एलफिन्स्टन कॉलेज' सुरू झाले. दादाभाई नौरोजी दोरदी हा तरुण वयाच्या २० व्या वर्षी म्हणजे १८४५ साली या एलफिन्स्टन कॉलेजमधून बी.ए. होऊन बाहेर पडला. १८५० साली एलफिन्स्टन कॉलेजने दादाभाई नौरोजी या २५ वर्षांच्या तरुणाची गणित आणि तत्त्वज्ञान या विषयांचा सहायक प्राध्यापक म्हणून नियुक्ती केली. एवढ्या लहान वयात हा बहुमान मिळविणारा तो पहिला भारतीय प्राध्यापक. पुढे १८५५ साली ते सहायक प्राध्यापकाचे पूर्ण प्राध्यापक बनले. अव्वल इंग्रजी कालखंडात ज्या थोड्या लोकांनी इंग्रजांच्या यशाचे हे मर्म ओळखले, त्यात दादाभाई एक होते. १८५० ते १८५५ या काळात दादाभाई अशा रीतीने संस्थात्मक कामात मग्न असतानाच त्यांच्या जीवनात एक नवे वळण आले. १८५५ साली दादाभाई इंग्लंडला गेले. एका कापडाचा धंदा करणाऱ्या कंपनीचे भागीदार म्हणून ते इंग्लंडमधील कामकाज पाहू लागले. लिव्हरपूल शहरात किंवा एकंदरीत इंग्लंडमध्ये स्वत:चे कार्यालय थाटणारी 'कामा अ‍ॅन्ड कंपनी' ही पहिली भारतीय व्यापारी संस्था होय. दादाभाई तिचेच भागीदार होते. पुढे १८५९ साली दादाभाईंनी इंग्लंडमध्ये स्वत:ची 'दादाभाई नौरोजी अ‍ॅन्ड कंपनी' ही कॉटन ट्रेडिंग कंपनी काढली.

दादाभाईंचा जन्म १८२५ सालचा. अमेरिकन राज्यक्रांती १७७६ सालची तर फ्रेंच राज्यक्रांती १७८९ सालची. दादाभाईंनी या दोन्ही राज्यक्रांत्यांचा अभ्यास केलेला होता. फ्रेंच राज्यक्रांतीच्या 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' या सूत्राने ते खूपच प्रभावित झाले होते. या पृष्ठभूमीवर भारताचे राज्यक्रांतीचे प्रयत्न अयशस्वी ठरलेले बघून दादाभाईंना काय वाटले? दादाभाईंनी कोणतीही थेट प्रतिक्रिया दिलेली दिसत नाही. १८५९ साली त्यांनी स्वत:च्या



व्यवसायाची घडी पक्की बसवली. १८६१ साली त्यांनी लंडनमध्ये 'द झोरास्ट्रियन ट्रस्ट' ही संस्था काढून आपली धार्मिक जबाबदारी पार पाडली. मग १८६५ साली त्यांनी 'लंडन इंडियन सोसायटी'ची स्थापना केली. भारतीय राजकीय, सामाजिक आणि साहित्यिक विषयांची चर्चा करणे, हे या संस्थेचे उद्दिष्ट होते. यातूनच पुढे १८६७ साली 'ईस्ट इंडिया असोसिएशन' ही संस्था निघाली. १८६६ साली लंडनमधल्या एका वर्णद्वेषी संस्थेने 'सर्व पौर्वात्य लोक हे वांशिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिकदृष्ट्या पाश्चिमात्य लोकांपेक्षा हलक्या दर्जाचे आहेत' असे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. दादाभाई आणि त्यांच्या मित्रांनी या प्रयत्नांचा सणसणीत समाचार घेतला, पण ही फक्त सुरुवात होती. १८७४ ते १८९१ या कालखंडात दादाभाई भारतात होते. त्याच काळात १८५५ साली काँग्रेसची स्थापना झाली. याच काळात मुख्यतः दादाभाईंनी भारताच्या दारिद्र्याच्या सूक्ष्म अभ्यास केला. याचे आणखी एक कारण म्हणजे १८७४ ते १८७६ या काळात वारंवार दुष्काळ पडला. भारताच्या आर्थिक अवनतीचे कारण इंग्रजांनी चालवलेली भारताची लूट हे आहे? भारतातून इंग्लंडकडे दरवर्षी संपत्तीचा प्रचंड ओघ जात असून त्यामुळेच इंग्लंड संपन्न होत आहे. इतकेच नव्हे, तर भारताकडून मिळणाऱ्या या पैशामुळेच इंग्लंडमधल्या औद्योगिक क्रांतीला चालना मिळाली, असे दादाभाईंनी भरपूर अभ्यास करून प्रतिपादन केले. या अभ्यासामुळेच दादाभाईंना 'भारताच्या आर्थिक राष्ट्रावादाचे जनक' असे सार्थ बिरूद त्यांच्या समकालीन तमाम जहाल, मवाळ काँग्रेस नेत्यांनी तर दिलेच; पण नंतरच्या पिढीतल्या समाजवादी पंडित नेहरू आणि साम्यवादी रजनी पाम दत्त यांनीही ते मान्य केले. १८९२ साली दादाभाई पुन्हा इंग्लंडला गेले आणि मजूर पक्षातर्फे निवडणूक लढवून चक्क ब्रिटिश पार्लमेंटचे पहिले भारतीय खासदार बनले. १८९२ ते १८९५ या आपल्या खासदारकीच्या काळात दादाभाईंनी पार्लमेंटमध्ये भारतीयांच्या विविध प्रश्नांवर प्रभावी भाषणे केलीच, पण 'आयरिश होम रुल' या विषयावरही त्यांनी उत्कृष्ट भाषणे दिली. १९०१ साली 'पॉव्हर्टी अ‍ॅन्ड अनब्रिटिश रुल इन इंडिया' हे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले आणि ते कमालीचे गाजले. वर्षाला किमान २०० ते ३०० कोटी (१९०१ सालचे) पौंड एवढी संपत्ती भारतातून इंग्लंडला जाते, असे त्यांनी आकडेवारीनिशी दाखवून दिले. ४ सप्टेंबर २०२५ रोजी दादाभाईंच्या जन्माला २०० वर्षे पूर्ण झाली आहेत; विनम्र अभिवादन! (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

# ग्रहसंकेत

**(रविवार, ७ सप्टेंबर ते शनिवार, १३ सप्टेंबर २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ७ सप्टेंबर-** खग्रास चंद्रग्रहण, प्रोष्ठपदी पौर्णिमा, भागवत सप्ताह व संन्यासिनां चातुर्मास्य समाप्ती, कुलधर्म, अन्वाधान, उमामहेश्वर व्रत, (चंद्रग्रहण रात्री ९:५७ ते रात्री १:२७ पर्यंत, दुपारी १२: ३७ पासून वेध, आजारी, वृध्द, गर्भवती महिलांनी सायंकाळी ५:१५ पासून वेध पाळावेत.) ✻ **सोमवार, ८ सप्टेंबर-** ग्रहण करिदिन, प्रतिपदा श्राध्द, महालयारंभ, इष्टी, साक्षरता दिन ✻ **मंगळवार, ९ सप्टेंबर-** द्वितीया श्राध्द, बुध्द गौरी (डोरली व्रत) ✻ **बुधवार, १० सप्टेंबर-** संकट चतुर्थी (चंद्रोदय- मंबई- २०:३३, अहिल्यानगर- २०: २५, कलबुर्गी-२०१:१८, कोल्हापूर-२०:३०, जालना-२०:२०, धाराशिव-२०:२१, नांदेड-२०:१४, पंढरपूर-२०:१४, परभणी-२०:१६, पुणे-२०:२९, बीड-२०:२१, बीदर-२०:१५, लातूर-२०:१८, विजापूर-२०:२४, छत्रपती संभाजीनगर-२०:२२, सांगली-२०:२५, सातारा-२०:३०, सोलापूर-२०:२२) ✻ गणेश यात्रा हेळगाव (ता. कराड), तृतीया श्राध्द, चतुर्थी श्राध्द, पंचक (सायं. ४.०३ पर्यंत) ✻ **गुरुवार, ११ सप्टेंबर-** भरणी श्राध्द, पंचमी श्राध्द ✻ **शुक्रवार, १२ सप्टेंबर-** षष्ठी श्राध्द, मैराळस्वामी पुण्यतिथी डफळापूर, मातोश्री सरुताई पुण्यतिथी, रथोत्सव मायणी (ता. खटाव) ✻ **शनिवार, १३ सप्टेंबर-** सप्तमी श्राध्द, उत्तरा रवि (वाहन कोल्हा), श्री ज्ञानेश्वरी जयंती, श्री लाहिरी महाराज जयंती

**मुहूर्त:-** पक्ष पंधरवडा महालयामुळे या सप्ताहात साखरपुडा, डोळाळ जेवण, जावळ, गृहप्रवेश आदि मुहूर्त नाहीत.

### मेष :-स्पर्धांमध्ये भाग घ्या

सप्ताहारंभी होणारे खग्रास चंद्रग्रहण आपल्या राशीत शुभ फलदायी आहे. सप्ताहाखेरीस पंचमात रवि- बुधाची युती होत आहे. त्यामुळे आर्थिकबाबतीत समाधानकारक घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. सप्ताहाभरात मंगळ षष्ठात असल्याने स्पर्धांमध्ये यश मिळवू शकाल. शुभ ता. ९, १०

### वृषभ:- कला- गुणांचा विकास

चंद्रग्रहण आपल्या राशीस शुभ आहे. खग्रास ग्रहणाच्या स्पर्श, मध्य, मोक्ष या घटना अवश्य अनुभवा. अवकाशातील घटनांचा पंचांगामध्ये घेतलेला अचूक वेध आर्श्चयकारक वाटेल. स्थावर बाबतीत रेंगाळलेले एखादे कार्य निश्चित यशस्वी होईल. कला- गुणांचा विकास होईल. स्वमताग्रह टाळावा. अडचणीतून मार्ग निघेल. आर्थिक प्रगती साधता येईल. शुभ ता. ९, १०

### मिथुन:- नव्या संधी लाभतील

आज रविवारी होणारे चंद्रग्रहण आपल्या राशीस मिश्र फलदायी आहे. तृत्तीयात रवि- बुधाची होणारी युती कार्यक्षेत्रात प्रगती करणारी आहे. नोकरी, व्यवसायात नव्या संधी लाभतील. सुखस्थ- ानी मंगळ असल्याने फार दगदग करू नये. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. गायन, वादनादि कलेत प्रगती साधता येईल. यांत्रिक क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. अपेक्षित धटना घडतील. शुभ ता. ११

### कर्क:- उत्साह, धडाडी वाढेल

आपल्या जल तत्त्वाच्या राशीस चंद्रग्रहण अनिष्ट फलदायी आहे. शक्यतो हे ग्रहण पाहू नका. धनस्थानी रवि, बुधाची युती होत आहे. त्यामुळे आर्थिक उन्नतीचे मार्ग लाभतील. धार्मिक, सामाजीक कार्यात पुढाकार घ्याल. पुढे मंगळ सुखस्थानी येणार असल्याने फार धावपळ, दगदग करणे टाळावे. राशीतील शुक्र सौख्याच्या घटना धडविल. उत्साह, धडाडी वाढेल. शुभ ता. ९, १०

### सिंह:- अनावश्यक खर्च टाळावेत

धनस्थानी मंगळ, अष्टमात शनि त्यामुळे विविध आव्हानांना सामोरे जावे लागेल. चंद्रग्रहण मिश्र फलदायी आहे. कार्यक्षेत्रात विचाराने रहावे. नव्या ओळखी पारखून घ्याव्यात. अनावश्यक खर्च टाळायलाच हवेत. प्रकृतीच्या तकारींची दखल घ्यावी. आत्मविश्वास गमावू नका. येईल त्या परिस्थितीला तोंड देण्याची तयारी ठेवावी. फार चिंता करू नका. मार्ग निघेल. शुभ ता. ११

### कन्या:- स्वमताग्रह टाळावा

आपल्या कन्या रशीस आजचे चंद्रग्रहण शुभ आहे. रशीत मंगळ आहे. त्यामुळे सामंजस्याने रहावे. कर्मस्थ गुरू, लाभातील शुक्र कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडविणार आहे. वादाचे प्रसंग टाळावेत. कौटुंबिक जीवनात स्वमताग्रह टाळावा. ज्ञानदान, बॅंक, विमा क्षेत्रात अनुकूलता राहील. प्रतिकुलतेवर मात कराल. घाईने निर्णय घेऊ नका. शुभ ता. १०, ११

### तुला:- अडचणींची चिंता नको

आपल्या रशीस चंद्रग्रहण मिश्र फलदायी आहे. मंगळ व्ययात आहे. गर्दीत पाकिट, दागिणे सांभाळावेत. विनाकारण धावपळ वाढणार आहे. कला- गुणांना चांगल्या संधी लाभतील. भाग्य वृध्दिंगत होईल. अपेक्षित संधी लाभणार आहेत. नवे विचार विचारपूर्वक स्वीकारावेत. फार चिंता करू नका. मनासारखे घडेल. शुभ ता. ९, १०

### वृश्चिक:- सावध चित्त असावे

आजचे खग्रास चंद्रग्रहण आपल्या राशीस अनिष्ट आहे. पुढील आठवड्यात रशीस्वामी मंगळ बारावा होत आहे. त्यामुळे सर्व बाबतीत जपून असावे. नव्या व्यवहारात कोणतीही जोखीम पत्करू नका. जवळचे आप्त, मित्रच आपणास अडचणीत आणण्याचा प्रयत्न करतील. सावध चित्त असावे. शिक्षणात अधिक लक्ष घालावे. चिकाटीने प्रगती घडेल. शुभ ता. ९, ११

### धनु:- सण आनंदात

चंद्रग्रहण आपल्या राशीस शुभ आहे. भाग्यात रवि-बुधाची युती होत आहे. मंगळाचीही विशेष अनुकूलता आहे. त्यामुळे आपले ध्येय निश्चित साध्य कराल. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. गणपती- गौराईचा सण आनंदात साजरा करू शकाल. अपेक्षित संधी लाभतील. अनुकूलता वाढेल. फार चिंता करू नका. शुभ ता. ९, ११

### मकर:- सौख्याच्या घटना

आजचे चंद्रग्रहण आपल्या राशीस मिश्र फलदायी ठरणार आहे. हाती असलेली कामे विचारपूर्वक मार्गी लावावीत. भाग्यस्थ मंगळामुळे विविध समस्यावर मात करू शकाल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना देवू शकाल. अपेक्षित संधी लाभतील. सरकारी कामासाठी अधिक पाठपुरावा करावा लागेल. शुभ ता. ११

### कुंभ:- आर्थिक समस्यांवर मात

राशीत राहू, धनात शनि व अष्टमात मंगळ त्यात चंद्रग्रहण अनिष्ट त्यामुळे कोणतीही गोष्ट सहज घेऊ नका. नोकरी व्यवसायात विचाराने रहावे. पंचमातील गुरूमुळे अर्थिक समस्यांवर मात करू शकाल. तूप खाल्ले की लगेच रूप मिळणार नाही. कोणत्याही चांगल्या गोष्टींसाठी सातत्य ठेवावे. व्यवहार विचारपूर्वक करावेत. पुढील आठवड्यापासून समस्या सुटत जातील. शुभ ता. ११

### मीन:- सावध भूमिका ठेवावी

राशीतील शनिसमोर मंगळ शिवाय चंद्रग्रहण अनिष्ट आपल्या राशीस आहे. त्यामुळे सर्व बाबतीत सावध भूमिका ठेवावी. राशीस्वामी गुरूच सध्या प्रतिकुल आहे. त्यामुळे व्दिधा मनःस्थिती टाळावी. मंगळ आठवा होणार आहे. त्यामुळे शरीराचे व मनाचेही स्वास्थ टिकवावे. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. सरकारी काम मनासारखे होईल. विचाराने रहावे.

!! शुभ भवतु !!



# राजधेर कोळधेर

दुर्ग जिज्ञासा

**प्राची पालकर**

नाशिक ही देवभूमीसह दुर्गभूमीही आहे. नाशिक जिल्हा दुर्गसंपदेने नटलेला आहे. या जिल्ह्यातून गेलेल्या सह्याद्रीच्या अजिंठा-सातमाळ या उपरांगेवर अनेक दुर्गम दुर्ग वसलेले आहेत. सह्याद्रीच्या सुरगणापासून चांदवडपर्यंत येणाऱ्या डोंगररांगेला अजिंठासातमाळ डोंगररांग म्हणतात. राजधेर व कोळधेर हे याच डोंगररांगेतील गिरीदुर्ग आहेत. राजधेर किल्ल्याची उंची ३५५५ फूट व कोळधेर किल्ल्याची उंची ३९५० फूट आहे. दोन्ही किल्ल्याच्या पायथ्याचे गाव राजधेरवाडी आहे.

गिर्यारोहक राजधेर ते कोळधेर असा ट्रेक करतात. या भागात फिरताना पायथ्याच्या गावातून वाटाड्या घेतला तर सोयीचे असते. नाशिकवरून चांदवडला आल्यावर, राजधेर किल्ल्याच्या पायथ्याचे राजधेरवाडी गाव गाठावे. गावातून गडावर जाण्यास चांगली मळलेली वाट आहे. किल्ल्यावर मुक्काम करायचा असल्यास काही गुहादेखील आहेत. गावात जेवणाची व पाण्याची सोय होते. अडीअडचणीला राहण्याची वेळ आल्यास ग्रामस्थ मदत करतात. राजधेर राजधेरवाडी गावात पोहोचल्यावर ग्रामपंचायतीच्या समोरून गडावर जाण्यास वाट आहे. या वाटेत पाण्याची टाकी आहे. किल्ल्याच्या पायथ्यापर्यंतची वाट तशी सोपीच आहे. पठाराच्या पहिल्या टप्प्यात स्तंभाच्या आकाराची चारही बाजूस कोरलेली एक विरगळ आहे. पठाराच्या दुसऱ्या टप्प्यात काही पायऱ्या आहेत तसेच एका ठिकाणी उद्ध्वस्त बुरूज आणि वास्तूचे अवशेष दिसतात. डोंगरसोंडेवरून चढायला सुरुवात केली की, दीड- दोन तासात आपण एका कातळकड्याजवळ पोहोचतो. येथे कातळात कोरलेली एक गुहा आहे. या गुहेत उतरायला शिडी लावली आहे. गुहेच्या वरच्या बाजूला घुमटाकार कमान बांधलेली विहीर आहे. गडाचा कातळकडा चढण्यासाठी पायऱ्या होत्या, परंतु इंग्रजांनी येथेही पायऱ्या नष्ट केल्या. वनखात्याने लोकांच्या सोयीसाठी येथे लोखंडी शिडी लावली आहे. ही शिडी मजबूत आहे. शिडी चढून वर गेलात की, किल्ल्याचे पहिले प्रवेशद्वार आहे. येथेही प्रवेशद्वाराच्या डावीकडे शिलालेख कोरला आहे. राजधेर किल्ला यादवकालीन आहे. त्यानंतर किल्ला अल्लादिन खिलजीच्या ताब्यात गेला. पुढे भडगावच्या रामाजीपंत यांना हा किल्ला आशिरीगडावरील विजयाच्या बदल्यात देण्यात आला. भालकीच्या तहात हा किल्ला पेशव्यांकडे आला. नंतर माधवराव पेशव्यांनी हा किल्ला विठ्ठल शिवदेव यांच्याकडे सुपूर्द केला. राजधेर किल्ल्याचा वार्षिक महसूल दहा हजार रुपये होता. कालांतराने स्वराज्यात असलेला राजधेर किल्ला निकम देशमुख यांच्याशी घनघोर लढाई करून इंग्रजांनी जिंकला. अधिक काही विशेष ऐतिहासिक घटना किल्ल्यावर घडल्याची नोंद नाही.

शिडी पार करून पुढे गेल्यावर गडमाथा गाठण्यासाठी कातळकोरीव पायऱ्या केल्या आहेत. गडमाथ्यावर पोहोचलात की उजवीकडील वाट धरायची. या वाटेवर थोडं चालत गेल्यावर एक वाडा आहे आणि तो बऱ्यापैकी सुस्थितीत आहे. पुन्हा परत येऊन डावीकडच्या वाटेवरील गुहेपर्यंत जायचे. समोर अजून चालत गेलात की दुसरी गुहा दिसते. या गुहा ऊन, वारा, पाऊस यापासून संरक्षण व्हावे यासाठी पहारेकरी वापरत असत. किल्ल्याच्या दुसऱ्या दरवाज्यातून आत गेल्यावर तटबंदीचे आणि वास्तूंचे अवशेष आपल्याला दिसतात. गडमाचीवर फिरतांना उद्ध्वस्त इमारतींचे काही अवशेष दिसतात. माचीवर गुहा, पाण्याचे टाके, इतर बांधकाम आणि त्याचा त्याकाळी काय उपयोग होत असावा, याचा अंदाज घेत बालेकिल्ल्याच्या दिशेने निघावे. ही वाट आपल्याला एका तलावाजवळ घेऊन जाते. तलावाच्या काठावरील गुहेत महादेवाचे मंदिर आहे. महादेवाचे दर्शन घेऊन तलावाच्या बाजूने चालत आपण डोंगरमाथ्यावर पोहोचतो. वाटेत आपल्याला अनेक भुयारी टाकी दिसतात. गडमाथ्यावर एक तलाव आहे. येथून गडाच्या माचीवर बांधलेली तटबंदी अप्रतिम दिसते. बालेकिल्ल्यावर पाण्याची दोन मोठी टाकी आणि वास्तूचे अवशेष आहेत. गडमाथ्यावरून कोळधेर, मांगी तुंगी, न्हावीगड, कांचना, इंद्राई, धोडप, चांदवड हे किल्ले दिसतात. पूर्वी घाटमार्गाने व्यापार होत असे त्यामुळे चांदवड किल्ला, राजधेर, कोळधेर, इंद्राई, मेसणा हे घाटमार्ग रक्षणासाठी महत्त्वाचे किल्ले होते.

कोळधेर चांदवड तालुक्यात अजिंठा-सातमाळ डोंगररांगेवर असलेला कोळधेर किल्ल्याच्या पायथ्याचे गाव राजधेरवाडी आहे. राजधेरवाडी गावातून राजधेर, कोळधेर आणि इंद्राई या तिन्ही किल्ल्यावर जाण्यास मार्ग आहे. गावातून उजवीकडे राजधेर किल्ला, डावीकडे इंद्राई आणि राजधेरच्या मागे दिसतो तो कोळधेर किल्ला! कोळधेर आणि राजधेर दोन्ही किल्ले एका दिवसात पूर्ण करता येतात. गावातून धरणाकडे जाणाऱ्या रस्त्याने जाऊन पठारावर चढण्यास सुरुवात करावी. या वाटेवर पाच फूट उंच मारुतीची मूर्ती आहे. जर तुम्ही राजधेर किल्ला करून मग कोळधेरवर जात असाल तर राजधेर उतरून किल्ल्याच्या मागे चालत जावे, आपण कोळधेर आणि समोरच्या पठाराच्या मधल्या दरीकाठावर पोहोचतो. दरी डावीकडे आणि कडा उजवीकडे ठेवून चालत कोळधेरची खिंड गाठावी. कोळधेर किल्ल्याचा दुसरा मार्ग नाशिकवरून देवळ्याकडे जाताना सोग्रेस फाट्याच्या आत तांगडी गावातून जातो. राजधेरवाडी गावातून येणारा रस्ता आणि तांगडी गावातून येणारा रस्ता कोळधेरच्या खिंडीत एकमेकांना भेटतात. या दोन्ही रस्त्याने खिंडीत पोहोचेपर्यंत साधारण एक तासाचा फरक पडतो, राजधेरवाडी जवळचा तर तांगडी रस्ता दूरचा आहे. खिंडीत एक शेंदूर फासलेला कातळ आहे. आपली संस्कृती निसर्गपूजक आहे. त्यामुळे श्रद्धेने हात आपोआप जोडले जातात. निसर्ग हा आपला खरा गुरू आहे. त्याच्या सान्निध्यात जे शिकता येते ते आपल्याला आयुष्याच्या प्रवासात मार्गदर्शक ठरते. त्यानंतर पुढील वाटेत किल्ल्याची उभी चढण सुरू होते. किल्ल्याच्या सुळक्याखालील पठारावर पोहोचल्यावर डाव्या बाजूला मारुतीरायाचे दर्शन होते. कातळात खोदलेले टाके पाण्याच्या सोयीसाठी सर्वच किल्ल्यांवर आढळते. येथे काही इमारतींचे अवशेष दिसतात. येथून पुढे गडमाचीवर जाण्यासाठी कातळकोरीव पायऱ्या आहेत. कोळधेर किल्ल्याची विस्तीर्ण माची फिरून उजवीकडून सुळका चढण्यास सुरुवात करावी. सुळक्याच्या पोटात प्रशस्त नैसर्गिक गुहा आहे. गुहेच्या आत कातळभिंतीवर एक शिल्प कोरलेले आहे. या सुळक्याला प्रदक्षिणा मारता येते.

सुळका चढणे जरा कठीण आहे. प्रदक्षिणा मार्गात एक शिवलिंग आहे. महादेवांना नमस्कार करून आजूबाजूचा नयनरम्य परिसर पाहून घ्यावा. इतक्या उंचीवरून कांचना, मंचना, धोडप तसेच खालील संपूर्ण मुलूख अप्रतिम दिसतो. या किल्ल्याचा उपयोग फक्त टेहळणीसाठी होत असावा, त्यामुळे किल्ल्यावर जास्त बांधकाम दिसत नाही. राजधेर, कोळधेर हे किल्ले नाशिक जिल्ह्यातील कठीण आणि अपरिचित किल्ल्यांच्या यादीत मोडतात. सह्याद्रीच्या तीन प्रमुख डोंगररांगा आहेत. सातमाळअजिंठा, हरिश्चंद्र-बालाघाट, शंभू महादेव! सातमाळाअजिंठा डोंगररांग सलग नसून मध्ये मध्ये तुटलेली आहे. धुळे (गाळणा डोंगर), नांदेड (निर्मल डोंगर), संभाजी नगर (वेरूळ डोंगर), हिंगोली (हिंगोली डोंगर), यवतमाळ (पुसद टेकड्या) हे सर्व तुटक डोंगर सातमाळा अजिंठा डोंगररांगेचाच भाग आहे. या डोंगररांगेत सप्तशृंगी हे शक्तिपीठ आहे तसेच कांचना, इंद्राई, चांदवड, धोडप, अहिवंत असे दुर्गम दुर्गही आहेत. मोहनदर किल्ल्यावर कातळभिंतीला पडलेले आरपार छिद्र म्हणजेच नेढं, धोडपची डाईक रचना येथील सगळंच अद्वितीय आहे.

अजिंठ्याच्या डोंगररांगात अजिंठा, पाटणा, चांदोर येथे डोंगरकपारीत कोरलेल्या अप्रतिम बौद्ध लेणी आहेत. या डोंगररांगेने गोदावरी या पूर्ववाहिनी नदीचे आणि तापी या पश्चिम वाहिनी नदीचे खोरे वेगवेगळी केली आहेत. ही भूमी प्रभू रामचंद्रांची, सप्तशृंगी देवीची, अगस्ती ऋषींची, सातवाहनांची, ज्ञानेश्वर-एकनाथांची आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी दुसऱ्या सुरत लुटीनंतर कांचनबारी येथे केलेल्या लढाईचे वर्णन, मराठ्यांच्या पराक्रमाची गाथा आजही ही भूमीच आपल्याला सांगते. दिलेरखानाला जेरीस आणणारा रामजी पांगेरांचा दुर्ग कण्हेरा याच डोंगररांगेत आहे. गोदावरी नदीने हा संपूर्ण प्रदेश सुजलाम् सुफलाम् केला आणि त्र्यंबकेश्वरच्या शंभू महादेवाने या भूमीला भरभरून आशीर्वाद दिला आहे. अशा या पावन, मंगल भूमीतील भटकंती आपले हृदय अनामिक अनुभूतीने भरून आपल्याला अनुभव समृद्ध करते.

पान ५ वरून

# रामरक्षेची विशेषता

देशाचा मध्यभागच असुरक्षित होता. म्हणून खर राक्षसाचा त्याच्या सैन्यासह नाश ज्या रामाने करून भारताला सुरक्षित केले, त्या रामाने माझ्याही शरीराच्या मध्य भागाचे म्हणजे पोटाचे रक्षण करावे.

**१३) नाभिं जाम्बवदाश्रय:**
आयुर्वेद सांगतो की, शरीर आणि मनाची प्रकृती चांगली असली म्हणजे आपल्या शरीरातील प्राणापानादि पंचवायू नाभीच्या ठिकाणी सुस्थितीत आश्रयाला असतात. जाम्बुवंताला आश्रय देणाऱ्या रामाने माझ्या नाभीचे रक्षण करावे. श्रीविष्णूच्या नाभिकमलातून तर प्रत्यक्ष सृष्टिनिर्माता ब्रह्मदेव प्रकटले. तेव्हा विष्णू अवतार रामाने माझ्या नाभीचे रक्षण करावे, असाही अर्थ व्यक्त होतो. मी इतके मोठे व्हावे की, अनेकांचा आश्रयदाता होईन.



**१४) सुग्रिवेश: कटी पातु :** सुग्रिवाने वानर सैन्यासह कटिबद्ध होऊन रामकार्याला वाहून घेतले. अशा सुग्रिवाचा जो स्वामी त्याने माझ्याही कटीचे रक्षण करावे. मला कधीही कर्तव्यापासून ढळू देऊ नये.

**१५) सक्थिनी हनुमत्प्रभु: :** शरीरातील वज्रासमान मजबूत भाग म्हणजे अस्थी. हनुमानाचे शरीर वज्रासमान होते. अशा वज्र हनुमान मारुतीचा स्वामी असलेल्या रामाने माझ्या शरीरातील अस्थींना शक्ती द्यावी. मला खंबीरप्रमाणे उभे राहण्याचे बळ द्यावे.

**१६) उरु रघुत्तम पातु रक्ष:कुलविनाशकृत:** उरु म्हणजे मांडी. ज्याने राक्षसकुलाचा नाश केला त्याने माझ्या मांडीचे रक्षण करावे हा साधा अर्थ. मात्र, यामागचे दोन गमतीदार तर्क आठवतात. अभिज्ञान शाकुंतलात भरत हा आपलाच मुलगा हे माहीत नसलेला दुष्यंत राजा त्याच्याकडे वात्सल्याने बघून म्हणतो :
**'धन्या स्तदङ्.क रजसा मलिनीभवन्ति।'**
म्हणजे मांडीवर खेळणाऱ्या बाळाच्या चिमुकल्या पावलांची माती लागून ज्यांची वस्त्रे मलीन होतात ते धन्य होत. ध्रुव बाळालाही वडिलांच्या मांडीवरून दूर लोटले गेले होते. विष्णूने नंतर त्याला अढळपद बहाल केले. म्हणून ज्या रामाने संपूर्ण राक्षसकुळच संपवले त्याने माझ्या मांडीचे म्हणजे संततीचे-वंशाचे रक्षण करावे. विष्णूने ध्रुवबाळाला दिले तसे रामाने मलासुद्धा आपले परमपद द्यावे असाही अर्थ.

**१७) जानुनि सेतुकृत पातु :** जानु म्हणजे गुढघा. गुढघा आपल्या मांडीवरच्या आणि त्याखालच्या शरीरामध्ये एखाद्या सेतूप्रमाणे काम करतो. म्हणून समुद्रावर सेतू बांधणाऱ्या रामाने माझ्या गुढघ्यांचे रक्षण करावे.

**१८) जंघे दशमुखान्तक:** बलाढ्य रावणाचा नाश करणाऱ्या रामाने माझ्या जांघांचे रक्षण करावे.

**१९) पादौ बिभीषणश्रीद:** शत्रू पक्षातील बिभीषण रामाच्या पायांशी शरण येताच रामाने त्याला राज्यवैभव मिळवून दिले. म्हणून अशा रामाने माझ्याही पावलांचे रक्षण करावे.

**२०) रामरक्षा कधी म्हणावी?** असुरांचा नाश हे रामाचे जीवितकार्य होते.

राक्षसी तमोगुण संध्याकाळ झाल्यानंतरच अधिक प्रबल होतात. तेव्हा शारीरिक तसेच मानसिक तमोगुणांपासुन रक्षण व्हावे म्हणुन तेजस्वी सूर्यवंशी रामाची रामरक्षा संध्याकाळी अथवा रात्री म्हणणे हे अधिक योग्य.

पान ५ वरून

# दुःखं न करावे यत्किंचित। आम्ही आहो येथे स्थित।

**आता नको पुसूस काही । हे न कोणा सांगे पाही ।**
**निवांत बसू दे ये ठायी । पिसेपणाच्या पासोडीने ।।'**
हे महाराजांचे उद्गार आहेत. श्रीमहाराज हे दैवत कोणत्याही जातीच्या, धर्माच्या, पंथाच्या, विचारांच्या चौकटीत अडकलेले नाही. हा देव समाजातील सर्व घटकांचा आहे. श्रीमहाराजांनी आपल्या केवळ वर्तनाने ही समरसता साध्य केली आहे.

महाराजांनी कर्मकांडाला कधीच महत्त्व दिलेले नाही. निर्मळ, निरपेक्ष भक्ती आणि भूतदया ही त्यांची मूलप्रवृत्ती होती. आपले विहित कर्म करता करता अलिप्तता साधली पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष होता. ब्रजभूषणाला त्यांनी केलेला संक्षिप्त उपदेश सहाव्या अध्यायात येतो. केवळ दोनच ओव्या, पण संपूर्ण जीवनाचे आणि परमार्थाचे सार दर्शविणाऱ्या!

'कर्म मार्ग सोडू नको। विधी निरर्थक मानू नको।
मात्र त्यात होऊ नको। लिप्त बाळा केव्हाही।।
आचरून कर्मफळ। टाकिता भेटतो घननीळ ।
त्याच्या अंगी न लगे मळ। या कर्माचा केव्हाही।।'

सत्पुरुषांचे अवतारच मुळी समाजातील हीण नष्ट करण्यासाठी असतात. आपला हा उद्योग ही मंडळी वाणीपेक्षा करणीने करत असत. समाजातील नाठाळ आणि वाईट प्रवृत्तीच्या व्यक्तींना भल्या मार्गावर आणणे आणि समाजोपयोगी कार्याला प्रवृत्त करणे याची तळमळ संतांना असते. संत श्री- गजानन महाराज हे सत्कार्याला प्रेरणा देणारे संत होते. आज श्रीमहाराजांचा काळ राहिलेला नाही. जग हे खूप वेगाने बदलते आहे. या बदलत्या जगात आपल्याला तारणार आहे ती, विशुद्ध धर्मश्रद्धा!

'धर्मश्रद्धा ही वाघीण। गेल्या मनरूपी दरीतून। दुर्वासनेचे कोल्हे जाण। येऊन बसतील ते ठाया।। भक्ती शुचिर्भूत अंगना। अभक्ति ही वारांगना। तिच्या नादी लागल्या जाणा। विटंबनाच सर्वत्र।।' 'शेगावनिवासी संत श्रीगजानन महाराज की जय' अशी घोषणा मंदिरातील भक्तमंडळी प्रत्यही करीत असतात. केवळ मंदिरात येणारीच नव्हे, तर आपापल्या घरी श्रीमहाराजांची उपासना करणारी भक्तमंडळीही हा जयजयकार करीत असतात. यातील 'शेगावनिवासी' हा शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे.

श्रीमहाराजांचा शेगावात आजही निवास आहे, असेच यातून सूचित होत नाही काय? आणि खरेच आजही श्रीमहाराजांचा शेगावात निवास आहेच. केवळ शेगावातच नव्हे, तर जगाच्या पाठीवर ज्या ज्या ठिकाणी त्यांची भक्त मंडळी हा जयघोष करतात, त्या त्या ठिकाणी श्रीमहाराज उपस्थित असतातच. हे त्यांचे अस्तित्व आपणास जाणवले पाहिजे.

श्रीमहाराजांच्या अस्तित्वाची अशी जाणीव सहजासहजी होत नाही. त्यासाठी मनात श्रीमहाराजांविषयी अदम्य विश्वास, दृढ भक्ती आणि अहंकारविरहित समर्पणशीलता असणे आवश्यक आहे. असे असेल तरच त्यांचे अस्तित्व जाणवेल. नव्हे, दर्शनही होईल.

श्रीमहाराजांच्या समाधीनंतर, 'आता शेगावात येऊन काय उपयोग? महाराज तर समाधिस्थ झाले' असा विचार अनेकांच्या मनात आला. त्यावर संत दासगणू महाराजांनी, 'श्रीगजानन विजय'च्या विसाव्या अध्यायाच्या प्रारंभीच श्रीमहाराजांच्या 'असण्याचा' निर्वाळा दिलेला आहे. श्रीमहाराज आता शेगावात नाहीत, असे अनेक भक्त म्हणतात परंतु...

'ऐसे कित्येक बोलती। परी ती असे साच भ्रांती। महाराजांची दिव्य ज्योति। अदृश्य आहे तेच ठाया।। जेवी इंद्रायणीचे तीरी। ज्ञानेश्वर समाधिस्थ जरी। ते आहेत भेटले परी। तेच ठायी भाविका।। तैशीच शेगावात। श्रीगजाननस्वामी समर्थ। ऐसा जयांचा सिद्धांत। दर्शन त्यांना तेथ होते।।' श्रीमहाराजांसारख्या श्रेष्ठ संताची सेवा आणि भक्ती करण्याचे भाग्य आपणास लाभणे हेच आपल्या पूर्वसुकृताचे फळ आहे, असे दासगणू महाराज आवर्जून सांगतात. परंतु संतांठायी मानवाची निष्ठा जडणे सहजासहजी अशक्य आहे, असा इशाराही देतात. त्यासाठी पूर्वजन्मीचे पुण्य हवे, असेही सांगतात.

आपल्या संस्कृती-धर्माची मूलतत्त्वे समाजाच्या तळागाळापर्यंत पोचवणे ही संतांनी केलेल्या कार्याची वैशिष्ट्य आहे. आपला हा उद्योग ही मंडळी वाणीपेक्षा करणीने करत असत. समाजातील नाठाळ आणि वाईट प्रवृत्तीच्या व्यक्तींना भल्या मार्गावर आणणे आणि समाजोपयोगी कार्याला प्रवृत्त करणे याची तळमळ संतांना असते. अशाच सत्पुरुषांच्या ठायी आपला दृढ विश्वास आणि भक्ती असावी. श्रीमहाराजांच्या चरणी दृढ भक्ती असावी, ही प्रार्थना संतचरणरज अ. दा. आठवले यांनीही आपल्या नमस्काराष्टकात केली आहे.

'भक्तिरदृढास्तु सततं हृदये मदीये । मा मे मनो भंवतु मोहमयं कदापि ।
श्लोकैरतो वसुमितैर्गणूदासशिष्य: । तं श्रीमद्गजाननगुरुं सदयं स्तुनोति ।।'
आपल्याही मनात अशीच दृढ भक्ती निर्माण होवो.

दासगणू महाराज म्हणतात...
'सतेज दुसरा रवी । हरी समान याचे बल ।
वशिष्ठ सम सर्वदा । तदीय चित्त ते निर्मळ ।।
असे असुनिया खरे । वारिवरी अवलिया भासतो ।
तया गुरु गजानना प्रती । सदा दासगणू वंदितो ।।'

# मन:शांती




सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

विविध प्रकारच्या अतिक्रमणांनी जीव कासावीस होत असताना, भरधाव वेगाने मनावर, विचारांवर होणारे अतिक्रमण अधिक भयावह आहे. जिथे शक्य असेल तिथे अतिक्रमण हा नव्या युगाचा धर्म असल्याने, किमान व्यक्ती हा घटक तरी आजवर निशाण्यावर नसायचा. पण गेल्या काही वर्षांमध्ये आपल्या परवानगी विना असंख्य गोष्टी दिसेल तिथे अतिक्रमण करताना आढळतात आणि त्यांना आसरा दिल्यावर आपणच मात्र हतबल होऊन शिणून जातो. सगळ्यात जास्त प्रहार होतो मनाच्या शांततेवर. एकेकाळी फक्त आपल्या मालकीची असलेली ही गोष्ट आता कह्याबाहेर जाताना बघून आपण गांजून गेलोय. कोई लौटा दे मेरे ------- च्या धर्तीवर आता मनाच्या मौनाचा शोध सुरु झालाय.

जगात गूगलवरच नव्हेतर तर सर्वत्र या एकाच शब्दाचा शोध सध्या सुरु आहे. अचानक या शब्दाचे महत्व वाढले आहे. कदाचित सुख, आनंद, समाधान यांच्या पाठलागातून फारसे काही हाती लागत नाही म्हणून असेल किंवा एकूणच तंत्रज्ञान, जीवनाचा वेग, उपलब्ध पर्याय आणि नवनवोन्मेषशाली जग यांच्या पसाऱ्यात नाकातोंडात पाणी जात असलेले आपण, शांतता- आसपासची आणि मनातली हरवून बसलोय की काय यावर विश्वास बसू लागलाय. मानसिक समस्यांनी यामध्ये भर टाकलीय. आपले प्राधान्यक्रम बदलत चालले आहेत. छिछोरे चित्रपटात एक संवाद आहे- पूर्वी काम/नोकरी हा अर्थार्जनाचा स्रोत प्राधान्यक्रमाचा भाग होता आणि कुटुंब दुसऱ्या क्रमांकावर असे. आता, विशेषतः कोरोना नंतर सगळ्यांचा अग्रक्रम कुटुंब झालाय. शरीर स्वास्थ्य, आत्मा, बुद्धी हे विषय अजूनही सर्वांसाठी महत्वाचे आहेत आणि; असतीलच. पण चंचल मन आता अध्ययनाचा विषय झालेले आहे.

अगदी समर्थांनी मनाला मनाच्या श्लोकातून साद घातली त्याकाळापासून हा विषय महत्वाचा मानला गेलाय. आपण आपली गती शेवटची कधी धीमी केली होती?

नवं नियोजन नाही, समाजमाध्यमांची अस्वस्थ चाळण नाही, भटकंती नाही. फक्त शांत--- स्वतःच्या सान्निध्यात. हे दुर्मिळ आहे पण मेंदू स्वच्छ करण्याचा तो एक प्रभावी उपाय आहे, भावना स्थिरावण्याचा उत्तम मार्ग आहे आणि कदाचित स्वतःच्या विचारांना कान देऊन ऐकण्याची ती सर्वोत्तम संधीही आहे. त्यासाठी अगदी पर्वतशिखरावर जाऊन ध्यान करण्याची गरज नाही, काही निवडक क्षण तुमच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यास पुरेसे असतात.

मनःशांती साठी स्थैर्य आणि निवांतपण फार महत्वाची आयुधे मानली जातात. आपले विचार आणि भावनांवर स्वतःच्या गतीने प्रक्रिया करण्यासाठी ते अत्यावश्यक असते. मग मनात खोलवर प्रवेश करता येतो आणि त्यातून समजूत, शहाणीव वाढते. स्व-जाणिवा प्रगत होऊन भावनिक उत्तरदायित्व वाढीला लागते.

उपचारांमध्ये शांततेचे उपयुक्तपण सगळ्यांना पटायला लागलेले आहे. संवादात शांतता ही संकल्पना कदाचित गैर वाटेल, अनाठायी वाटेल. शांतता हे सोन्याइतकेच महाग आणि म्हणूनच साधन असते. क्वचितप्रसंगी शांत राहणे, गप्प बसणे अस्वस्थ करणारे असू शकते पण अप्रत्यक्षरीत्या मानवाच्या वाढीला लागणारी रसद असते.

शांतता म्हणजे शब्दांची, भाषेची अनुपस्थिती नसते पण तो एक सकारात्मक अनुभूती देणारा घटक असतो. क्नोल, कूल, डेस्मेट आणि हुईस्क्स यांनी २०२० साली या विषयावर प्रचंड संशोधन सादर केले. मानसोपचार हा संभाषणाचा असाधारण मार्ग असतो आणि त्यांत कितीही वेळ मौन पाळता येते. तेवढ्या वेळेत अंतर्मनात सैर करून झाडाझडती संपविता येते.

स्वतःच्या जाणिवांशी जोडले जाता येते आणि सोबत विचारश्रुंखलेला विश्रांती देता येते. भिन्न विषयांमधील साखळी म्हणून शांतता कामी येते. एका वाटेवरून सुरु झालेलं संभाषण थबकून वेगळ्या आणि कदाचित योग्य मार्गावर जाऊ शकते.

हे मौन दोन विषयांमध्येच नसून एकाच विषयातही अंतर्भूत करता येते. नंतर काय बोलायचे आहे, काय प्रतिसाद (किंवा प्रतिक्रिया) द्यायची आहे यासाठी हा थांबा महत्वाचा ठरतो. बाह्य घटकांचा हस्तक्षेप टाळून आपुलाची संवाद आपणाशी अशी वृत्ती विकसित करता येते. भावनांचे हिंदोळे अनुभवता येतात आणि त्यांतील त्याज्ज भाग काढून टाकता येतो.

**मौनातून आपण खालील संदेश प्राप्त करू शकतो-**
(१) समानुभूतीचे वहन
(२) अंतर्मुखतेची अनुभूती
(३) जबाबदारीची जाणीव
(४) प्रतिसादापूर्वीचे विचारमंथन
(५) इतरांच्या कृतींचे मनःस्वास्थ्यावर होणारे परिणाम
उदा. आपली आवडती व्यक्ती नोकरीच्या निमित्ताने दूर देशी जाणार आहे.

कुटुंबीय आणि स्वजनांच्या मतमतांतराचा इतका गलबला त्याच्याभोवती साचतो की शेवटी शांतपणे विचार करायला बसल्यावरच त्याच्या आसपासचा कल्लोळ शांतावतो आणि काही विधायक निर्णय घेण्याच्या पातळीवर ती व्यक्ती येऊन पोहोचते.

ध्यान या मार्गाने मनःशांतीपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न बरेचदा होत असतो. पण त्या साधनेसाठी आवश्यक असलेली पार्श्वभूमी, शांत स्थळ सहजी सापडत नाही. मग संगीतामध्ये मनःशांती शोधली जाते. विविध कलांच्या माध्यमातून कलाकारांना ती गवसते. तरीही एखादी अनाकलनीय अस्वस्थता पाठलाग सोडत नाही. गिरिकंदरांवर वास्तव्य करा किंवा गुहेत तप करा, मन बेचैन असते. सगळी भौतिक सुखे समोर हात जोडून शब्दशः उभी असतात तरी मन वढाळं वढाळं दावणीला तोडून पळण्याच्या प्रयत्नात असते. मग ध्यानातील शांतता अप्राप्य होते.

मनाचा समतोल राखायचा असेल तर मानसिक कचरा दूर करता आला पाहिजे आणि चित्तवृत्ती संयमी राखता आल्या पाहिजेत, विशेषतः आव्हानात्मक परिस्थितीत, बाह्य आक्रमणांचा सामना करताना. अशा परिस्थितीत सुज्ञ निर्णय संभवतात, ताण कमी होतात आणि संतुलन साधता येते.

आयुष्याच्या वादळांमध्ये स्वतःसाठी सुरक्षित बंदर कसे शोधायचे? स्वतःला धीरगंभीर, शांत ठेवण्याच्या कोणत्या मार्गांनी जायचे हा शोध शेवटी स्वतःलाच घ्यावा लागतो. उत्तर असते चित्तामधील समवृत्तीमध्ये. मानसिक स्थैर्य आणि मनाचा तराजू तोलण्यातील कौशल्य अंगिकारले की मनःशांतीची सवय होते. ही मनाची आणि स्वभावाची सम वृत्ती असते, ज्यामधून जीवननौका सुखरूप किनाऱ्याला लावता येते. सगळी वादळं डौलदारपणे आणि प्रसन्नपणे सांभाळता येतात.मनःशांती ही केवळ अध्यात्मिक वा तत्वज्ञानात्मक प्राचीन अवस्था नसून तो आता अर्वाचीन मानसशास्त्रज्ञांच्या संशोधनाचा आवडता विषय झाला आहे.

समत्व वृत्तीला बुद्धिझम आणि स्टॉइकिझम (तितिक्षावाद- म्हणजे भावनांवर नियंत्रण ठेवून, आनंद आणि दुःखाची पर्वा न करता, संकटांचा धीराने आणि शांतपणे सामना करणे!). या प्राचीन तत्वज्ञानाची शिकवण अशी आहे- ज्ञानी व्यक्तीने निसर्गाच्या नियमांचे पालन केले पाहिजे आणि आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवून शांत आणि आनंदी राहिले पाहिजे) मध्ये फार महत्व आहे. मनः शांतीसाठी- वैराग्य, अनासक्ती, गोष्टी आहे तशा स्वीकारणे, प्रतिक्रियाशील नसणे या गोष्टी आवश्यक मानल्या जातात.

मार्कस ऑरेलिस यांनी २००३ मध्ये यासंदर्भात एक महत्वाचे विधान केले आहे- ते म्हणतात, एखाद्या बाह्य गोष्टीने तुम्ही दुखावले जात असाल तर होणाऱ्या वेदना तिच्यामुळे नसतात, तर तिच्या आकलनात तुम्ही कमी पडल्याने त्या वेदना होत असतात आणि कोठल्याही क्षणी त्या नाकारण्याचे स्वातंत्र्य तुमच्या हाती असते. असेच एपिक्टटस यांनी २०१४ साली मांडले- माणसाला घटनेने, प्रसंगाने दुखापत होत नाही, तर त्याकडे बघण्याच्या दृष्टिकोनामुळे तो घायाळ होतो. थोडक्यात काय तर मनोभूमी चांगली नांगरली आणि अंतर्मन शांत केले तर बाह्य घटनांच्या परिणामांना आपण समर्थपणे हाताळू शकतो.

अलीकडच्या काळात सुख, आनंद, समाधान यांच्या शोधात भोवंडून गेलेल्या पिढीला आता मनः शांतीचे महत्व पटायला लागलेले आहे कारण माणूस सुखी, समाधानी, प्रसन्न असला म्हणजेच तो अंतर्यामी स्थिर असेलच असं नसतं. मनःशांतीचा शोध अधिक दूरवरचा आणि परीक्षा पाहणारा आहे. याचा प्रत्यक्ष सकारात्मक परिणाम मानसिक स्वास्थ्यावर होत असतो हे आपल्या ऋषीमुनींनी, साधू संतांनी सोदाहरण सिद्ध केलेलं आहे.

या धर्तीवर होसमन्स यांनी २०१७ चक्क एक मोजपट्टी तयार केली. मानवी गुणविशेषांचा मनःशांतीवर होणारा परिणाम मोजण्यासाठी. उद्दीपित करणाऱ्या बाह्य घटनांना तोंड देताना आपण कितपत संयमी, खुले, निर्णयविहीन आणि प्रतिक्रियाहीन असतो याचे मापन या मोजपट्टीवर करता येते.

मनःशांती जीवनशैलीशी प्रत्यक्ष जोडलेली असते- गरजा कमी करणे म्हणजे अपेक्षा आपोआप उणावतात आणि समाधानाची पातळी त्याप्रमाणात वाढते एवढे सोप्पे हे गणित असते. पण या कौशल्याला खतपाणी घालून त्याचा वेलू गगनावरी न्यायला हवा. मग स्थितिस्थापकत्व, भावनिक नियमन, भावनांचे संयत प्रतिसाद, आकलनामधील लवचिकता आणि दृष्टिकोन स्वच्छ असे पर्याय अंगवळणी पडतात. ग्रॉस आणि जॉन म्हणतात- मनाचे समाधान साधायचे असेल तर भावना समजून घेणे आणि त्यांच्यावर वर्चस्व साधणे याचा सारा खेळ असतो.

**मन:शांतीचे महत्व-**

मानसशास्त्रीयदृष्ट्या आपल्या समतोलासाठी शांततेचे, मौनाचे महत्व प्राचीन काळातच मान्य झालेले आहे, पण कदाचित त्याकाळी त्याची तितकीशी गरज भासत नसे, किंवा तो जीवनाचा एक अविभाज्य घटक मानला जाई. हॉलझेल यांनी २०११ साली प्रथमच असे शोधून काढले की मेंदूतील राखाडी पदार्थ (ग्रे मॅटर ) ची घनता समानुभूतीने वाढते आणि त्यामुळे मानसिक कार्ये, स्मृती, भावना आणि हालचालींमध्ये सातत्य टिकविले जाणे शक्य होते. डेसबोरडेर यांनी पुढे जाऊन २०१५ मध्ये असे दाखवून दिले की ध्यान केल्यामुळे मेंदूतील अमिग्लाडा भावनिक प्रक्रिया नियंत्रित करते आणि त्यांतून शांतता प्राप्त होते.

मनात प्रत्ययी काय चालले आहे, काय घडतंय याचा अदमास हस्तक्षेप न करता साक्षीभावाने घ्यायचा हे समानुभूतीचे तत्व आहे आणि तेही वर्तमानात ही पूर्वअट! त्यावरून मनाची गुणवत्ता ठरते.

पौर्वात्य भिंगातून बघायचे असेल तर लालसा, भावसंबंध, अलिप्तता या साऱ्यांमुळे वेदना वाढतात असं आपल्याकडे मानलं जातं. अशावेळी मर्यादित प्रतिक्रिया देऊन स्वतःला भावनांच्या क्षोभापासून सुरक्षित ठेवता येते. बुद्ध तत्वज्ञानातील चार ब्रह्म विचारांमध्ये समत्व मौनातून साधता येते असं प्रतिपादन केलेलं आहे. मनातील शांती आणि स्थैर्य बाहेरील परिस्थितीवर अवलंबून नसते, हा विचार त्यामागे आहे. त्याला नैतिकतेची आणि अध्यात्मिक विकासाची जोडही देण्यात आलेली आहे.

सर्वांभूती समत्व भाव म्हणजे भेदभाव न करता निष्पक्ष, समान वागणूक. हे साध्य होते वैश्विक करुणा, अनुकंपा यांच्या ज्ञानातून. मग व्यक्तिगत भेदाभेद, पूर्वग्रह मावळतात आणि सर्वसमावेशक, सुसंवादी दृष्टिकोन नजरेच्या टप्प्यात येतो.

अनित्यता हा बुद्धांचा विचारही या समजुतीचा पाया आहे. सगळं विनाशी आहे, बदल हाच जीवनाचा स्थायीभाव आहे ( मानसिक आणि भावनिक अवस्था वगळलेल्या नाहीत यातून) तेव्हा अति टाळले की निराशा होत नाही.

स्वास्थ्यवर्धक नात्यांचे स्थायीभाव समतेच्या मार्गाने जातात. स्वीकाराची प्रवृत्ती, संयम, समजूत आणि मतभेदांचे निराकरण हा बुद्धांचा संदेश आहे. अध्यात्मिक जागृतीची सुरुवातच मौनाने आणि मनः शांतीने होते. जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका हवी असेल तर बुद्धिझम समत्वभावाची शिफारस करते. स्वतःमधील आणि अनुभवांमधील जोड नाकारून खोलवर शांतता हवी असेल तर आत्मसंकल्पना विकसित व्हाव्या लागतात आणि अहंभावाची साथ सोडावी लागते.

**मनःशांतीकडे उलटी गणना**

आपली शहाणीव सगळं काही आहे तसं या अवस्थेत स्वीकारायला तयार झाली आणि उगाच सगळं काही बदलायच्या मागे लागणं थांबवायला लागली की आपण स्थिर होण्याकडे पावले टाकतो. आपली पंचेंद्रिये समानुभूतीमध्ये एकाग्र करीत पाच ते एक अशी उलटी गणना सुरु करून हा उपक्रम केला जातो. प्रत्येक पायरीवर स्वतःची निरीक्षणे नोंदवायची असतात.

(५) सभोवताली दिसणाऱ्या पाच गोष्टी निरीक्षणाच्या रूपात नोंदवा
(४) आसपासच्या कोणत्या चार गोष्टींना तुम्ही स्पर्श करू शकतात?
(३) भोवतीचे तीन ध्वनी अचूकपणे नोंदवा
(२) कोणत्या दोन गोष्टी तुमच्या घ्राणेंद्रियाने तुम्हाला जाणवताहेत?
(१) आत्ताची एक गोष्ट कोणती, जिची चव तुम्ही घेऊ शकता?

**परिस्थितीची मूलगामी स्वीकृती**

वर्तमानावर लक्ष केंद्रित करून परिस्थितीशी सहमत होणे या उपक्रमात अभिप्रेत असते. सद्यस्थिती स्वीकारून त्याबाबत कोणतेही निर्णय न घेणे म्हणजे स्वतःला शांत करीत जाण्याची पायवाट ! एक तक्ता करून त्यांत फक्त दोन नोंदी प्रामाणिकपणे करायच्या असतात-
(१) त्रासदायक परिस्थिती
(२) वस्तुनिष्ठपणे स्वीकृतीचे मार्ग

उदा. माझ्याकडे पैसे नाहीत ही नावडती परिस्थिती ज्यामुळे त्रास होत असतो. त्यांवरील वस्तुनिष्ठ मूलगामी स्वीकृती या मार्गांनी नोंदविता येते- माझ्याकडे पैसे नाहीत कारण मला नोकरी नाही. मी नोकरीसाठी अर्ज केला तर मी पैसे कमावू शकेन, केलेली उधार उसनवारी फेडू शकेल. माझ्या आवडत्या छंदांसाठी पैसे खर्च करू शकेन. मी लगेच जवळच्या संस्थेत नोकरीसाठी अर्ज करतो.


**जीवनहेतूंची मांडणी**

काही सोप्या, सहजसाध्य जीवनहेतूंची मांडणी करीत त्यांची चढत्या भाजणीने नोंद करावी म्हणजे परिस्थितीचा स्वीकार सहजी पचनी पडतो.

(अ ) तीन सोप्प्या गोष्टींची यादी, जे सहज साध्य आहे -
उदा- बससाठी केलेली रांग मोडून कोणीतरी मध्ये शिरतोय -
१)
२)
३)
(ब) तीन मध्यम पण साध्य होऊ शकतील असे जीवनहेतू -
उदा- मी करीत असलेला स्वयंपाक जळाला -
१)
२)
३)
(क) तीन अवघड प्रसंग, जे सहजी पचनी पडण्यासारखे नाहीत, पण स्वीकाराचा प्रयत्न करता येईल-
उदा- ज्या नोकरीसाठी अर्ज केलेला होता, ती मिळाली नाही -
१)
२)
३)

वरील सर्व उपक्रम सहज स्वीकार या तत्वावर अंगी बाणवता येतात. आयुष्याने उभं केलेलं आव्हान शांतपणे आणि धीरोदात्तपणे स्वीकारणे हे प्राचीन तत्व आहे. जे पूर्वनियोजित आहे, तेच घडणार आहे मग अस्वस्थ का व्हायचे? मनःशांती का ढळू द्यायची? अस्थिर काळात जगणारे आपण म्हणूनच अंतर्मनातील समतोलाच्या शोधात आहोत.

बाह्य विश्वात जितके नियमन अशक्य, अवघड तितके स्वतःमधील प्रतिसाद बळकट करणे एवढेच आपल्या हाती असते. यादीच करावी- आपल्या नियंत्रणातील आणि नियंत्रणाबाहेरच्या गोष्टींची! त्यावरून नियंत्रणातील गोष्टींवर अधिक काम केले तर मनाची शांतता ढळणार नाही.




राहुल गांधी यांच्या 'व्होटर अधिकार यात्रे'ची काल सांगता झाली असली, तरी या यात्रेचा प्रभाव हा मर्यादित स्वरुपातच दिसून आला. कारण, मुळात काँग्रेसने केलेले तथ्यहीन आरोप त्यांना सिद्धही करता आले नाही. त्यातच निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनंतर तर राहुल गांधींच्या फसव्या आरोपातील फोलपणा प्रकर्षाने अधोरेखित झाला. त्याचे आकलन...

# फसव्या दाव्यांचा धुरळा

समाजभान
पार्थ कपोले

बिहारमध्ये सुरू असलेल्या मतदारयादीच्या विशेष पुनरीक्षण प्रक्रियेला राजकीय वादाची किनार लाभली आहे. काँग्रेस पक्षाने दावा केला की, या प्रक्रियेत तब्बल ६५ लाख मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली आणि यासंदर्भात त्यांनी ८९ लाख तक्रारी निवडणूक आयोगाकडे दाखल केल्या आहेत. हा आकडा ऐकून सर्वसामान्यांपासून ते माध्यमांपर्यंत अनेकांना धक्का बसला.

त्यांच्या म्हणण्यानुसार, २० हजारांहून अधिक मतदान केंद्रांवर १०० पेक्षा जास्त नावे कापली गेली असून, काही ठिकाणी महिलांची नावे तब्बल ७० टक्क्यांपर्यंत वगळली गेली. हे सर्व निवडणूक प्रक्रियेतील एक मोठे षड्यंत्र असल्याचे ते म्हणाले आणि यामागे ठरावीक राजकीय हेतू असल्याचा ठपका त्यांनी ठेवला. मात्र, या दाव्यांची हवा निवडणूक आयोगाने एका क्षणात काढून टाकली.

पूर्वी चंपारणचे जिल्हाधिकारी यांनी थेट समाजमाध्यमांवर उत्तर देत स्पष्ट केले की, दि. १ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेल्या मसुदा मतदारयादीवर काँग्रेसकडून 'फॉर्म-६' (नवीन नाव समाविष्ट करण्यासाठी) किंवा 'फॉर्म-७' (नाव वगळण्याविरोधातील आक्षेप) यापैकी एकही अर्ज दाखल झालेला नाही. सुपौल जिल्हाधिकार्यांनीदेखील हीच माहिती देत सांगितले की, काँग्रेसच्या कोणत्याही बूथ लेव्हल एजंटने अधिकृतपणे तक्रार नोंदवलेली नाही. ठरावीक फॉरमॅटमध्ये अर्ज दाखल करणे बंधनकारक आहे. मात्र, काँग्रेसने प्रक्रिया पूर्णच केली नाही.

अशा परिस्थितीत काँग्रेसने मांडलेला ८९ लाख तक्रारींचा आकडा नेमका कुठून आला, हा प्रश्न उपस्थित होतो. या सर्व मोहिमेचे नेतृत्व स्वतः राहुल गांधींनी केले. त्यांनी अनेक सभांमध्ये आणि पत्रकार परिषदांमध्ये ठामपणे सांगितले की, विरोधी मतदारांना लक्ष्य करून त्यांची नावे मोठ्या प्रमाणात वगळली जात आहेत आणि हा प्रकार लोकशाहीची हत्या आहे. मात्र, निवडणूक आयोगाने त्यांच्याकडून शपथपत्र व पुरावे मागितले असता, राहुल गांधी एकही अधिकृत कागद, डेटा किंवा प्रमाणपत्र सादर करू शकले नाहीत.

परिणामी, त्यांच्या भाषणांचा गवगवा झाला खरा; पण कायदेशीरदृष्ट्या त्यांना आधार मिळाला नाही.

दि. ३० ऑगस्ट रोजी निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या दैनंदिन बुलेटिनमध्ये सर्व आकडेवारी स्पष्ट करण्यात आली. या बुलेटिननुसार, राष्ट्रीय पातळीवर काँग्रेसकडून एकही दावा अथवा आक्षेप दाखल झालेला नव्हता. भाजपने तब्बल ५३ हजारांहून अधिक अर्ज केले, बहुजन समाज पक्षाने ७४, माकपने ८९९, तर आम आदमी पक्षाने एक अर्ज दाखल केला. प्रादेशिक पक्षांकडे पाहिले, तर राजदने ४७ हजारांहून अधिक, जनता दल (युनायटेड)ने ३६ हजारांहून अधिक अर्ज सादर केले. पण, काँग्रेसचे खाते मात्र शून्यावरच राहिले. हा आकडा काँग्रेसच्या सर्व दाव्यांना छेद देणारा होता. सामान्य मतदारांकडून आलेल्या अर्जांचा विचार केला, तरी काँग्रेसचे दावे टिकत नाहीत. एकूण २ लाख, २७ हजारांहून अधिक अर्जांमध्ये फक्त २९ हजारांवर नावे समाविष्ट करण्याची मागणी होती, तर जवळपास दोन लाख अर्ज नावे काढण्यासाठी दाखल झाले. त्यापैकी केवळ ३३ हजार प्रकरणे निकाली काढण्यात आली.

नव्या मतदारांसाठी १३ लाखांहून अधिक 'फॉर्म-६' अर्ज आले असून, त्यापैकी सुमारे ६१ हजार अर्जांचा निपटारा झाला आहे. हे आकडे '६५ लाख नावे कापली' या काँग्रेसच्या दाव्याशी अजिबात सुसंगत नाहीत.

राहुल गांधींनी त्यांच्या प्रचारात विविध व्हिडिओ प्रसारित केले. एका व्हिडिओमध्ये त्यांनी बीएलओ राणी कुमारी यांच्यावर आरोप केले; पण आयोगाने तपासात तो व्हिडिओ खोटा ठरवला. कर्नाटकातील महादेवपुरा भागात एक लाख बनावट मतदार असल्याचा दावा त्यांनी केला होता. मात्र, आयोगाच्या चौकशीसाठी त्यांनी कोणतेही उत्तर सादर केले नाही. त्याचबरोबर 'अल जझिरा', 'न्यूयॉर्क टाईम्स' आणि 'बीबीसी' आदी परदेशी माध्यमांचा वापर करून 'व्होट चोरी'चा प्रचार केल्याचे दिसून आले. पण, या सर्व मोहिमेला आकडेवारीचा आधार मिळाला नाही.

काही वैयक्तिक प्रकरणांवरूनही काँग्रेसने गदारोळ केला. उदाहरणार्थ, मिंता देवी या १२४ वर्षांच्या असल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, प्रत्यक्षात त्यांचे नाव योग्य असल्याचे आढळले. शकुन राणी यांनी दोनदा मतदान केले, असा आरोपही खोटा ठरला. कारण, हा प्रकार डुप्लिकेट ईपीआयसी क्रमांकामुळे झाला होता. अगदी राजद नेते तेजस्वी यादव यांच्या दोन मतदारकार्डांचा खुलासाही आयोगाने केला. अशा घटनांनी काँग्रेसच्या आरोपांची विश्वासार्हता अधिकच ढासळली.

कथित राजकीय विश्लेषक योगेंद्र यादव यांनी तर दावा केला होता की, 'एसआरआर' प्रक्रियेमुळे तब्बल दोन कोटी नावे कापली जातील. परंतु, प्रत्यक्षात फक्त १ लाख, ९० हजारांच्या आसपास नावे वगळण्याचे अर्ज आले. म्हणजेच त्यांच्या अंदाजालाही वास्तवाने धक्का दिला. आयोगाने या प्रक्रियेच्या पारदर्शकतेबाबत स्पष्ट माहिती दिली. बिहारमधील सर्व ९० हजारांहून अधिक मतदान केंद्रांची यादी सार्वजनिक करण्यात आली असून, दि. १ ऑगस्ट ते दि. १ सप्टेंबर या कालावधीत कोणत्याही मतदाराला दावा-आक्षेप नोंदवण्याची संधी देण्यात आली. कोणतेही नाव पडताळणीशिवाय वगळले जाणार नाही, असेही आयोगाने जाहीर केले.

तीन लाख संशयित मतदारांना नोटीस पाठवण्यात आली आहे आणि १३ लाखांहून अधिक नव्या मतदारांनी फॉर्म भरले आहेत. यामुळे प्रश्न असा उभा राहतो की, जर खरोखरच ६५ लाख नावे कापली गेली असतील, तर काँग्रेसकडून किंवा जनतेकडून इतके अल्प अर्ज का दाखल झाले? हे विरोधकांचे अपयश आहे की, त्यांच्या दाव्यात काहीच दम नव्हता? राहुल गांधींच्या मतदार अधिकार यात्रेला फारसा प्रतिसाद न मिळणे आणि आकडेवारीने त्यांचे आरोप फोल ठरवणे, हे या प्रश्नाचे उत्तर ठळकपणे देते. शेवटी असे दिसते की, बिहारमधील मतदारयादीचे विशेष पुनरीक्षण हे एक पारदर्शक आणि काटेकोर पद्धतीने राबविलेले पाऊल आहे. काँग्रेसने केलेले आरोप पुराव्याअभावी फक्त राजकीय गदारोळापुरतेच मर्यादित राहिले आहेत. उलट आयोगाच्या आकडेवारीने हे स्पष्ट केले की, लोकशाही प्रक्रियेला अधिक सक्षम बनवण्याचाच प्रयत्न 'एसआयआर' प्रक्रियेच्या माध्यमातून होत आहे.

राजकीय आक्रमकतेपलीकडे जाऊन पाहिले, तर या संपूर्ण प्रकरणाने काँग्रेसच्या आरोपांची पोकळता उघड झाली आहे. लोकशाहीला बाधा येत असल्याचे चित्र रंगवले गेले; पण प्रत्यक्षात पारदर्शकतेकडे जाणारे पाऊल अधिक मजबूत झाले. त्यामुळे शेवटी निष्कर्ष असा की, बिहारमध्ये मतदारांची फसवणूक झाली नाही, तर उलट निवडणूक प्रक्रिया अधिक काटेकोर झाली. काँग्रेसच्या प्रचारबाजीमुळे काही दिवस गोंधळ माजला खरा; पण सत्य आकडेवारीतूनच उलगडत आहे.

शताब्दी वर्षात पदार्पण करणाऱ्या रा. स्व. संघाचे क्षितिज किती अफाट विस्तारलेले आहे, त्याचे दर्शनच सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांच्या तीनदिवसीय व्यापक उद्बोधनातून झाले. हिंदूराष्ट्र, मुस्लीम मानसिकता, संस्कृती, राजकारण, रोजगार अशा मानवी आयुष्यातील प्रत्येक बिंदूंना स्पर्श करणारे सरसंघचालकांचे विचारामृत हे संघाच्या आजवरच्या प्रवासाची फलश्रुती आणि भविष्याची दिशा स्पष्ट करणारे असेच...

# भारत हे हिंदूराष्ट्रच!

विशेष
प्रतिनिधी




होय, मी म्हणतो हे हिंदुराष्ट्र आहे, अशी अभिमानाने गर्जना करणारे प्रखर राष्ट्रभक्त आणि रा. स्व. संघाचे आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार! काँग्रेसच्या ब्रिटिशधार्जिण्या आणि हिंदूविरोधी भूमिकांचा विरोध करून, डॉक्टरांनी 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रीयत्व हेच हिंदुत्व' या विचारांनी पेटून उठत १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मुहूर्तमेढ रोवली. आज रा. स्व. संघ शताब्दी वर्षाच्या उंबरठ्यावर आहे. पण, १०० वर्षांनंतरही डॉक्टरांची विचारप्रेरणा आजही संघाच्या उक्ती आणि कृतिशीलतेचा आत्मा म्हणावी लागेल.

डॉ. हेडगेवार यांनी हिंदू संघटनाच्या रचलेल्या पायावरच पू. श्रीगुरूजी, बाळासाहेब देवरस, रज्जूभैय्या, सुदर्शनजी अशा त्यापुढील प्रत्येक सरसंघचालकांनी कळसच चढविला. डॉ. मोहनजी भागवतही त्याला अपवाद नाहीत. रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्ताने दिल्लीतील विज्ञान भवनात परवा संपन्न झालेल्या तीनदिवसीय '१०० वर्ष की संघयात्रा-नए क्षितिज' या व्याख्यानमालेतून मोहनजींनीही 'न्यायाचे राज्य म्हणजे हिंदूराष्ट्र' असे ठामपणे प्रतिपादित केले. ते म्हणाले की, भारत हे हिंदूराष्ट्रच आहे आणि त्यासाठी कोणतीही औपचारिक घोषणा आवश्यक नाही. आपल्याकडील ऋषी आणि द्रष्ट्यांनी भारताला आधीच हिंदूराष्ट्र घोषित केले आहे. त्यामुळे ते कोणत्याही अधिकृत घोषणेवर अवलंबून नाही, हे सत्य आहे. तेव्हा त्याचा स्वीकार करणे फायद्याचे आणि हे न स्वीकारल्याने तुमचे नुकसान होते. अशा प्रकारे एकूणच संघविचारांची व्यापकता, विविध विषयांवरील सखोल भूमिका सरसंघचालकांनी या व्याख्यानमालेच्या निमित्ताने सुस्पष्टपणे विशद केली. त्यामुळे संघस्वयंसेवकांच्या दिशादिग्दर्शनाबरोबरच, संघविरोधकांनाही गुद्द्यांतून नव्हे, तथ्यात्मक मुद्द्यांतून उत्तरे देऊन सरसंघचालकांनी संघाविषयीचे गैरसमज, मिथकांना खोडून काढले.

भारतात वास्तव्यास असणारे सर्व जाती-धर्मांचे बांधव हे हिंदूच आहेत, याचा पुनरुच्चार करीत हिंदू हीच समस्त भारतीयांची ओळख असल्याचे सरसंघचालकांनी अधोरेखित केले. आपल्या सर्वांचे पूर्वज, संस्कृती एकच असल्याची आठवणही सरसंघचालकांनी यावेळी करून दिली. पण, त्याचबरोबर 'मुस्लीम, ख्रिश्चनांनीही आपण अरबी, तुर्की, युरोपीय नव्हे, तर भारतीय आहोत,' असा विचार रुजवण्याचा मोलाचा संदेश सरसंघचालकांनी या दोन्ही धर्मांच्या प्रमुखांना विशेषत्वाने दिला. कारण, येथील मुस्लिमांना अरबी, तुर्की राष्ट्रविचार अधिक जवळचे वाटल्यामुळे, ते भारतीयत्वापासून आपसुकच दुरावतात.

वानगीदाखल सांगायचे तर, काही वर्षांपूर्वी रोहिंग्या मुसलमानांवर म्यानमारमध्ये होणाऱ्या अत्याचारांविरोधात मुंबईत धर्मांधांनी रस्त्यावर अक्षरशः हैदोस घातला होता. असे प्रसंग टाळायचे असतील, तर हा देश आपला आहे, असे मुस्लीम आणि ख्रिश्चनांनी सर्वप्रथम मनोमन मानायला हवे आणि महत्त्वाचे म्हणजे, तसे त्यांच्या वर्तनातूनही प्रतिबिंबित झाले पाहिजे. भारतात राहायचे, कमवायचे, खायचे, सरकारी सुविधांचे लाभही घ्यायचे आणि येथील संस्कृतीलाच तुच्छ लेखायचे, त्या संस्कृतीचा, सांस्कृतिक प्रतिकांचा वारंवार अपमान करायचा, हे सर्वस्वी अमान्यच! याच अनुषंगाने 'अन्य धर्मीयांशी हातमिळवणी करणे, म्हणजे इस्लामला धोका नाही,' हेदेखील निदर्शनास आणून देत, 'संघ मुस्लिमांवर अत्याचार करतो,' या अपप्रचारालाही सरसंघचालकांनी बाद ठरविले. खरं तर यापूर्वी खुद्द डॉ. मोहनजींनी मुस्लीम समाजातील धर्मगुरूंची वेळोवेळी भेट घेतली आहे, त्यांच्याशी विविध विषयांवर अगदी मनमोकळेपणाने चर्चाही केली. 'मुस्लीम राष्ट्रीय मंचा'सारख्या संघाच्या सहयोगी संघटनाही मुस्लीम समाजात राष्ट्रवादी विचारांचा जागर करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

तसेच संघाच्या शाखेत प्रवेशासाठी कधीही जात-धर्म विचारण्याची पद्धत पूर्वीही नव्हती, आजही नाही आणि ती भविष्यातही नसेल. एवढेच काय तर, नैसर्गिक आपत्तीच्या काळातही सदैव तत्पर असणारा संघ हा जात-धर्म विचारून कुणालाही मदतीचा हात देत नाही. त्यामुळे संघ हे सर्वार्थाने सर्वसमावेशक आणि एक सहिष्णू संघटन. म्हणूनच डॉ. मोहनजींनीही त्यांच्या उद्बोधनात मुस्लिमांच्या नव्हे, मुस्लीम आक्रमकांच्या नावाने रस्त्यांच्या नामकरणाला विरोध असल्याचे स्पष्ट करत, अब्दुल हमीद, अशफाक उल्ला खान आणि ए. पी. जे. अब्दुल कलाम यांसारख्या राष्ट्रभक्त भारतीय मुसलमानांची प्रेरणा घेण्याचे आवाहनही मुस्लीम समाजाला केले. त्यामुळे संघाला मुद्दाम जातीयवादी, मुस्लीमविरोधी ठरविणाऱ्यांनी, संघाला सेक्युलॅरिझमचे धडे देणाऱ्यांनी आधी संघ नीट समजून घेण्याची आणि त्यासाठी सरसंघचालकांची ही व्याख्यानमाला कान उघडून ऐकण्याची नितांत गरज आहे.

एकीकडे हिंदूराष्ट्राचा गजर करताना, सरसंघचालकांनी लोकसंख्यात्मक बदलांच्या भारतासमोरील मोठ्या संकटावर भाष्य करत धर्मांतरणालाही तीव्र विरोध दर्शविला. घुसखोरी थांबलीच पाहिजे आणि बेकायदेशीर स्थलांतरितांना नव्हे, आपल्या देशातील नागरिकांना नोकऱ्या दिल्या पाहिजेत, याबाबत त्यांनी ठाम भूमिका मांडली. तसेच 'उदरनिर्वाह म्हणजे नोकरी, हा भ्रम असून, रोजगार घेणारे नाही, तर रोजगार निर्माण करणारे व्हा,' असा कानमंत्रही सरसंघचालकांनी दिला.

रोजगाराच्या प्रश्नाबरोबरच दिवसेंदिवस ढासळणारी सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्ये, त्यातून निर्माण होणारे 'कॅन्सल कल्चर' आणि बळावणाऱ्या 'वोकिझम'वरही सरसंघचालकांनी संधान साधले. जगाला संतुलन साधणारा धर्म देण्याची जबाबदारी ही भारताचीच आहे, असे सांगत भारताच्या विश्वबंधुत्वाच्या, 'वसुधैव कुटुम्बकम्'च्या दायित्वाचे स्मरणही सरसंघचालकांनी यावेळी करून दिले. संघ आणि भाजपच्या संबंधांवरही वरचेवर माध्यमांमध्ये उलटसुलट चर्चांना उधाण येते. पण, त्यावरही या व्याख्यानमालेनंतर पत्रकारांनी प्रश्न विचारले असता, सरसंघचालकांनी त्याचीही अगदी परखडपणे उत्तरे दिली. संघ व भाजपमध्ये कोणताही संघर्ष अथवा मतभेद नसल्याचे सांगत, 'भाजपमधील सर्व काही संघ ठरवतो,' या अपप्रचारावरही सरसंघचालकांनी नेमकेपणाने बोट ठेवले. तसेच गेल्या काही काळापासून मोदींनी वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यावर निवृत्ती स्वीकारावी, म्हणून संघ आग्रही असल्याच्या वावड्याही उठविण्यात आल्या होत्या. पण, स्वत:सह अन्य कोणी ७५ वर्षांनंतर निवृत्त व्हावे, असे कधीही म्हटले नसल्याचे सांगत डॉ. मोहनजींनी एकप्रकारे अशा अफवांना पूर्णविराम दिला.

'भाजपचा अध्यक्ष आम्हालाच निवडायचा असता, तर इतका वेळही लागला नसता,' अशी मिश्किल टिप्पणी करीत, संघ आणि भाजपचे परस्पर संबंध, दोघांचे कार्यक्षेत्र आणि समन्वयाची भूमिका याबाबत सरसंघचालकांनी मनमोकळेपणे सांगितले. याव्यतिरिक्त पंचपरिवर्तन, महिलांचा सहभाग, मंदिरांवरील नियंत्रण, भाषा, खानपान, आत्मनिर्भरता यांसारख्या अनेकविध विषयांवर या व्याख्यानमालेतून सरसंघचालकांनी मांडलेले विचारही तितकेच चिंतनशील ठरावे. आजघडीला पाच ते सात लाख स्वयंसेवक आणि ३ हजार, ५०० पूर्णवेळ प्रचारक लाभलेला संघ अवघ्या काही दिवसांत आपल्या शताब्दी वर्षात प्रवेश करेल. १०० वर्षांपूर्वी हिंदू समाजाचे सशक्त संघटन, भारताला परमवैभवाकडे नेण्याचे संघाचे ध्येय होते आणि आजही त्याच ध्येयपूर्तीकडे संघाची अविरतपणे वाटचाल सुरू आहे. अगदी प्रतिकूल परिस्थितीत उपेक्षा, कट्टर विरोध, बंदी सहन करूनही संघ समाजात सज्जनशक्तीच्या बळावर कार्यरत राहिला आणि तो भविष्यातही तसाच क्रियाशील राहील.

## कलंदर..


फिरत आला दुनिया सारी
विश्वरूप ते सुंदर
रमत गमत मस्तीत निघाला
जीवन मुक्त कलंदर..
मध्यान्हाचे चटके शोषू
करी क्रोधावर मात
सूर्यास्ताची चाहूल येते
होते शीतल रात
रेत शय्येवर निवांत पडतो
निद्रेचा मिळे सहारा
पवित्र कुडीत देहाच्या
वाहे चैतन्याचा वारा
पूर्व दिशेला रंग सिंदुरी
भगवी झाली धरती
पक्षी करती किलबिल किलबिल
विणती कोवळी नाती..
मनात उसळून सागर लाटा
विकार मंथन त्यात
गलबताची लांब सावली
पहा डोलते पाण्यात
तरंग उठले पाण्यावरती
दूर निळा किनारा
मध्येच गिरकी घेऊन
होतो मासा बावरा
निसर्गाची हिरवी जादू
पहा रंगली प्रकृती
आविष्कार हा असा अनुपम
गुंग झाली मती..
गात चालला उंच स्वराने
मुक्त छंद नादात
सोबत घेऊन चालू लागला
फुलपाखरांची वरात
मृदगंध दरवळे
सुटला गार वारा
विरक्तीच्या वस्त्रावर
शोभतो केशर रंग प्यारा
जीवन मुक्त झालो आता
संयम श्वास गती
प्रसन्नचित्त मन गाभारा
साक्षात नवी अनुभूती..

नागेश घाट



# सिंधूची साद : सार्वभौमत्वाची पुनर्स्थापना आणि सन्मानाची प्रतिष्ठापना

आकलन
अर्जुन राम मेघवाल



संसदेच्या संपन्न झालेल्या विशेष पावसाळी अधिवेशनाच्या प्रारंभी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे भारताचे गौरवशाली सत्र असल्याचे म्हटले होते. भारतीय सैनिकांचे शौर्य, 'ऑपरेशन सिंदूर'चे यश, पाकिस्तान प्रायोजित दहशतवादाच्या कारखान्यांवर निर्णायक प्रहार आणि 'सिंधू जलकरारा'ला दिलेली स्थगिती, या सर्व घडामोडी म्हणजे भारताच्या दृढ इच्छाशक्तीचा पुरावा आहेत आणि त्यांनी देशाच्या मानसिकतेवरही एक अमिट छाप सोडली आहे. तरीदेखील, केंद्र सरकार सर्व मुद्द्यांवर खुलेपणाने चर्चा करायला तयार असूनही, विरोधकांनी अडथळे निर्माण करण्याचा मार्ग निवडला आणि जनहिताच्या व्यापक विचार-विनिमयाचा बळी देत, राजकीय नाटकबाजीत अडकून ठेवण्याचे काम केले.

विचार करण्यासारखी बाब म्हणजे, स्वार्थाला राष्ट्रीय हितापेक्षा वर मानण्याची काँग्रेसची जुनी सवय देश अनेक वर्षांपासून सहन करत आला आहे. दुर्दैवी फाळणीच्या वेदनांपासून ते नेहरूवादी परराष्ट्र धोरणाच्या प्रचंड नुकसानकारी अपयशांपर्यंत या निर्णयांनी भारताची मूळ संकल्पनाच कशी कमकुवत केली, याचा इतिहास साक्षीदार आहे. 'सिंधू जलकरारा'वर (१९६०) बारकाईने नजर टाकली, तर जनता आणि देशाच्या विकासाचा बळी देत केलेले तुष्टीकरण आणि अति- उदारतेची एक अशी कहाणी समोर येते, ज्यामुळे राष्ट्रीय विकासाच्या शयतांना सातत्याने बाधाच पोहोचली आहे. खरे तर, भारताच्या विकासाशी संबंधित हितांचे बलिदान हे एका अशा प्रकारच्या राजकीय विचारांनी प्रेरित होते, ज्यामुळे आपल्या नागरिकांच्या कल्याणापेक्षा पाकिस्तानच्या हितांना प्राधान्य दिले गेले, ही देशासोबतची एक मोठी विटंबनाच आहे.

मुळात, जागतिक बँकेच्या मध्यस्थीने झालेल्या 'सिंधू जलकरारा'मुळे सिंधू नदीच्या प्रवाहाचे पाणी मोठ्या प्रमाणात पाकिस्तानच्या वाट्याला (८०:२०) गेले. खरे तर, सिंधू नदीचा उगम प्रामुख्याने भारतात होतो. या करारामुळे भारताला सिंधू, चिनाब आणि झेलम यांसारख्या पश्चिमेकडील महत्त्वाच्या नद्यांवरील नियंत्रण सोडावे लागले. यामुळे पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि गुजरातसारख्या विशाल कोरड्या आणि दुष्काळग्रस्त प्रदेशांचे पुनरुज्जीवन करू शकणारे मोठे जलस्रोत आपल्या हातून गेले. जर आपल्या राष्ट्रीय हितांचे रक्षण केले गेले असते, तर चांगल्या जलव्यवस्थापनामुळे या प्रदेशाचा संपूर्ण चेहरामोहराच बदलू शकला असता. मात्र, भारताने केलेल्या या मोठ्या त्यागातून अपेक्षित असलेले मुत्सद्दी लाभही फोलच ठरले. त्याउलट या कराराच्या प्रक्रियेमुळे भारताच्या चिंता आणखी वाढल्या.

**सिंधू जल करार ही नेहरुंची सर्वांत मोठी चूक होती. त्यावेळी त्यांनी वैयक्तिक हितासाठी राष्ट्रहिताला तिलांजली दिली, अशी टीका नुकतीच भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी केली होती. त्यानिमित्ताने या करारावेळी संसदेत झालेली चर्चा आणि तुष्टीकरणाच्या राजकारणातून पाकिस्तानचे साधले गेलेले हित याचा मागोवा घेणारा हा लेख...**

या करारावर दि. १९ सप्टेंबर १९६० रोजी स्वाक्षरी झाली होती, पण तो संसदेसमोर मांडला गेला तब्बल दोन महिन्यांनंतर, नोव्हेंबरमध्ये. केवळ दोन तासांच्या औपचारिक चर्चेसाठी तो संसदेसमोर ठेवण्यात आला. त्यानंतर जशी या कराराची माहिती समोर आली, तसी प्रमुख वृत्तपत्रांनी त्यावर कठोर टीका केली होती. इतक्या महत्त्वाच्या कराराबाबत संसदीय स्तरावर दाखवल्या गेलेल्या या घाई-गडबडीने लोकशाही व्यवस्थेतील जबाबदारीपूर्ण देखरेख, पारदर्शकता आणि तत्कालीन नेतृत्वाच्या शंका घेण्यासारख्या हेतूंबाबत गंभीर प्रश्न निर्माण केले होते.

अर्थात, संसदेला या कराराच्या तपासणी आणि पडताळणीसाठी मर्यादित कालावधीनंतरही 'सिंधू जलकरारा'ला भारतीय संसदेत मोठा विरोध झाला. तेव्हा एक तरुण खासदार असलेले अटलबिहारी वाजपेयी यांनी चेतावणी दिली होती की, पाकिस्तानच्या अवाजवी मागण्यांपुढे झुकल्याने मैत्री आणि सद्भावना निर्माण होईल, हा पंतप्रधान नेहरूंचा तर्कच पूर्णपणे चुकीचा आहे.

संसदेत दि. ३० नोव्हेंबर १९६० रोजी झालेली चर्चा लक्षात घेतली, तर त्यातूनही सर्व पक्षांनी या करारावर टीका केली होती, ही बाब स्पष्ट होते. बहुतेक सदस्यांनी सरकारवर पाकिस्तानसमोर झुकल्याचा आणि भारतीय हितांचे नुकसान केल्याचा आरोप केला होता. राजस्थानमधील काँग्रेस पक्षाचे खा. हरिश्चंद्र माथुर, अशोक मेहता, ए. सी. गुहा, कम्युनिस्ट पक्षाचे खा. के. टी. के. तंगमणी, सरदार इबाल सिंह आणि बृजराज सिंह यांनीही या जल-राजकारणाबद्दल स्पष्टपणे चिंता व्यक्त केली आणि हा करार अपयशी ठरून, त्यामुळे भोगाव्या लागणाऱ्या संभाव्य दुष्परिणामांबद्दल भीती व्यक्त केली होती.

थोडक्यात, हा करार प्रचंड एकतर्फी आणि प्रत्यक्ष देवाणघेवाणीचा अभाव असलेलाच होता.

खरे तर, या सगळ्यातली आणखी एक विटंबना म्हणजे लोकसभेत या करारावरच्या चर्चेला उत्तर देताना पंतप्रधान नेहरूंनी खासदारांच्या बुद्धिमत्तेवरच प्रश्नचिन्ह उभे केले आणि त्यांना कमीपणाची वागणूक दिली. त्यांनी आपल्या उत्तरात म्हटले की, खासदारांनी केलेली टीका तथ्य आणि विचारांची माहिती नसल्यामुळे केली गेली आहे. इतकेच नाही, तर इतया महत्त्वाच्या प्रकरणाला, जे केवळ वर्तमानाशीच नव्हे, तर भविष्याशीही जोडलेले आहे,

इतक्या हलया मनाने आणि इतक्या बेपर्वाईने तसेच संकुचित विचारांनी हाताळले जात असल्याचेही नेहरूंनी आपल्या उत्तरात म्हटले होते. हा करार भारताच्या हितांसाठी मारक ठरला, तर पाकिस्तानसाठी तो एक मोठा विजय ठरला. अयुब खान यांनी एका सार्वजनिक भाषणात कबूल केले होते की, या कराराची वैधता आणि गुण-दोष पाकिस्तानच्या विरोधात होते, पण मुत्सद्देगिरीच्या पातळीवर नेहरूंनी आलेल्या अपयशामुळे पाकिस्तानला आघाडी घेता आली.

दि. ४ सप्टेंबर १९६० रोजी रावळपिंडीतील आपल्या भाषणात, अयुब खान म्हणाले होते की, आता त्यांच्यासाठी जो तोडगा निघाला आहे, तो आदर्श नाही, पण त्या परिस्थितीत तो त्यांच्यासाठी निघू शकणारा सर्वोत्तम तोडगा होता, यातील अनेक मुद्दे, त्यांचे गुण-दोष आणि वैधता काहीही असले, तरी ते त्यांच्या विरोधात जाणारे होते. त्यांचे हे खुलासे आजही राष्ट्रीय हिताला दुय्यम स्थानावर ठेवण्यामागच्या उद्देशांवर प्रश्नचिन्ह निर्माण करतातच.

निरंजन डी. गुलाटी यांनीही त्यांच्या 'इंडस वॉटर ट्रीटी : एन एसरसाईज इन इंटरनॅशनल मिडिएशन' या पुस्तकात लिहिल्याप्रमाणे, दि. २८ फेब्रुवारी १९६१ रोजी स्वतः पंतप्रधान नेहरूंनी यामुळे पदरी पडलेली निराशा मान्य केली होती. हा करार इतर समस्या सोडवण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी आपल्याला आशा होती; पण आपण जिथे होतो, तिथेच राहिलो आहोत, असे नेहरूंनी त्यावेळी म्हटले होते. या करारानंतरच्या घडामोडींमधून निर्माण झालेली तीव्र दरी लक्षात घेतली, तर या करारातील असमानता अधिक ठळकपणे अधोरेखित होत असल्याचे निश्चितच म्हणता येईल.

नेहरूंचा निष्काळजीपणा आणि राष्ट्रीय हिताकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती भारताला कालांतराने महागात पडली. खरे तर, 'सिंधू जलकरारा'वर स्वाक्षरी करणे हे पुढच्या दिशेने टाकलेले एक मोठे पाऊल आहे आणि खऱ्या अर्थाने हा करार प्रादेशिक मुद्द्यांपेक्षा (काश्मीरच्या) अधिक महत्त्वाचा आहे, असे वक्तव्यही पंतप्रधान नेहरू यांनी फेब्रुवारी १९६२ मध्ये वॉशिंग्टन पोस्टला दिलेल्या मुलाखतीत केले होते.

स्पष्ट इशारा आणि संकेत मिळालेले असूनही, शांती आणि आंतरराष्ट्रीय मान्यतेच्या इच्छेने काँग्रेस नेतृत्वाने भारताच्या दीर्घकालीन जलसुरक्षा आणि समृद्धीऐवजी राजनैतिक मुत्सद्देगिरीच्या पातळीवर सोयीचा मार्ग निवडला होता. तुष्टीकरणाचे हे धोरण अनेक आघाड्यांवर राष्ट्रीय प्रगतीसाठी हानिकारक ठरले. खरे तर, हा करार भारतासाठी जल-राजकारणाचे अपयश आणि पाकिस्तानसाठी एक मोठा राजनैतिक विजय ठरला.

'सिंधू जलकरारा'चे स्थगितीचे यश मुत्सद्देगिरीच्या पलीकडचे आहे. यातून 'विकसित भारत २०४७'चे उद्दिष्ट साध्य करण्याच्या भारताचा निर्धार व्यक्त होतो. आपल्या जलस्रोतांवर पुन्हा नियंत्रण मिळवून, भारत हवामानाला अनुकूल पायाभूत सुविधा निर्माण करू शकतो, सिंचनव्यवस्था मजबूत करू शकतो आणि औद्योगिक विकासाला चालना देऊ शकतो, आणि हीच एक विकसित राष्ट्र बनण्याची गुरुकिल्ली आहे. हा निर्णय जुन्या करारांनी लादलेल्या मर्यादा संपुष्टात आणेल आणि जल सार्वभौमत्वाला प्रगतीचा पाया म्हणून स्थापित करेल.

हे एक असे धाडसी पाऊल आहे, जे आत्मनिर्भरता, स्थिरता आणि सर्वसमावेशक विकासाच्या ध्येयाशी गहिरेपणाने जोडलेले आहे. (लेखक केंद्रीय विधी आणि न्याय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार), तसेच संसदीय कार्य राज्यमंत्री, भारत सरकार आहेत.)